



# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ३ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्षपद अजित पवारांकडेच

### चौथ्यांदा मिळवली जबाबदारी

**मुंबई/प्रतिनिधी** : मागील काही दिवसांपासून महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्षपदाची चर्चा सुरू होती. अध्यक्षपदासाठी भाजपाचे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार इच्छुक होते. दरम्यान, आता अध्यक्षपदावर शिक्कामोर्तब झाला आहे. अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या (एमओए) अध्यक्षपदी निवड झाली आहे. सलग ४ वेळा पुन्हा एकदा सर्वसंमतीने निवड झाली आहे. ३१ क्रीडा संघटनांपैकी २२ पेक्षा जास्त संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पॅनेलला पाठिंबा दिला आहे. पवार यांची क्रीडा क्षेत्रावर पुन्हा एकदा पकड असल्याचे अधोरेखीत झाले आहे.अजित पवार यांच्या पॅनेलमधील आदिल सुमारिवाला, प्रदीप गंधे आणि प्रशांत देशपांडे यांची उपाध्यक्षपदांवर बिनविरोध निवड झाली आहे. यामुळे अजित पवार यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाला आहे.



महाराष्ट्र ऑलिम्पिक अध्यक्षपदाच्या निवडीआधी भाजपा-युतीत समन्वय राखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत बैठका झाल्या. दरम्यान, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पॅनेलच्या काही पदाधिकाऱ्यांना पदे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# भारताने महिला संघाने जिंकला एकदिवसीय विश्वचषक!

## अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव

**मुंबई/प्रतिनिधी** : डी. वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या महिला विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत पहिली वहिली विश्वचषक स्पर्धा जिंकत इतिहास रचला आहे. शफाली वर्माच्यासह दीप्ती शर्माच्या अष्टपालू कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने २९९ धावांचा बचाव करत फायनल बाजी मारली. २००५ आणि २०१७ मध्ये अधुरं राहिलेल स्वप्न हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघानं स्वप्ननगरीत साकार करून दाखवलं. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने शतकी खेळी केली. तिने भारतीय संघाचं टेन्शन वाढवलं होते. पण दीप्तीच्या गोलंदाजीवर तिने मोठा फटका खेळला अन् अमनजोत कौरनं



तिसऱ्या प्रयत्नात कॅच पूर्ण करत तिसऱ्या प्रयत्नात ट्रॉफी जिंकण्याचा मार्ग मोकळा केला. वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड महिला संघाशिवाय वर्ल्ड कपची फायनल रंगल्याचे पाहायला मिळाले. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनलसह २५ वर्षानंतर नवा वर्ल्ड चॅम्पियन मिळणार हे आधीच ठरलं होतं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप ट्रॉफीचं स्वप्न साकार केले. भारतीय महिला संघाने टॉस गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात २९८ धावा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने सेमी फायनलनंतर फायनलमध्येही शतक करत वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वर्ल्ड कपच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिने आपल्या नावे केला.

## टेम्पो ट्रॅव्हलर ट्रकच्या भीषण अपघातात १५ जणांचा मृत्यू

**फलोदी/वृत्तसंस्था-** राजस्थानमध्ये एका टेम्पो ट्रॅव्हलरची उभ्या असलेल्या ट्रकला धडक झाली. या अपघातात पंधरा जणांचा मृत्यू झाला. ते कोलायत मंदिराचे दर्शन घेऊन जोधपूरला परतत होते.

राजस्थानच्या फलोदी जिल्ह्यातील माटोडा परिसरातील भारतमाला एक्सप्रेसवेवर रविवारी संध्याकाळी उशिरा एक भीषण अपघात झाला. जोधपूरमधील सुरसागर येथील रहिवासी असलेले अठरा जण एका टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये बिकानेरमधील कोलायत मंदिरातील तीर्थयात्रेवरून परतत होते. हनुमान सागर चौकाजवळ, भरधाव वेगाने येणारा टेम्पो ट्रॅव्हलर अचानक उभ्या असलेल्या ट्रकला धडकला. या अपघातात पंधरा जणांचा जागीच मृत्यू झाला.

फलोदीचे पोलिस अधीक्षक कुंदन कंवरिया यांनी मृतांच्या संख्येची पुष्टी केली. 'पंधरा जणांचा जागीच मृत्यू झाला. तिघांना जखमींना तातडीने ओसियन रुग्णालयात दाखल करण्यात आले,



तेथून त्यांना ग्रीन कॉरिडॉरद्वारे जोधपूरला रेफर करण्यात आले. धडक इतकी तीव्र होती की टेम्पो ट्रॅव्हलर पूर्णपणे चिरडला गेला.

## निवडणुकांमुळे हिवाळी अधिवेशन दहा दिवस पुढे ढकलले जाणार

**नागपूर/प्रतिनिधी** : : विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात ८ डिसेंबर रोजी नियोजित करण्यात आले आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लक्षात घेता अधिवेशनासाठी मनुष्यबळाची कमतरता जाणवू शकते. त्यामुळे अधिवेशन ८ ते १० दिवस पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनौपचारिक चर्चेदरम्यान यासंदर्भात संकेत दिले.

ठेकेदारांच्या काम बंद आंदोलनामुळे अगोदरच हिवाळी अधिवेशनावर संकटाचे ढग दाटले आहेत. मंत्र्यांच्या अनेक बंगल्यांचे काम प्रलंबित आहे.

### राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण



१५० कोटींची बिले थकीत असल्याने ठेकेदारांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे नागपूरऐवजी मुंबईत अधिवेशनाची चर्चा सुरू झाली होती. मात्र नागपूर करारानुसार विधीमंडळाचे एक सत्र नागपुरमध्ये घेणे बंधनकारक आहे.

त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची चिन्हे आहेत. डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे मतदान होईल.









## विस्फोट पाकिस्तानात, अन् झोप उडाली काँग्रेसची'

### पीएम मोदींचा घणाघात...

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आरा येथील जाहीर सभेतून काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल (व्ऊ) वर तीव्र प्रहार केला. त्यांनी म्हटले की, 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशामुळे देशाचा आत्मविश्वास वाढला, मात्र काँग्रेस आणि त्यांचे सहयोगी पक्ष अस्वस्थ झाले.पंतप्रधान मोदी म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूरद्वारे विस्फोट पाकिस्तानमध्ये झाले, पण काँग्रेसच्या शाही घराण्याची रात्रीची झोप उडाली. पाकिस्तान आणि काँग्रेसचे नामदार आजही ऑपरेशन सिंदूरच्या धक्क्यातून सावरलेले नाहीत. जेव्हा देशाची सुरक्षा दलं विजय मिळवतात, तेव्हा विरोधक त्यांच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात त्यामुळे देशाची प्रतिमा खराब होते,' अशी टीका पंतप्रधानांनी केली.मोदींनी दावा केला की, 'बिहारमधील महाआघाडी (व्ऊ-काँग्रेस-इतर) मध्ये मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारावरून प्रचंड मतभेद आहेत. नामांकन मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी दरवाजे बंद करून मोठा 'राजकीय व्यवहार' झाला. काँग्रेस राजदच्या नेत्याला मुख्यमंत्री चेहरा घोषित करू इच्छित नव्हती, पण दबावाखाली ते मान्य करावे लागले. जर निवडणुकीपूर्वीच एवढे वाद आहेत, तर निवडणुकीनंतर काय होईल?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



**जंगलराज विरुद्ध सुशासन-** पंतप्रधानांनी आपल्या भाषणात राजदच्या सत्ताकाळाची तुलना सध्याच्या एनडीए सरकारशी केली. ते म्हणाले, 'राजदच्या काळाला 'जंगलराज' म्हटले जायचे, जे क्रूरता, बंदूकशाही, अंधश्रद्धा आणि भ्रष्टाचाराचे प्रतीक होते. मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि एनडीए सरकारने बिहारला त्या अंधारातून बाहेर काढले. बिहारला पुन्हा जुन्या अराजकतेत नेऊ देऊ नका. आजचा बिहार विकास आणि सुशासनाच्या मार्गावर आहे.'

पंतप्रधान मोदींनी आरोप केला की, 'बिहारच्या संसाधनांवर बिहारच्या लोकांचा अधिकार असावा, पण काही पक्ष त्यावर बाहेरील लोकांचा कब्जा करून देतात. जे घुसखोरांचे रक्षण करतात, ते बिहारसाठी धोकादायक आहेत. जे पक्ष पूर्वी उद्योग बंद करत होते, ते आता नवीन उद्योग आणतील का? गुंतवणूकदार 'लालटेन' (राजदचे चिन्ह) आणि 'लाल झेंडा' (भाकपा-मालेचे चिन्ह) पाहून घाबरतात. बिहारमध्ये उद्योग आणि रोजगार फक्त एनडीएच देऊ शकते.'








# दारूच्या वादातून मित्राचा खून! मंगरूळ चव्हाळा हादरले

## -काठीच्या मारहाणीने ३६ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**अमरावती :** दारूच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाने अखेर जीवघेणा वळण घेतले. मंगरूळ चव्हाळा येथे मित्रांमधील वादातून एका तरुणाचा काठीने मारहाण करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हि घटना ३१ ऑगस्ट रोजी दुपारी चारच्या सुमारास घडली असून, १ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला.

फिर्यादी कल्पना धोंगडे (रा. सायगव्हाण, ता. समुद्रपूर, जि. वर्धा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मंगेश तिरमारे (रा. मंगरूळ चव्हाळा) याने दारू पिण्याच्या कारणावरून त्याचा मित्र मंगेश अशोकराव वानखडे (वय ३६) याच्याशी वाद घातला. वाद तीव्र होताच आरोपीने काठी उचलून वानखडेच्या पोटावर व पाठीवर जबर मारहाण केली. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या वानखडे याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. फिर्यादीचा अहवाल आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांचा पोस्टमॉर्टेम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी आरोपी मंगेश तिरमारेविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. घटनेमुळे मंगरूळ चव्हाळा परिसरात खळबळ माजली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.




# अनिल अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त आज पत्रकारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार

**अमरावती/ प्रतिनिधी :** संपादक अनिल अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त आज सोमवार दि.३ नोव्हबर सायं. ५ वाजता वॉलकट कंपाऊंड परिसरातील मराठी पत्रकार भवन येथे पत्रकारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी दै. अमरावती मंडल तथा दै. आपली मातृभूमी चे संपादक अनिल अग्रवाल असणार आहेत. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खा. डॉ. अनिल बोंडे, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र उपस्थित राहणार आहेत.



पत्रकारिता क्षेत्राशी संबंधित विविध माध्यमांमध्ये कार्यरत पत्रकार आणि कर्मचाऱ्यांची मुले शिक्षण, क्रीडा, कला आणि इतर क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत असतात. अशा मुलांच्या गुणांचे कौतुक आणि प्रोत्साहन व्हावे, त्यांच्या यशाचा सन्मान व्हावा या उद्देशाने दरवर्षी ३ नोव्हेंबर रोजी संपादक अनिल अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त हा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येत असतो. पत्रकार कुटुंबियांच्या या स्नेही आणि सत्कार समारंभास जिल्ह्यातील तसेच शहरातील पत्रकार कुटुंबीयांनी तसेच पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या सर्व प्रतिनिधींनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन अनिल अग्रवाल अभिष्टचिंतन सोहळा आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखलदऱ्यात सहाय्यक कृषि अधिकाऱ्याला मारहाण



**अमरावती :** चिखलदऱ्यात शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या कृषी अधिकाऱ्यावर एका व्यक्तीने मारहाण करत अडथळा निर्माण केल्याची धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली. सरकारी कामकाजात अडथळा आणल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी गणेश तोटे (सहायक कृषी अधिकारी, बोराळा) हे सरकारकडून नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडून आधारकार्ड, पासबुक आणि संमतीपत्रे गोळा करण्याचे काम तहसीलदारांच्या आदेशानुसार करत होते.

दरम्यान, आरोपी बाजीराव धांडेकर (रा. आकी) हा एका कागदावर संमतीपत्र घेऊन आला. फिर्यादींनी पाहिले असता, त्या कागदावर सर्व शेतकऱ्यांच्या सह्या एकाच व्यक्तीने केल्याचे दिसून आले. त्यावर तोटे यांनी सांगितले की, 'संमतीपत्रावर माझ्या समोर शेतकऱ्यांनी सह्या कराव्यात.' हे ऐकताच आरोपीने रागाच्या भरात जवळील कागदपत्रे फाडली, फिर्यादींच्या अंगावर झेप घेतली, शर्टाचे बटण तोडले आणि उजव्या गालावर थप्पड व बुक्यांनी मारहाण केली. या प्रकारात आरोपीने सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने तोटे यांच्या जबाबावरून चिखलदरा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सिटी कोतवाली पोलीस स्टेशनसमोरच चाकू हल्ला!

## -सहा हल्लेखोर फरार

**अमरावती :** शहराच्या मध्यभागी, तेही सिटी कोतवाली पोलीस स्टेशनसमोरच एका तरुणावर सहा जणांनी चाकूने सपासप वार करत प्राणघातक हल्ला केल्याची थरारक घटना शनिवारी रात्री उशिरा घडली. हल्ल्यानंतर रक्तबंबाळ अवस्थेत असलेला तरुण थेट पोलिस ठाण्यात धावत आला, ज्यामुळे काही क्षण परिसरात खळबळ माजली.

जखमी तरुणाचे नाव आशिष बाबाराव चव्हाण (वय २१, रा. निंभोरा, ता. बडनेरा) असे असून तो आपल्या मित्रासह काही कामानिमित्त अमरावतीत आला होता. रात्री सुमारास सिटी कोतवाली पोलीस स्टेशनसमोरून जयस्तंभ चौकाच्या दिशेने जात असताना दोन दुचाकींवर आलेल्या सहा युवकांनी त्याला अडवून चाकूने तीन वार केले आणि क्षणात घटनास्थळावरून पसार झाले. हल्ल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत आशिष थेट पोलीस ठाण्यात शिरला. पोलिसांनी तत्काळ प्रतिसाद देत त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले, जिथे डॉक्टरांनी त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले आहे. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली ठाण्याचे ठाणेदार तसेच दोन्ही डीपी एस्कॉर्ट पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, हल्लेखोरांच्या शोधासाठी सर्व बाहेर पडणाऱ्या रस्त्यांवर तपासणी सुरू करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनसमोरच झालेल्या या निर्भय हल्ल्यामुळे अमरावतीत सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# १० वरील उर्वरित

### भरधाव कारची दुचाकीला

अपघातात दुचाकी चालक गौतम मोहोड व सहकारी कैलास पेठकर यांना डोक्याला व इतर ठिकाणी जबर मार लागल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे ठेवले आहे. अपघातात दुचाकीचे तुकडेझाले असून कारचा समोरील भाग चकनाचूर झाला आहे. दर्यापूर पोलिसांनी पंचनामा करून अपघातग्रस्त कार व दुचाकी ताब्यात घेतली आहे. घटनेनंतर कारचालक व कारमधील इतर फरार झाले आहेत.पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### पैशांच्या दबावानंतर

माहेरी जा.' महिलेच्या मामाने नातेसंबंध टिकावेत म्हणून पतीला अडीच लाख रुपये दिले. काही दिवस सर्व ठीक राहिले, पण नंतर पुन्हा त्रास सुरू झाला. सासरचे नातेवाईक पतीला तिच्या विरोधात भडकवून पुन्हा पैशांची मागणी करू लागले. यानंतर १८ ऑगस्ट २०२५ रोजी पतीने पुन्हा एक लाख रुपयांची मागणी केली आणि म्हणाला, 'पैसे दिलेत तरच बायकोला नांदवायला नेईन.' शेवटी १ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास फिर्यादीच्या मामाच्या घरी समजुतीसाठी बैठक घेण्यात आली. समाजातील प्रतिष्ठित लोकांच्या उपस्थितीत पती वसीम शेखने पत्नीसमोर तीन वेळा 'तलाक, तलाक, तलाक' असे उच्चारून घटस्फोट दिला. या घटनेनंतर पीडित महिलेनं पोलिस ठाणे अंजनगाव सुर्जी येथे तक्रार दाखल केली. पोलिसांनी मुस्लिम महिला विवाह अधिकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### मतदार याद्यांमध्ये मोठा

म्हणाले, 'आयोग उत्तर देत नाही, उलट भाजपकडून प्रतिक्रिया येतात.' अमरावती जिल्ह्यात तब्बल १० हजार बोगस मतदार असल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, 'लोकसभा निवडणुकीनंतर पराभव ओळखून सत्ताधाऱ्यांनी फक्त चार महिन्यांत ७० लाख नवे मतदार तयार केले. या घोटाळ्यांमुळेच हे सरकार सत्तेत आले आहे.' यावेळी शहर जिल्हा अध्यक्ष हेमंत देशमुख,नाना बोंडे,सय्यद मनसुर,मंगेश भटकर, डॉ.रोशनअर्दक,रोशन कडू,प्रा.दीपक देशमुख,निखिल देशमुख,प्रफुल डोंगरे, मोबिन माजीद,अभिजित काळबांडे,अक्षय ढोले,सह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

### कर्जमाफी पर्यंत शेतकऱ्यांनी

नाही. आता शेतकऱ्यांना पुढील हंगामात कर्ज मिळावे, यासाठी पाठपुरावा करावा लागणार आहे. सरकार जर कर्जमाफीच्या दिशेने हालचाली सुरू करणार नसेल, तर सत्ताधारी पक्षाच्या विरोधात मतदान करा, असे आवाहन आपण करू.

बच्चू कडू म्हणाले, आमचे आंदोलन यशस्वी झाले. आंदोलनादरम्यान अनेक अडथळे आले. पावसामुळे आंदोलकांचे हाल झाले. आंदोलनाच्या अखेरीस कमी संख्या असूनही आम्ही सरकारला दखल घेण्यास भाग पाडले. कर्जमाफीच्या तारखेची घोषणा झाली, तरी आमची बदनामी होत असेल, तर ते अत्यंत चुकीचे आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायला निघालो आहे. पण, निराशेतून आमच्यावर आत्महत्येची वेळ येईल का, याची भीती वाटत असल्याचे भावनिक उद्गार बच्चू कडू यांनी काढले.

विरोधकांनी एक तरी आंदोलन करून दाखवावे. कर्जमाफीचा मुद्दा आम्ही राज्यभरात चर्चेत आणला. सरकारला आंदोलनाची दखल घेण्यास भाग पाडले. राज्यभरातील शेतकरी नेते एकत्र आले. या सर्वांच्या एकजुटीचा हा विजय आहे,असेही ते म्हणाले.

बच्चू कडू म्हणाले, आम्ही केलेल्या आंदोलनाला राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. आंदोलन यशस्वी झाले. तरीही आमच्यावर आरोप, टीका होत असेल, तर आम्हाला यापुढे आंदोलन करायचे की नाही, हा विचार करावा लागले. पण, आंदोलन आमच्या रक्तात आहे. आंदोलनांमुळे ३५० गुन्हे माझ्यावर दाखल आहेत. आता या आंदोलनात ५० गुन्हे दाखल झाले आहेत. आम्ही 'मॅनेज' झालो असतो, तर तसे झाले असते का?, विरोधक म्हणताहेत आम्ही 'मॅनेज' झालो. तर यापुढे बाकीच्यांनी लढावे. आम्ही कर्जमाफीसाठी लढा उभारला, आता ते पूर्ण करण्याचे दायित्व आमच्यावर आहे. सरकारचे आहे, तसे आमचेही आहे. त्यासाठी मरण पत्करणेही पसंत करू. आता बाकीच्या प्रश्नांसाठी जे बोलणारे आहेत, त्यांनी लढावे. आरोपच होत असतील, बदनामी होत असेल, तर शेतकऱ्यांसाठी आता आंदोलन करायचे की नाही, याचा विचार करावा लागेल. सर्व कार्यकर्त्यांची बैठक घ्यावी लागेल. आम्ही तर कर्जमाफी निश्चितपणे मिळवून देऊ. आता बाकीच्या मुद्द्यांवर इतरांना लढू द्या, राज्यात भरपूर नेतेमंडळी आहेत. त्यांच्या आंदोलनात आम्ही जाऊ, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला.

### भावानेच रचला भावाच्या

रोजी हा मृतदेह सापडला होता. मात्र ओळख पटत नसल्याने तपास अंधारात होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी कौशल्यपूर्ण तपास करून मृताची ओळख पटवली आणि आरोपींना गजाआड केले. या प्रकरणाचा उलगडा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक सतीश चवरे व शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धिरज बांडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केला.

### अमरावती येथे होणार

इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग (ण्घ्घ्ड्ढ ) प्रकल्पाची उभारणी करण्याच्या अनुषंगाने राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी गेल्या २५ मार्च २०२५ रोजी पत्र जारी करून तसा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश निर्गमित केले. तदनंतर गेल्या १५ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथे ना.अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर झालेल्या आमदारांच्या बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री महोदयांनी सर्व आमदारांनी आपापल्या जिल्ह्यांमध्ये 'सीआयआयआयटी' युनिट उभारण्याबाबत पुढाकार घेऊन प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली होती. त्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नवकल्पना आणि कौशल्य विकास याद्वारे कुशल-संसाधने आणि उद्योजकता निर्माण करण्याच्या दृष्टीने व त्यांना भरमसाठ नोकरीच्या संधी उपलब्ध करण्याला घेऊन आ. सुलभा खोडके यांनी अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सीआयआयआयटी' कौशल्यवर्धन केंद्राची उभारणी करण्यासंदर्भात २० जुन २०२५ रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य यांच्याकडून प्रस्ताव मागविला होता. या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार तसेच शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला. टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड द्वारा भारतात कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, आसाम राज्यात हे यशस्वीरित्या कौशल्यवर्धन केंद्र पूर्ण केले आहे महाराष्ट्र सरकारच्या मदतीने गडचिरोलीमध्येही असेच केंद्र यशस्वीरित्या सुरू केले आहे. त्याच धर्तीवर अमरावती जिल्ह्यात सुद्धा 'सीआयआयआयटी'च्या कौशल्यवर्धन केंद्रांची उभारणी करण्याबाबत आ. खोडके यांचा मागील सहा महिन्यापासून पाठपुरावा सुरु असल्याने या संदर्भात आता मान्यता देण्यात आली आहे. अमरावती येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सीआयआयआयटी'केंद्र उभारणीस मान्यता देण्यात आले असल्याबाबत टाटा टेक्नोलॉजी लिमिटेड चे उपाध्यक्षचे उपाध्यक्ष सुशील कुमार यांनी नुकताच दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी ना.अजित पवार यांना पत्राद्वारे कळविले आहे.

सदर प्रकल्पाच्या इमारत बांधकाम व प्रशिक्षण खर्चाला जवळपास २०० कोटी रुपये खर्च लागणार असून त्यापैकी १६२ कोटींचा खर्च टाटा टेक्नोलॉजी लिमिटेड आणि भागीदार कंपन्या करतील आणि १५ टक्के खर्च हा महाराष्ट्र शासनाद्वारे अमरावती जिल्हा नियोजनातून उचलण्यात येणार आहे. या प्रकल्पामधून देशातील उद्योगांना कौशल्यांची वाढती गरज पूर्ण होईल आणि विद्यार्थ्यांना भविष्यात जवळच्या उद्योग केंद्रांसाठी तयार करता येईल. केंद्र सुरू झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ७,००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणार आहे. हा प्रकल्प अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरु करण्यास शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुद्धा जागे संदर्भात मान्यता दिलेल्या आहे. अमरावतीच्या 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग (ण्घ्घ्ड्ढ ) प्रकल्पामध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाधारित प्रशिक्षण, नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष ज्ञान,अश्या कौशल्येवर्धन प्रशिक्षण मिळणार असून याला टाटा टेक्नॉलॉजीज व इतर अग्रगण्य उद्योगांचे सहकार्य लाभणार आहे. अमरावती जिल्ह्यात तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी, आयटीआय, कॉम्प्युटर सायन्स सारख्या अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या शासकीय व खासगी संस्था आहे. त्यामुळे अमरावती येथे ' सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन , इक्यूबेशन अँड ट्रेनिंग (ण्घ्घ्ड्ढ ) ' हा प्रकल्प उभारल्यास जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल, तसेच आवश्यकतेनुसार परंपरागत अभ्यासक्रमाला आधुनिक पद्धतीने अद्यावत होण्यास मदत होणार आहे. सोबतच उद्योग संघ व एमआयडीसी यांच्या करिता कुशल मनुष्यबळ स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देता येईल.

### परतवाडा-धामणगांव गढी

तोडली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. अशाच प्रकारातील एक मोठा खुलासा परतवाडा ते धामणगाव गढी मार्गावर चिखलदरा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता निलेश चौधरी यांच्या सतर्कतेमुळे उघड झाला. त्यांनी संशयास्पद हालचाली लक्षात घेताच तातडीने पोलिस व वनविभागाला माहिती दिली. साखळी क्रमांक ४९ व ५० या मार्गावरील डाव्या बाजूच्या रस्त्यालगत असलेल्या हिरव्या बाभळीच्या झाडांची अवैध तोड करून ती वाहन क्रमांक एमएच २७ ए ३८५७(टाटा ४०७) मध्ये भरण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच वनाधिकारी डी.एच. वाळके व सहाय्यक वर्तुळ अधिकारी ए.ए. मंजुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक पी.आर. अलोकार यांनी पंचनामा केला. कारवाईदरम्यान अंजनगाव सुर्जी येथील वाहन चालक नईम शाह साबिर शाह याला ताब्यात घेण्यात आले असून, ट्रक व अंदाजे रु. ३ लाख १० हजारांचा हिरव्या लाकडांचा साठा जप्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध झाडतोडीमागील साखळी कोणाच्या संरक्षणाखाली सुरू आहे, याचा सखोल तपास व्हावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमी व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

अंजनगांव सुर्जीत अवैध वृक्ष खरिदी-विक्रीचा व्यवसाय-

अंजनगांव सुर्जी शहरातून मोठ्या प्रमाणात कटाई केलेल्या झाडांची खरिदी विक्रीचा व्यवसाय फोफावला आहे. ठिकठिकाणी बाभुळ सह इतरही वृक्षाच्या जातीचे झाडे कटुन या ठिकाणी साठा केल्या जातो. मोठ्या प्रमाणात अवैध रित्या विक्री केल्या जाते. या सर्व बाबी वनाधिकाऱ्यांना माहिती आहे. तरी मात्र कारवाई करता मुहुर्त शोधल्या जाते. अंजनगांव सुर्जी शहरासोबतच परतवाडा, शिरजगांव कस्बा, ब्राम्हणवाडा थडीत मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षाचा व्यवसाय फोफावला आहे.

**अवैध कटाई थांबविली-**

'सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या दुतर्फा असलेली बाभळीची हिरवी झाडे अवैधरित्या तोडून वाहनात भरली जात असल्याचे माझ्या निदर्शनास आले. तात्काळ संबंधितांना रोखून मी याबाबत वनविभाग आणि पोलिस विभागाला माहिती दिली. वृक्षतोडीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसताना ही अवैध कटाई करण्यात आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, नियमांनुसार आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.'

-निलेश चौधरी, उपविभागीय अभियंता सा.बां.वि. चिखलदरा

### भाजप नेते तुषार भारतीय

नादुरुस्त होत असल्याच्या तक्रारी आहेत. भार वाढल्याने नादुरुस्तीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे या रोहीत्रांची क्षमता वाढविण्यासाठी निधी द्यावा, अशी मागणी वीज वितरण कंपनीच्या अधिकारी यांनी भाजप नेते तुषार भारतीय यांच्या कडे केली असता भारतीय यांनी अमरावती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटून जिल्हा वार्षिक योजना मधून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी लावून धरली. अमरावती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून केवळ साईनगर प्रभागातील ट्रांसफार्मर ची क्षमता वाढविण्यासाठी १ कोटी ५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला. ट्रांसफार्मर ची क्षमता वाढविण्याचे निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून अवघ्या काही दिवसांमध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. ट्रांसफार्मरच्या क्षमता वाढीचा फायदा संपूर्ण साईनगर प्रभागाला होणार आहे . साईनगर प्रभागातील वीज समस्या बाबत घेतलेल्या पुढाकाराबाबत भाजप नेते तुषार भारतीय यांचे आभार मानले आहे.

### प्रभाग मतदार यादीतील

प्रभाग रचनेत आणि प्रारूप यादीतील मतदारांच्या नावांमध्ये गोंधळ आणि अराजकता निर्माण केल्याचा आरोप करत आहेत. प्रभाग यादी प्रसिद्ध झाल्यानंतर सर्व तक्रारी दाखल करण्यात आल्या. नगर पालिका प्रशासनाने काही प्रभागांमधील मतदारांच्या नावांमध्ये गोंधळ दुरुस्त करण्यासाठी बीएलओना घरी पाठवले. परंतु तक्रार आल्यानंतरही पालिका प्रशासनाने समाधान कॉलनी येथील ४० ते ५० मतदारांची नावे प्रभाग क्रमांक २ मध्ये ठेवली. त्यात सुधारणा करून ती प्रभाग क्रमांक १ मध्ये समाविष्ट करण्यासाठी तक्रार दाखल करण्यात आली होती. परंतु पालिकेने ही नावे प्रभाग २ मध्येच ठेवली. त्यामुळे भाजपचे माजी नगरसेवक बच्चू वानरे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, गेल्या तीन निवडणुकांपासून ही नावे प्रभाग क्रमांक १ च्या यादीत समाविष्ट आहेत. या निवडणुकीत त्यांना प्रभाग २ मध्ये समाविष्ट करणे हे पालिका प्रशासनाचे षडयंत्र आहे. त्या विरुद्ध ४ नोव्हेंबरपासून उपविभागीय कार्यालया समोर अन्न त्याग आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. भाजपचे माजी नगरसेवक बच्चू वानरे, माजी शहराध्यक्ष बंडू भुते, माजी नगरसेविका स्वाती मेटे, बजरंग दलाचे गजानन ठाकरे आणि विशाल भोयर, माजी नगरसेवक अजय हजारे, विजय मिसाळ, पप्पू भालेराव, प्रविण्य देशमुख, धनराज राऊत, शैलेंद्र मेटे आणि इतर भाजप कार्यकर्त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

दुर्लक्षित तक्रारी आणि अंतिम मतदार यादी प्रसिद्ध-

स्थानिक नगरपालिका प्रशासनाकडून मतदारांच्या नावांमध्ये फेरफार केल्याचे आरोप १००३ खरे असल्याचे सिद्ध होत आहे. एकाच कुटुंबात एकाच छताखाली राहणाऱ्या पती/पत्नी, पत्नी, वडील, मुलगी किंवा कुटुंबातील सदस्यांच्या सहा नावांपैकी दोन नावे इतर प्रभागांमध्ये जोडण्यात आली. ज्यामुळे इच्छुक उमेदवारांना तक्रार दाखल करावी लागली. तथापि, स्थानिक राजकीय पक्ष पालिका प्रशासनावर तक्रारींकडे दुर्लक्ष करून अंतिम मतदार यादी प्रकाशित केल्याचा आरोप करत आहेत.

### सिलबंद घराचे कुलूप

अनधिकृतपणे प्रवेश केला. आरोपी सध्या त्या घरात राहत असून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी आरोपीविरुद्ध शासकीय आदेशाचे उल्लंघन, अनधिकृत प्रवेश व बेकायदेशीर घुसखोरी या कलमांनुसार गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

### तिवसा तालुका राष्ट्रवादी

देण्यात आले. यावेळी कॉंग्रेस सह भाजपचे काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करण्यात आला. या प्रसंगी त्यांचा तालुका अध्यक्ष व उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर यावेळी युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसची तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या आयोजीत बैठकीला राष्ट्रवादी चे तालुका अध्यक्ष दिलीपराव भुयार, कार्याध्यक्ष प्रकाश पडोळे युवक तालुकाध्यक्ष सुरज पडोळे,दिपकराव चवरे, हरिदास नायसे, प्रताप खैरकर ,रवींद्र भुयार, रवी पडोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवनिर्वाचित युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे तिवसा तालुका अध्यक्ष सुरज पडोळे, उपाध्यक्ष पदी प्रशांत जीरापुरे,शुभम सातपुते, अतुल गावंडे, ओम अलोणे, सचिवपदी चेतन नेमाडे, आदील बेग, विनोद चौधरी सरचिटणीस पदी प्रणय पाटील, इस्रार निसार, संकेत मनवरे,ओम हिंगवे कार्याध्यक्ष म्हणून वैभव लीलर्वे,सोशल मीडिया प्रमुख प्रणव मेश्राम तर सदस्य पदी सौरभ खाडे ,राहित धोत्रे जिलेस माने ,प्रज्वल टाके, वेदांत सुरजुसे निलेश आमले, विकास सावरकर साहेबां अन्सारी , तेजस भुयार ,विवेक ठाकरे शुभम इंगोले धनंजय अकोले अनिकेत खाडे, अक्षय कोरडे अमन वनवे यांची नियुक्ती केली आहे. या आयोजीत बैठकीत होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लढविण्याबाबतच्या चर्चा करण्यात आली.

### अखेर पोलिसांना तो मिनी

अवस्थेत मिळून आले आहे. सविस्तर माहितीनुसार दि.१६ ऑक्टोबर रोजी तहसिलदार डॉ.रविंद्रकुमार कानडजे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी यांनी थिलोरी हद्दीतील शिरजदा नदी पात्रातून रेतीची अवैध वाहतूक करत असलेला टेम्पो ( मिनी ट्रक ) क्रमांक एम.एच.-३०-बी.डी. -४७१७ (४०७ वाहन) जप्त करून तहसिल कार्यालय, दर्यापूर येथे जमा केले होते. त्यानंतर काही दिवसांनी अज्ञात आरोपीने हे वाहन रात्रीच्या सुमारास चोरून नेल्याची घटना उघडकीस आली होती. याबाबत दर्यापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, पोलिसांनी शोधमोहिम राबवून वाहनाचा माग काढला असता, गणेशपूर हद्दीत सदर टेम्पो बंद अवस्थेत सोडून दिलेला मिळून आला. ही कारवाई ठाणेदार सुनिल वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक गोरे, पोहेका सिद्धार्थ आठवले, व पोका सागर चव्हाण यांनी केली. या घटनेमुळे अवैध रेती वाहतूक आणि त्यानंतर वाहन चोरीच्या घटनांबाबत प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दरम्यान, चोरट्यांचा शोध सुरू असून दर्यापूर पोलिस पुढील तपास करत आहेत.

### बोलीभाषा म्हणजे समतेचा

माध्यम म्हणजे बोलीभाषा.' प्रत्येक प्रांत, जाती, धर्माचे लोक आपापल्या बोलीतून संवाद साधतात, आणि त्यातून सामाजिक समता व आपलेपणा वाढतो. बोलीभाषा ही फक्त संवादाचे साधन नसून ती समाजाच्या मनो भूमीचा आरसा आहे, असे त्यांनी नमूद केले. काशीनाथ बऱ्हाटे (अमरावती) बऱ्हाटे यांनी बोली भाषेच्या माध्यमातून समतेच्या विचारांची परंपरा जपली गेल्याचे अधोरेखित केले. ते म्हणाले, 'समतेचा विचार संतपरंपरे पासून ते संविधाना पर्यंत सतत प्रवाही राहिला, आणि त्या प्रवाहाचे माध्यम म्हणजे लोकभाषा.' वर्णवर्चस्ववादी प्रवृत्तीला संतांनी लोक भाषेतून प्रत्युत्तर दिले.

# देशाला समतावादी आणि लोकशाहीवादी संविधान मिळाले

## -कॉंग्रेस प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर

**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेवरची निवडणूक भारताच्या इतिहासात एक महत्वपूर्ण घटना होती. त्यांच्या संविधान सभेतील प्रवेशामुळे देशाला एक समतावादी आणि लोकशाहीवादी संविधान मिळाले, असे प्रतिपादन प्रदेश कॉंग्रेस कमिटी सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केले आहे.

स्थानिक भिमज्योत मंडळ फ्रेजरपुरा येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या प्रभागाचे निरीक्षक तथा प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी वैभव देशमुख, समीर जवंजाळ, शिल्पा राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



बैठकीस जयश्री डाहाके, सलीम मिरावाले, वंदना थोरात, पंकज मेश्राम, विजय खंडारे, हेमंत वानखेडे, आशिष यादव, शुभम बांबल, मुकेश लालवाणी, अनिल चव्हाण, मंगेश मोरे, मधुमती गजभिये, अश्विनी महाजन, सुभाष महाजन, योगेश रोडगे उपस्थित होते.

सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५
E-paper-www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



कार्तिकी एकादशीच्या शुभदिनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सहकुटुंब शासकीय महापूजा केली.

# आरोप, टीकेला आम्ही कामातून, विकासातून उत्तर देतो

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विरोधकांना उत्तर




**पंढरपूर :** 'विरोधकांच्या आरोपाला, टीकेला आम्ही कामातून, विकासातून उत्तर देतो. विकास, विकास आणि विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यामुळे आम्हाला विधानसभेत लँडस्लाइड यश मिळाले,' असे म्हणत महाविकास आघाडीच्या नेत्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले. 'जनतेचे प्रश्न सोडवणे, शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे हे सरकार आहे,' असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कार्तिकी एकादशीची शासकीय महापूजा पंढरपूर येथे झाली. येथील श्री विठ्ठल मंदिरात छोटेखानी कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, भरत गोगावले,आमदार समाधान आवताडे, शरद पवार गटाचे माढ्याचे आमदार अभिजित पाटील आदी उपस्थित होते. या वेळी विरोधक मोर्चा काढून मतदारयाद्यांवरून सरकारला लक्ष्य करत आहेत, याबाबत विचारले असता, शिंदे म्हणाले, 'खरे तर आज विठ्ठलाची मनोभावे पूजा करण्याचा मान मिळाला. राजकीय भाष्य अधिक करणार नाही. मात्र, मी मुख्यमंत्री असताना रखडलेल्या विकासाला गती दिली.

अनेक कल्याणकारी योजना आणल्या. मुखमंत्री लाडकी बहीण योजना आजही राबवली जात आहे. आता देवेंद्रजी यांच्या नेतृत्वात सरकार काम करत आहे. आम्ही कामातून विरोधकांना उत्तर देतो.'

'आम्ही राज्यातील जनतेसाठी काम करतो. विकासाची भूमिका घेऊन आम्ही काम करत आहोत. त्यामुळे जे आरोप, टीका करतात, त्यांना आम्ही कामाने उत्तर देतो. अजून पाऊस सुरू आहे. बळीराजा संकटात आहे. अशा वेळी सरकार बाजीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. त्यांच्यासाठी विशेष पॅकेज जाहीर केले असून, शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ पैसे जमा होत आहेत. आमचा अजेंडा केवळ विकास, विकास आणि विकासच आहे.

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कामाच्या जोरावर महायुतीला राज्यात चांगले यश मिळेल.' असेही या वेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

'पंढरपूरची चंद्रभागा नदी वारकऱ्यांची पवित्र गंगा आहे. ही चंद्रभागा कायमस्वरूपी प्रदूषणमुक्त व्हावी, यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून नगरविकास खात्याने चंद्रभागा प्रदूषणमुक्तीसाठी १२० कोटी रुपयांच्या निधीतून पहिल्या टप्प्यातील कामे सुरू केली आहेत. यामधून पंढरपूर शहरामध्ये ड्रेनेजसह मैलामिश्रित येणारे पाणी बंद केले जाणार आहे,' अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.'राज्यातील जनतेला, बळीराजाला समाधानी ठेव,' असे साकडे विठूराया चरणी घातले असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

# राज ठाकरेंची पोस्ट चर्चेत; 'धर्माच्या नावाखाली लोकांना आंधळे केले की'

**मुंबई** -मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सत्याच्या मोर्चामध्ये उद्धव ठाकरेंसह दिसले. या मोर्चात त्यांचा पुढाकार होता. त्यांनी केलेल्या ट्रेन प्रवासाचीही चर्चा रंगली होती. यानंतर आता राज ठाकरेंनी एक पोस्ट लिहिली आहे. ही पोस्ट पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाबाबत आहे. महेश मांजरेकर यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. या पोस्टमध्ये चित्रपटाचं कौतुक राज ठाकरेंनी केलं आहे पण सत्ताधारी पक्षाला चिमटे काढले आहेत.

काय आहे राज ठाकरेंची पोस्ट?

मी दोन दिवसांपूर्वी, माझे मित्र आणि एक उत्तम दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचा, 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा चित्रपट पाहिलाष्ठ समकालीन सिनेमा हा शब्द सहज वापरला जातो पण तो अनेकदा असतोच असं नाही पण खरा समकालीन, किंवा आत्ताच्या परिस्थिती वरचा चित्रपट बघायचा असेल तर 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटाला पर्याय नाहीष्ठ

**धर्माच्या नावाखाली लोकांना आंधळं केलं..**

आज फक्त मोठे मोठे महामार्ग, पूल (ज्यावर काही महिन्यात खड्डे पडतात ) आणि चमकदार घोषणा म्हणजे 'विकास' अशी कल्पना सत्ताधाऱ्यांनी रुजवली आहे. यांत बाकी कोणाचा विकास होतो की नाही माहित नाही पण सत्ताधाऱ्यांचा



विकास नक्की होतो. हे केलं आणि धर्माच्या नावावर लोकांना आंधळं केलं की मग शेतकरी असो की इथला मराठी माणूस यांना हवं तसं वापरून फेकून द्यायला हे मोकळे.

**राज्यातील शेतकरी हतबल झाला आहे**

या राज्यातील शेतकरी तर पार हतबल आहे.

एका बाजूला पाऊस झोडपतो आणि दुसऱ्या बाजूला सरकारी यंत्रणा अनास्थेने झोडपते.. याच महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या मुलांना एकत्र करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य उभं केलं, त्याच महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करतो हे भीषण दुर्दैव आहे. एका बाजूला ग्रामीण भागात शेतकऱ्याला इतकं जेरीस आणायचं की त्याला जमीन विकावीच लागेल आणि दुसरीकडे शहरात मराठी माणसांनाच घरं नाकारायची, त्यांच्या भाषेचा अपमान करणाऱ्यांना अभय द्यायचं, त्यांनी काय खायचं ? काय नाही खायचं यावर बंधन आणणाऱ्यांचे लाड करायचे हे सुरु आहे.

**चित्रपट जरुर पाहण्याचंही आवाहन**

हे सगळं मराठी माणसाला दिसत नाहीये का ? दिसत असेल हीष्ठ पण जोपर्यंत तुमच्या मनात याविरोधात चीड निर्माण होणार नाही, आग निर्माण होणार नाही, तोपर्यंत परिस्थिती बदलणं सोडा अजून भीषण होईल. या सिनेमातून ही चीड महेश मांजरेकर, त्यांचे कलाकार आणि त्यांचे लेखक यांनी उत्तम मांडली आहे. हा फक्त चित्रपट नाही तर या टीमच्या मनातील अस्वस्थता आहे. ही अस्वस्थता महाराष्ट्रातील जनतेने अनुभवयाला हवी. त्यासाठी माझं तुम्हाला आवाहन आहे की 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा चित्रपट जरूर पहा अशी पोस्ट राज ठाकरेंनी केली आहे.

पुन्हा शिवाजीराजे भोसले हा चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केलं आहे.

# 'शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात असे वाटते का?'

## अजित पवारांवर प्रकाश आंबेडकरांचा संताप



**मुंबई** - शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा सध्या राज्यात चर्चेत आला आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांनी नागपुरात केलेल्या आंदोलना नंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'सारखंच फुकटात कसं मिळेल?' असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उपस्थित केला. शेतकरी कर्जमाफी वारंवार कशी मिळेल? असा प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, शेतकऱ्यांनी सारखंच कर्ज फुकटात मिळण्याची सवय लावून घेऊ नये. तुम्ही देखील हातपाय हालवा. यावरुन आता विरोधक अजित पवारांवर टीका करू लागले आहेत. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी अजित पवार यांना प्रश्न विचारला आहे की 'राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात असं तुम्हाला वाटतं का?' प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर यासंदर्भात एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की 'अजित पवार, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात असे वाटते का तुम्हाला? तुम्ही म्हणालात, 'सरकार शेतकऱ्यांचे कर्ज किती काळ माफ करत राहणार?' पण खरा प्रश्न असा आहे की, तुम्ही आणि तुमचे सरकार शेतकऱ्यांचे हक्क किती काळ नाकारत राहणार? कधीपर्यंत हजारो कोटी रुपयांचे कॉर्पोरेट कर्ज माफ केले जाईल आणि शेतकऱ्यांच्या मदतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातील?'.

# महिला विश्वचषकाच्या अंतिम लढतीसाठी डीवाय पाटील स्टेडियम परिसरात क्रीडा रसिकांची गर्दी



**नवी मुंबई-** डॉक्टर डी वाय पाटील स्टेडियमवर रविवारी दुपारी होणाऱ्या महिलांच्या एक दिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यासाठी प्रेक्षकांनी सकाळपासूनच स्टेडियम परिसरात गर्दी केली आहे. तसेच नेरूळ येथील डॉक्टर डी वाय पाटील स्टेडियमच्या परिसरात भारतीय खेळाडूंची जर्सी, टोपी तसेच तिरंगी झेंडा घेण्यासाठी स्टेडियमच्या परिसरात झुंबड उडत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दुपारी सुरू होणाऱ्या सामन्यापूर्वी स्टेडियम परिसरात नवी मुंबई पोलिसांनी चोख व्यवस्था ठेवली आहे.

भारतीय महिला संघाने यापूर्वी २००५ व २०१७ च्या विश्वचषकाची अंतिम फेरी गाठली होती. परंतु त्यांना विजयश्री खेचून आणता आली नाही.

त्यामुळे नवी मुंबईतील डॉक्टर डी वाय पाटील स्टेडियम वर घरच्या मैदानावर होणाऱ्या अंतिम सामन्यात भारतीय संघाला घरच्या प्रेक्षकांचा मोठा पाठिंबा मिळणार असून यंदा महिला विश्वचषक प्रथमच जिंकण्याची आशा क्रीडा रसिक ठेवून आहेत.


अंतिम सामना रंगणाऱ्या डी . वाय पाटील स्टेडियम परिसरात भारतीय तिरंगा झेंडा १०० ते २०० रुपये तसेच भारतीय खेळाडूंची जर्सी २०० रुपये व भारतीय खेळाडूंची टोपी १०० ते दीडशे रुपये स्टेडियम परिसरात विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी उपस्थित असलेल्या क्रीडा रसिकांची मोठी गर्दी या परिसरात पाहायला मिळत आहे.

# अजित पवारांच्या आमदाराने जाहीर केल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तारखा

**बारामती** - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून राज्य निवडणूक आयोग पुढच्या आठवड्यात नगरपालिका, नगर पंचायत निवडणुकांची घोषणा करेल अशी अपेक्षा आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीची घोषणा होईल. त्यानंतर पुढील २१ दिवसांत या निवडणुका पार पडतील. त्याचदरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकाही जाहीर केल्या जाणार आहेत. तर, अखेरच्या टप्प्यात महापालिका निवडणुका होतील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ३१ जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.

निवडणूक आयोगाने अद्याप या निवडणुकांच्या तारखा जाहीर केलेल्या नाहीत. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) आमदार दिलीप वळसे पाटील यांनी या निवडणुकीच्या तारखांबाबत अंदाज व्यक्त केला आहे. आंबेगाव व शिरूरमधील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात वळसे-पाटलांनी मोठी घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आंबेगाव-शिरूर आयोजित युवक-युवती मेळाव्यात ते बोलत होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले, '२०१७ साली महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या, महानगरपालिका, नगरपंचायत व नगर परिषदेच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर २०२२ मध्ये पुढच्या निवडणुका होणं अपेक्षित होतं. परंतु, राज्यात




ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटलेला नाही. हे प्रकरण उच्च न्यायालयात आणि पुढे सर्वोच्च न्यायालयात गेलं. तिथेही हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे या निवडणुका तीन वर्षे पुढे ढकलल्या गेल्या. दरम्यानच्या काळात आपल्या कार्यकर्त्यांनी निवडणुकांसाठी जी तयारी केली होती ती वाया गेली.

३१ जानेवारीपूर्वी सर्व निवडणुका पार पडणार

'आता राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात या निवडणुकांबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घ्यायच्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की वाट्टेल त्या परिस्थितीत ३१ जानेवारीपूर्वी या निवडणुका पूर्ण करायच्या आहेत.'

**कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश**


'आता दोन-तीन दिवसांनी निवडणुकीच्या तारखा जाहीर होणार असतील तर आपल्याला तयारी करावी लागेल. येथील स्थानिक निवडणुकीत १७ प्रभाग आहेत. त्यामुळे आपल्याकडून १७ लोकांना संधी मिळणार आहे. नगराध्यक्षांची निवड होणार आहे. सर्वांनाच संधी मिळणार नाही. ज्याला संधी मिळेल तो आपल्या पक्षाचा उमेदवार असेल. प्रत्येक उमेदवार हा घड्याळाचा (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) उमेदवार आहे हे लक्षात ठेवून तुम्ही कार्यकर्त्यांनी काम केलं पाहिजे.'

**दिलीप वळसे पाटलांनी जाहीर केल्या तारखा?**

दिलीप वळसे पाटील म्हणाले, 'माझ्या माहितीप्रमाणे नगरपंचायतीच्या निवडणुका चालू असतानाच जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर होतील. साधारणपणे १५ डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी मतदान होईल. त्याआधी नगरपंचायतीच्या निवडणुका होतील. जिल्हा परिषदेच्या निवडणुका चालू असतानाच महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होतील. १५ जानेवारीला त्यासाठीच मतदान होईल.

# संक्षिप्त

## यंदा नोव्हेंबर महिना थंडीचा नाही तर पावसाचा



**मुंबई :** नोव्हेंबर महिन्यात राज्यात किमान तापमान सरासरीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता हवा मान विभागाने वर्तवली आहे. परिणामी, राज्यात नोव्हेंबर महिन्यात थंडी कमी असेल. याचबरोबर देशातील अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

## कबुतरखान्यांच्या नवीन जागांना मराठी एकीकरण समितीचा विरोध



**मुंबई :** महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या सूचना व हरकतींच्या आधारे मुंबईत चार ठिकाणी कबुतरखाने सुरू करण्याची परवानगी दिली आहे. ठराविक वेळेत नियंत्रित पद्धतीने खाद्य टाकण्यात येणार असले तरीही या निर्णयाला मराठी एकीकरण समितीने विरोध केला आहे. आता चार ठिकाणे आहेत, मात्र, भविष्यात या ठिकाणांची संख्या हळूहळू वाढत जाण्याची भीती समितीकडून वर्तविण्यात आली आहे.कबुतरांना ठराविक वेळेत नियंत्रित पद्धतीने खाद्य टाकण्याबाबतच्या तीन अर्जांवर पालिकेने नागरिकांकडून सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यानंतर एकूण ९ हजार ७७९ सूचना व हरकती, तक्रारी आदी प्राप्त झाल्या. कबुतरखाना बंद करणे, सुरू ठेवणे, स्वच्छता राखणे, नियंत्रित पद्धतीने दाणे पुरवणे अशा सर्व पैलूंचा त्यात समावेश होता. त्यानुसार, महापालिकेने मुंबईत वरळी जलाशय, अंधेरीतील लोखंडवाला बॅक रोडवरील खारफुटी परिसर, मुलुंड येथील खाडीकडील परिसर आणि बोरिवलीतील गोराई मैदान आदी ठिकाणी कबुतरांना खाद्य टाकण्याची परवानगी दिली. सकाळी ७ ते ९ या वेळेत कबुतरांना दाणे पुरवता येणार आहेत. मात्र, पालिकेच्या या निर्णयावर मराठी एकीकरण समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## वाघिणीचा मार्ग रोखण्यासाठी वनखात्याचे चक्रव्यूह




**नागपूर :** मुल-चंद्रपूर मार्गावर केसलाघाटच्या रस्त्यावर वाहनांवर हल्ला करणाऱ्या वाघिणीचा मार्ग वनखात्याने बंद केला खरा, पण तिचा मार्ग रोखण्यासाठी वनखात्याने रचलेले चक्रव्युह ही वाघीण भेदणार की त्या चक्रव्युहात अडकणार हे मात्र नंतरच कळणार आहे.गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर केसलाघाट परिसरात 'के मार्क' नावाच्या वाघिणीने नागरिकांना अक्षरश: जेरीस आणले आहे. या वाघिणीने एका दुचाकीस्वाराला जखमी केले. तर दुचाकीवरुन जाणारे दाम्पत्य थोडक्यात बचावले. हे दाम्पत्य दुचाकीवरुन जात असतानाच मागून वाघीण आली आणि रस्ता ओलांडत दुसरीकडे गेली.

## दक्षिण पुण्यातील कात्रज बाह्यवळण मार्गावर हांडेवाडी चौकातील वाहतूक बदल



**पुणे :** कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्गावर असलेल्या हांडेवाडी चौकातील वाहतूक व्यवस्थेत प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदक करण्यात आले आहेत.कात्रज-मंतरवाडी बाह्य?वळण मार्गाचा वापर सासवड, तसेच हडपसरकडे जाणारी वाहने करतात. बाह्य?वळण मार्गावर उंड्री, पिसोळी, हांडेवाडी भाग आहे. या भागात गेल्या दहा वर्षात अनेक गृहप्रकल्प बांधण्यात आले आहेत. बाह्यवळण मार्ग अहोरात्र गजबलेला असतो. हांडेवाडी चौकात होणारी कोंडी, तसेच बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी या भागातील वाहतूक व्यवस्थेत प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदल करण्यात आले आहेत, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.श्रीराम चौक, जेएसपीएम महाविद्यालय, हांडेवाडी चौकातून कात्रज, तसेच हडपसर-सासवड रस्त्यावरील मंतरवाडी चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी डावीकडे वळावे. कात्रजकडून येणाऱ्या वाहनांनी मंतरवाडीकडे जाऊन जोगेश्वरी मिसळ येथून उजवीकडे वळावे. तेथून इच्छितस्थळी जावे. श्रीराम चौक, जेएसपीएम महाविद्यालय, हांडेवाडी चौकातून होळकरवाडी, कात्रजकडे जाणाऱ्या अवजड वाहनांनी डावकडे वळावे.

## 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर नाशिक जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर

**मालेगाव :** कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित आणि शेतकऱ्यांसाठी डिजिटल सल्लागार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असलेले महाविस्तार एआय हे ॲप शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत आहे. या ॲपचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा दिवसेंदिवस कल वाढत आहे. आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार हे ॲप वापरण्यात नाशिक जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे तर,नाशिक जिल्ह्याचा विचार करता मालेगाव तालुका अन्य तालुक्यांच्या तुलनेत सर्वात पुढे आहे. शेतकऱ्यांना सुलभ मार्गदर्शन लाभावे म्हणून कृषी विभागातर्फे महाविस्तार एआय हे ॲप विकसित करण्यात आलेले आहे. गेल्या २१ मेपासून हे ॲप कार्यान्वित झाले आहे. या ॲपद्वारे शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज, बाजार भाव, पीक नियोजन आणि कीड व रोग नियंत्रणासाठी कृषीविषयक माहिती मराठीमध्ये उपलब्ध करून दिली जात आहे. या ॲपमुळे आधुनिक शेती कशी करावी, पिकांसाठी कोणती खते व कीटकनाशकांचा वापर करावा आणि कोणती खते व कीटकनाशकांचा वापर टाळावा,याची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# गुन्हेगारी जाळ्यावर पोलिसांचा हल्ला!

# रिसोडमध्ये २० लाखांचा अमली व बनावट चलन साठा जप्त

## दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

**शहरातील अमरदास नगर परिसरात पोलिसांनी २ नोव्हेंबर रोजी मोठी कारवाई करत अमली पदार्थ, गांजा आणि बनावट नोटांचा प्रचंड साठा जप्त केला आहे. या धाडसी कारवाईत पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, एकूण १८ ते २० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या घटनेने शांत असलेल्या रिसोड शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीप्रमाणे, रिसोड शहरातील अमरदास नगर भागात ग्रे रंगाची बलेनो कार दीर्घकाळ संशयास्पदरीत्या उभी असल्याचे पोलिसांना गुप्त सूत्रांद्वारे कळले. माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड आणि मालेगाव पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी धाड टाकली.**

धाड टाकल्यानंतर कारची सखोल तपासणी करण्यात आली असता, पोलिसांना श्‍ेश सारखा पांढरा रंगाचा अमली पदार्थ, अंदाजे २ किलो गांजा, तसेच ३७८ पाचशे रुपयांच्या बनावट नोटा असा सुमारे १ लाख ८९ हजार रुपयांचा बनावट चलन साठा मिळून आला.



पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपींकडून ग्रे रंगाची बलेनो कार, दोन मोबाईल फोन, नगदी रक्कम, अमली पदार्थ आणि बनावट चलन असा एकूण १८ ते २० लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

पोलिसांनी घटनास्थळीच दोन्ही आरोपींना अटक करून त्यांची कसून चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक चौकशीत आरोपींचे संबंध राज्याबाहेरील काही अमली पदार्थ पुरवठादारांशी असल्याचे समोर येत असून, या प्रकरणाचे धागेदोरे राज्याबाहेर जोडलेले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल स्वतः घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जप्त केलेल्या मुद्देमालाची तपासणी करून पोलिसांना पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक सूचना दिल्या.

या प्रकरणाचा तपास रिसोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

उपविभागीय अधिकारी अग्रवाल यांनी सांगितले की, 'अमली पदार्थ आणि बनावट चलनविरोधी मोहीम सुरू असून, रिसोडमध्ये झालेली ही कारवाई या मोहिमेतील मोठे यश आहे. आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्याबाहेरील जाळे उघड करण्याचा प्रयत्न सुरू आहे.'

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींचे मोबाईल रेकॉर्ड आणि डिजिटल उपकरणे तपासली जात आहेत. बनावट चलन कुठून आणले गेले आणि कोणत्या मार्गाने अमली पदार्थ शहरात आणले गेले, याचा तपास सुरू आहे. तसेच जप्त केलेल्या पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. प्राथमिक अहवालानुसार जप्त केलेला पांढरा पदार्थ श्‍ेश (एक्स्टसी वर्गातील मादक द्रव्य) असल्याची शक्यता आहे.

या प्रकरणात आरोपींचे सहकारी अन्य शहरांत किंवा राज्याबाहेर सक्रिय असल्याचे संकेत पोलिस तपासात मिळत असून, लवकरच आणखी काही अटक होण्याची शक्यता आहे.नरिसोड शहर हे शांत व व्यापारी दृष्ट्या वाढत असलेले केंद्र मानले जाते. परंतु अलीकडच्या काळात अमली पदार्थांच्या विक्रीच्या तक्रारी वाढत असल्याची माहिती नागरिकांकडून पोलिसांकडे पोहोचत होती.

ही कारवाई झाल्याने पोलिसांनी नागरिकांचा विश्वास जिंकला असून, शहरात अशा प्रकारच्या कारवायांनी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवले जाण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. या धाडसी कारवाईत उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे विशेष पथक, रिसोड व मालेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. त्यांनी गोपनीयतेने ही मोहीम पूर्ण करत आरोपींना घटनास्थळीच ताब्यात घेतले. पथकातील सर्व अधिकाऱ्यांचे वरिष्ठांकडून कौतुक करण्यात येत असून, रिसोड पोलिसांच्या दक्षतेचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. रिसोड शहरात घडलेली ही घटना स्थानिक प्रशासन आणि नागरिकांसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. बनावट चलन आणि अमली पदार्थ हे दोन्ही गुन्हे सामाजिक व आर्थिक स्थैर्याला धक्का देणारे आहेत.

या प्रकरणाचा तपास पुढील काही दिवसांत राज्याबाहेरील मोठ्या जाळ्यापर्यंत पोहोचेल, अशी पोलिसांची शक्यता आहे. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, संशयास्पद हालचाली अथवा व्यक्ती आढळल्यास त्वरित स्थानिक पोलिसांना कळवावे. रिसोड पोलिसांची वेळेवर केलेली कारवाई ही स्थानिक कायदा व सुव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरली असून, आगामी काळात अशा कारवाया अधिक तीव्रतेने राबविण्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला आहे.

---

# शिरपूर शहरात उर्स उत्सवादरम्यान तरुणावर धारदार हत्याराने जीवघेणा हल्ला

## एक आरोपी अटकेत, इतरांचा शोध सुरू

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मालेगाव तालुक्यातील शिरपूर शहरात सुरू असलेल्या श्री मिर्झा मिया यांच्या उर्स उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असतानाच शुक्रवारी (दि. १ नोव्हेंबर) सायंकाळी झालेल्या एका गंभीर घटनेने शहर हादरले. बसस्थानकाजवळ झालेल्या किरकोळ वादातून तिघा तरुणांनी एका तरुणावर लाथाबुक्यांनी मारहाण करून धारदार हत्याराने जीवघेणा हल्ला केला. या घटनेनंतर पोलिसांनी तत्परतेने कारवाई करून एक आरोपी ताब्यात घेतला असून इतर दोन आरोपींचा शोध सुरू आहे.

फिर्यादी विशाल गोपाल देशमुख (वय २३, रा. शिरपूर) हे आपल्या मोटारसायकलवरून सायंकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास शेताकडे जात होते. बसस्थानक चौकात उर्साच्या कार्यक्रमामुळे गर्दी असल्याने त्यांनी वाहनाचा हॉर्न वाजविला. यावरून रस्त्याने चालत असलेल्या तीन युवकांनी त्यांच्याशी वाद घातला आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली.



या दरम्यान त्यापैकी एका आरोपीने धारदार हत्याराने विशाल यांच्या पोटावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

जखमी विशाल देशमुख यांना तात्काळ अकोला येथील ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच प्रत्यक्षदर्शींची चौकशी करून प्रकरण उघडकीस आणले. गुन्ह्यातील एक आरोपीला पोलीसांनी अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. प्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, आणि सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा वाशिम आणि शिरपूर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने केली.

या तपास पथकात पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी (स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम), पोलीस निरीक्षक केशव वाघ (पो.स्टे. शिरपूर), सपोनि जगदीश बांगर, पोउपनि शेखर मासकर, पोहेका गजानन झगरे, दिपक घुगे, अमोल इरतकर, विजय नागर, बालाजी महले, संदीप निखाडे, रामेश्वर जोगदंड, गुरुदेव वानखेडे, करुणाशील तायडे, इम्रान पठाण, राहून चव्हाण, हरीहर गावंडे, कैलास बळी, गणेश देशमुख, सतीष चव्हाण आदींचा समावेश आहे.पोलीस दलाच्या तत्परतेमुळे आरोपींपैकी एकाला ताब्यात घेण्यात यश आले असून उर्वरित आरोपींना लवकरच अटक करून कठोर कारवाई करण्यात येईल.

---

# जिल्हा मुलांचा संघ उपविजेता १३ वी सब-ज्युनिअर चॉकबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

१३ वी सब-ज्युनिअर चॉकबॉल स्पर्धेमध्ये वाशिम जिल्ह्याच्या मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळ करत दुसरा क्रमांक पटकावला. संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम प्रदर्शन करून संघाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. अंतिम सामन्यात ठाणे संघाविरुद्ध चुरशीची लढत देत संघाला अल्प फरकाने पराभव स्वीकारावा लागला.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा सचिव अजय अंभोरे सर यांनी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन करत खेळाडूंचे कौतुक केले. स्पर्धेमध्ये पंच म्हणून वाशिमचे राहुल कंठाळे आणि रोहित पुंडगे यांनी पंच मंडळावर उत्कृष्ट कामगिरी बजावली. संघाचे मार्गदर्शन प्रशिक्षक .अनमोल पुंडगे यांनी केले, तर संघ व्यवस्थापक पीयूष इडोळे यांनी संघाचे उत्कृष्ट नियोजन केले. दरम्यान, मुलींच्या गटात वाशिम जिल्हा संघाने चांगला खेळ सादर केला असला तरी संघाला पराभव स्वीकारावा लागला. त्या संघाच्या प्रशिक्षक म्हणून नेहा जामनिक, तर संघ व्यवस्थापक वैष्णवी दोणतकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या दोन्ही संघांच्या कामगिरीमुळे वाशिम जिल्ह्याचा चॉकबॉल खेळातील लौकिक अधिक उजळला आहे.

---

# माध्यमिक शिक्षकेतर संघटनेची वाशीम तालुका कार्यकारिणी गठीत

## तालुका अध्यक्षपदी संजय ठाकरे तर सचिवपदी निलेश तिवारी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

माध्यमिक शिक्षकेतर संघटनेची वाशीम तालुका कार्यकारिणी गठीत करण्यात आली. शिक्षकेतर संघाचे जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली मालतीबाई सरनाईक विद्यालय वाशीम येथे शनिवारी सभा पार पडली.

या सभेत तालुका कार्यकारिणी गठीत करण्यात आली. या सभेत वाशीम तालुका अध्यक्षपदी संजय ठाकरे, सचिवपदी निलेश तिवारी यांची निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी मध्ये कार्याध्यक्षपदी अभिजीत पसारकर, उपाध्यक्षपदी धीरज लवंडे, देवानंद काटेकर, विजय मुसळे, करुणाताई बंडेवार, सहसचिव पदी विठ्ठल सोमटकर, कोषाध्यक्षपदी मनीष मखमले, तालुका



संघटकपदी महादेव मुसळे, प्रथमेश पाटील, परमेश्वर राठोड, सुभाष करवते तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून रामप्रसाद खंडारे यांची निवड करण्यात आली.

निवडणूक प्रमुख म्हणून जिल्हा शिक्षकेतर संघाचे सचिव रामराव कायंदे यांनी काम पाहिले. यावेळी जिल्हा शिक्षकेतर संघाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल काळे,उपाध्यक्ष आनंद पेंटे, जयंत सरनाईक,महादेव धुळधुळे, कोषाध्यक्ष अमोल मोहोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हा सचिव रामराव कायंदे यांनी शिक्षकेतर संघटनेची गरज या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून संघटन आवश्यक आहे. संघटने शिवाय प्रश्न सुटणार नसून शिक्षक आमदारांनीसुद्धा संघटनेची दखल घेतल्याचे आवर्जून सांगितले. सभेचे संचालन मनीष मखमले यांनी केले.

---

# आचार्य गोविंद गिरी महाराज यांच्या उपस्थितीत सत्संग सोहळा



**वाशिम :** राम जन्मभूमी अयोध्या मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष, वेद शाळा चे संस्थापक पालक व अनेक गोशाळाचे पालकत्व स्वीकारणारे आचार्य गोविंद गिरीजी महाराज यांच्याशी जल योद्धा वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्प संघर्ष समिती अध्यक्ष हरीश सारडा यांनी पुणे येथे भेट घेऊन सामाजिक व धार्मिक अध्यात्मिक विषयावर चर्चा केली लवकरच त्यांच्या प्रबोधनाचा लाभ वाशिमकराला मिळणार आहे.

---

# पोहरादेवीत सुरक्षा रक्षकाला मारहाण

## 'मंत्र्याचे माणूस' असल्याचा धाक दाखवत तिघांकडून गोंधळ

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

प्रसिद्ध पोहरादेवी नगारा भवन परिसरात दर्शनासाठी आलेल्या गर्दीत शिस्त राखण्याच्या प्रयत्नात असलेल्या सुरक्षा रक्षकाला तिघांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. ही घटना २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली असून, २७ ऑक्टोबर रोजी मानोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार डिगांबर देवसिंग चव्हाण (वय २५, रा. आसोला खु) हा मागील पाच महिन्यांपासून पोहरादेवी नगारा भवनात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे. घटनेच्या दिवशी दर्शनासाठी मोठी रांग लागली होती. यावेळी 'मंत्र्याचे माणूस आहोत' असे सांगणाऱ्या तिघांनी रांग मोडण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षकाने त्यांना नियमांचे पालन करण्यास सांगितल्याने ते संतापले आणि अश्लील शिवीगाळ करत चव्हाण यांना मारहाण केली.

यानंतर आरोपी काही वेळाने पुन्हा बाहेर येऊन सुरक्षा रक्षक आणि सहकारी गुणवंत राठोड यांच्याशी हुज्जत घालू लागले. गोंधळाच्या दरम्यान एका आरोपीचा तोल जाऊन तो स्वतः जखमी झाला. घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली.

चौकशीत लखन भाऊराव राठोड (रा. वाईलींगी, ता. दिग्रस) याचे नाव आरोपींपैकी एक म्हणून समोर आले असून, इतर दोन आरोपींची नावे अद्याप उघड झालेली नाहीत. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

धार्मिक स्थळावर अशा प्रकारचा गोंधळ आणि हिंसाचार झाल्याने भाविकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिस बंदोबस्त वाढवावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

---

# मातंग समाजाची नियोजन बैठक उत्साहात पार

**मालेगाव :** आद्य क्रांतिवीर गुरुवर्य लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३१व्या जयंतीनिमित्त मातंग समाज बांधवांची नियोजन बैठक मालेगाव येथील विश्रामगृहात मोठ्या उत्साहात पार पडली. समाजातील ऐक्य, संघटन आणि युवकांच्या सहभागावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.बैठकीत जयंती निमित्त आयोजित होणाऱ्या विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित करण्यात आली. समाजातील शिक्षण, एकोपा आणि संघटन बळकट करण्यासाठी पुढील काळात ठोस उपक्रम राबविण्याचा निर्णय उपस्थितांनी घेतला.

---

# सरदार पटेल जयंती निमित्त 'वॉक फॉर युनिटी' उपक्रम; कारंजेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरी केली जाणार आहे. यानिमित्त वाशिम जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाच्यावतीने कारंजा पोलीस स्टेशन स्तरावर 'वॉक फॉर युनिटी' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. त्याला कारंजेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.वाक फॉर युनिटी या उपक्रमाचे उद्दिष्ट समाजात एकता, बंधुता आणि सौहार्दाचा संदेश पोहोचविणे हे आहे. वाशिम पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी, कारंजा शहर ठाणेदार दिनेशचंद्र शुक्ला, ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी ठाणेदार संतोष इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला. यावेळी डॉक्टर पंकज काटोले उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी प्रदीप पाडवी यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. कारंजा बायपास येथून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.पुढे जाणता राजा चौक, शिवाजी महाराज चौक,स्टेट बँक चौक, पोहावेस, जाणता राजा व परत बायपास या शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या एकता फेरीतून संदेश दिला.

---

# आधुनिक शिक्षणासाठी मदरशांकडून अर्ज मागविण्यात आले

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना २०२५-२६ अंतर्गत ज्या मदरशांमध्ये केवळ पारंपारिक धार्मिक शिक्षण दिले जाते आणि ज्यांना आधुनिक शिक्षणासाठी शासकीय अनुदान घ्यायचे आहे, अशा मदरशांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर मदरसे चालवणाऱ्या संस्था धर्मदाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. इच्छुक मदरशांनी शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१०/प्र.क्र.१५२/१०/का.६ दिनांक १९ ऑक्टोबर २०१३, तसेच २२ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी आणि दि. २१ ऑगस्ट २०२४ च्या शुद्धीपत्रकानुसार पायाभूत सुविधांसाठी रु. १० लाखांचे अनुदान देय आहे.

तथापि, यापूर्वी ज्या उद्देशासाठी अनुदान मिळाले आहे, त्या उद्देशासाठी पुन्हा अनुदान देण्यात येणार नाही.

सदर योजनेअंतर्गत मदरशांनी शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, वाशिम येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील.

निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.

शासन निर्णय आणि परिपत्रकातील पात्रतेच्या निकषांचे पालन न करता सादर करण्यात आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

संबंधित संस्थांनी याची नोंद घ्यावी. असे कळविले आहे.

---

# राष्ट्रीय समाज पक्षाची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

फलटण (जि. सातारा) येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली असून, त्यांच्या तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेबाबत राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी वाशिम यांना निवेदन देऊन सखोल चौकशी व एसआयटीची स्थापना करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, डॉ. संपदा मुंडे यांनी आपल्या सुसाईड नोटमध्ये पीएसआय गोपाळ बदने यांनी चार वेळा बलात्कार केला आणि प्रशांत



बनकर यांनी शारीरिक व मानसिक छळ केला, असा गंभीर आरोप केला आहे. एक महिला सरकारी डॉक्टर अशी पाशवी वागणूक सहन करत होती आणि शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागला, ही बाब अत्यंत वेदनादायक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अजयसिंह विजयसिंहराव राजुरकर यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणाची चौकशी निष्पक्षपणे व्हावी आणि दोषींना राजकीय किंवा प्रशासकीय पाठींबा मिळू नये. 'या प्रकरणात एसआयटीची स्थापना करून सखोल तपास व्हावा, खरा गुन्हेगार कोण आहे हे समोर यावे आणि डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळावा,' अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. नागरिकांमध्ये या प्रकरणामुळे तीव्र संताप असून, महिला डॉक्टरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. समाजातील सर्व घटकांनी यावर गंभीरपणे विचार करण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३४ ■ सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पक्षांचं अजून ठरतंय, पण उमेदवारांचं ठरलंय

## -जिल्ह्यात राजकीय लग्नाची लगबग प्रत्येक गटात उमेदवारांची बुकिंग सुरू

**रवींद्र लाखे**

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यात राजकारणाचं लग्नसरू हंगाम सुरू झालाय. अद्याप वरमाला कोणाच्या गळ्यात घालायची हे पक्षांनी ठरवलेलं नाही, पण उमेदवार मात्र वरात निघाल्यासारखे सजून राजकीय स्टेजवर आपली हजेरी लावत आहेत.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीचं रणशिंग कधी वाजेल याची वाट बघत बसण्याऐवजी अनेक इच्छुकांनी रितसर तयारी सुरू केली आहे. पक्षांचं व्हायचं ते होईल, पण उमेदवारांनी मात्र आमचं तर ठरलंय असं म्हणत राजकीय डोमवर नाचायला सुरुवात केली आहे.

जिल्हाभर सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी, भाजप, काँग्रेस आणि कुठेकुठे शिवसेना असे पाचही बाराती मंडपात हजेरी लावत आहेत. पण या सगळ्यांचा वर वधूचा निर्णय मात्र अजून थांबलेला आहे. महायुती टिकेल का नाही? महाविकास आघाडी राहील का तुटेल? की काही जण नवीन घराणेशाही आघाडी काढतील हे सारेच अजून धुरकट आहे. राजकीय लग्न मंडप तयार आहे, पण फेऱ्या कोण घेणार यावरूनच गोंधळ माजलाय.चार विधानसभा मतदारसंघाचा समावेश असलेल्या वर्धा जिल्ह्यात राजकारण म्हणजे एक गाव दोन आमदार, तीन गटप्रमुख आणि चार बंडखोर. आर्वी विधानसभा क्षेत्रातील दोन्ही आमदार एकाच गावचे असूनही एकमेकांशी थंडयुद्धात आहेत.



दोघांचे वेगळे बैठकी घेणं हे तर राजकीय संगीत समारंभा सारखं सुरू झालं आहे. हे दोघे शेवटी एकत्र येणार की स्वतंत्र लग्नसोहळे उभारणार हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

पूर्वी काँग्रेस-भाजपची थेट दोनतोंडी लढत पाहिली जायची. पण आता काँग्रेस जमिनीवर नाही आणि भाजपने गावात गाणं मंद केलंय. त्यामुळे मैदानात राहिलीय ती राष्ट्रवादीची जोडी, आणि त्या जोडीचे दोन वेगळे स्टेज. अजितदादा यांच्या राष्ट्रवादीतून एकमुखी नेतृत्वाचा अभाव दिसतो आहे, तर शरद पवारांच्या गटात जुनी फौज नवी शर्ट घालून पुन्हा मैदानात उतरण्याची तयारी करतेय. काही ठिकाणी दुरंगी, काही ठिकाणी तिरंगी, तर काही ठिकाणी चौरंगी लढती दिसणार हे निश्चित आहे.

गावे-गावांमध्ये सध्या पोस्टर वॉर सुरू आहे. कुणाच्या पोस्टरवर छायाचित्र मोठं, तर कुणाचं नाव मोठं. कार्यकर्त्यांकडे मांडव सजवण्याचं काम चालू असून, नेतागिरीचा गजर गावागावात सुरू आहे. कुणी ईश्वरभक्ती दाखवून देवळात लंगर वाटतंय, तर कुणी फुटबॉल स्पर्धा घेऊन युवावर्गाला जिंकण्याचा प्रयत्न करतोय.एकंदरीत काय, पक्षांचे ठरायचे ते ठरतील, पण उमेदवारांचं लग्न मात्र बुक झालं आहे. बस आता निवडणुकीचं मुहूर्तनिश्चय व्हायचा राहिलाय; बाकी मंडप सजलाय, बँड सुरू झालाय आणि बारातदार हजर आहेत.

### सोयाबीन खरेदी प्रक्रियेला सुरुवात

# सरकारकडून नाफेड आणि फेडरेशनला आदेश; शेतकरी नोंदणीस उत्सुक

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** कर्जमुक्ती आंदोलन शमल्यानंतर अखेर सरकारने सोयाबीन खरेदीसाठी नाफेड आणि विदर्भ मार्केटिंग फेडरेशनला आदेश दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिवळ्या सोन्याच्या खरेदीला सुरुवात होणार आहे. सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांना आपली उत्पादन नोंदणी सिंदी खरेदी-विक्री सहकारी संस्थेच्या सेलू येथील कार्यालयात करावी लागेल. तर सिंदी तालुक्यातील शेतकऱ्यांनी यंदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातच १५ डिसेंबरपर्यंत नावे नोंदवावीत, असे सांगण्यात आले आहे. गतवर्षी झडशीसह तीन केंद्रांवरून सुमारे ३६ हजार किलो सोयाबीनची खरेदी झाली होती. मात्र या वर्षी झडशी केंद्राचा उल्लेख आदेशात नाही. सध्याचा हंगाम पावसात सापडल्याने सोयाबीनचा रंग बेरंगी झाला असून



सरासरी उतारी दीड ते दोन क्विंटल प्रतिएकर इतकी निघत आहे. नोंदणीला १ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी १४ शेतकऱ्यांनी खविस कार्यालयाशी संपर्क साधला असल्याची माहिती सहव्यवस्थापक पवार यांनी दिली. प्रशासनाकडून नोंदणीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

# बसस्थानकातील महिलांच्या शौचालयात नवजात शिशुचा मृतदेह

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील बसस्थानक परिसरात शनिवारी दुपारी महिलांच्या शौचालयातील प्लास्टीक कचराकुंडीत नवजात शिशुचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात आईविरुद्ध अपत्य जन्माची लपवणूक आणि मृतदेहाची विल्हेवाट लावल्याचा गुन्हा दाखल केला आहे.पोलीस उपनिरीक्षक दीपक नामदेराव वानखेडे यांच्या फिर्यादीनुसार, बसस्थानकावरील प्रवासी महिलांनी शौचालयात एका नवजात पुरुष शिशुचा मृतदेह आढळल्याची माहिती दिली.

त्वरित पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृत अवस्थेतील हे बालक रुग्णालयात पाठवून वैद्यकीय तपासणी करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या पोस्टमार्टममध्ये शिशु मृत अवस्थेत जन्मल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी परिसरातील सर्व प्रसूती केंद्रे, आशा वर्कर आणि त्या भागातील गर्भवती महिलांची सखोल चौकशी केली. मात्र, संशयित आईबाबत कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही.घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसल्याने तपासास अडथळा निर्माण झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार श्रीकांत खडसे करीत आहेत.

### कौंडण्यपूरात ६ नोव्हेंबरला भक्तिमय महाप्रसाद सोहळा

# संत अच्युत महाराजांच्या प्रेरणेने वामनराव दिवे यांच्या स्मरणार्थ कार्यक्रम

**कौंडण्यपूर जनमाध्यम :** विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे यंदाही भक्तिरस ओसंडून वाहणार आहे. वंदनीय प.पू. श्री संत अच्युत महाराज यांच्या प्रेरणेने स्वर्गीय वामनराव विठ्ठलराव दिवे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ, गुरुवार दि. ६ नोव्हेंबर रोजी 'शिवभवन' येथे महाप्रसाद सोहळा आणि वारकरी दिंड्यांच्या स्वागताचा कार्यक्रम होणार आहे.कार्तिक यात्रेच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सोहळ्यामुळे तिर्थक्षेत्रात आधीपासूनच भक्तिगर्जना सुरू झाली आहे. प.पू. आचार्य सदगुरु श्री जितेन्द्रनाथ महाराज (पिठाधीश्वर, श्रीनाथपीठ श्रीदेवनाथमठ, श्री क्षेत्र सुर्जी अंजनगाव) आणि श्री संत सचिन देव महाराज यांच्या उपस्थितीने कार्यक्रम अधिक मंगलमय होणार आहे.

सर्व भाविकांना सहकुटुंब या पवित्र दिवशी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती पुष्पलता वामनराव दिवे, दिवे व देशपांडे परिवार आणि सुधीर दिवे यांनी केले आहे. यात्रेतील भाविकांसाठी बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी 'शिवभवन' येथे मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### माहिती अधिकारासाठी संघटनबद्ध पाऊल

# वर्धा जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाची कार्यकारिणी जाहीर

**वर्धा जनमाध्यम :** माहिती अधिकार दिनानिमित्त वर्धा जिल्ह्यात वर्धा जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ या संघटनेची स्थापना करण्यात आली असून, नुकत्याच झालेल्या सभेत संघटनेच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

हॉटेल हरीराम टॉवर येथे झालेल्या या बैठकीस जिल्ह्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली. सभेत सर्वानुमते अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिवपदांसह विविध पदांवर निवड करण्यात आली. महासंघाच्या अध्यक्षपदी पत्रकार आणि आर.टी.आय. कार्यकर्ते शोएब अहमद कन्नौजी, उपाध्यक्षपदी बाबाराव पाटील,



तर सचिवपदी प्रमोद भगवतीप्रसाद मुरारका यांची निवड झाली. सहसचिवपदी प्रविण ठाले, कोषाध्यक्षपदी राजेंद्र भोयर, संयोजकपदी जफर अहमद कन्नौजी यांची नेमणूक करण्यात आली. तर सदस्य म्हणून सैय्यद हुमायून, दिलदार शब्बीर बेग, गणेश ताकसांडे, जितेंद्र शेजवल आणि ॲड. राकेश सोनटक्के यांचा समावेश आहे. विधी सल्लागार म्हणून ॲड. वि.वि. रामटेके, ॲड. कामिल शेख आणि ॲड. मुकुंद धाकटे यांची नियुक्ती करण्यात आली.या संघटनेचे उद्दिष्ट नागरिकांना शासकीय कार्यालयांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यात मदत करणे, तसेच माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती कशी मागवायाची याबाबत जनजागृती व मार्गदर्शन करणे हे आहे.संघटनेचे कार्यालय 'रोशन वतन, सिंधी मार्केट, वर्धा येथे सुरु करण्यात आले असून, इच्छुक नागरिकांना प्रत्यक्ष कार्यालयात किंवा दूरध्वनीद्वारे मार्गदर्शन मिळणार असल्याचे अध्यक्ष शोएब अहमद कन्नौजी यांनी कळविले आहे.

# हिंगणघाटमध्ये सांस्कृतिक भवन व बसस्थानकाच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक आनंद

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहराचा सांस्कृतिक आणि सामाजिक चेहरा बदलण्याच्या दिशेने मोठा टप्पा येत्या ३ नोव्हेंबर रोजी हिंगणघाट येथील उप जिल्हा रुग्णालयाच्या मागील संत तुकडोजी वार्डमध्ये संपूर्ण नव्या सांस्कृतिक सभागृहाचा (नाट्यगृह) भूमिपूजन होणार आहे. या प्रकल्पासाठी शासनाने १७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, या कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी खासदार रामदास तडस आणि आमदार समीर कुणावार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.दुपारी १ वाजता हिंगणघाट बसस्थानकाच्या ५ कोटी रुपयांच्या निव्वळ निधीतून बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचे भूमिपूजनही होणार असून, लोकांनी या संधीकडे मोठ्या संख्येने येऊन उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाने केले आहे. या कामांनी शहराची सांस्कृतिक ओळख अधिक दृढ होऊन येथील कला आणि वारसा जपण्यास मदत होईल व नगररचना सुधारेल.आमदार समीर कुणावार यांनी वारंवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यापर्यंत पाठपुरावा करत हे प्रकल्प शक्य करून दिले आहेत. हिंगणघाट मतदारसंघाचा विकासाचा आलेख झपाट्याने उंचावत असल्याने स्थानिक जनतेमध्ये आनंदाचे वातावरण वाढले आहे.या प्रकल्पांमुळे हिंगणघाटला एक वेगळा सांस्कृतिक ठसा मिळेल अशी अपेक्षा आहे, ज्यामुळे पर्यटन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक सहभाग याला बळकटी मिळेल. तसेच, बसस्थानकाच्या सुधारणा प्रवाशांच्या सोयीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

### जगात वेगाचा नवा विक्रम

# पुलगावची ७ वर्षीय आर्या ठरली सर्वात वेगवान मॅरेथॉन धावपटू

**पुलगाव जनमाध्यम :** लहान वयात मोठे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरावी अशी कामगिरी पुलगावच्या आर्या पंकज टाकोने हिने करून दाखवली आहे. अवघ्या ७ व्या वर्षी आर्याने बारामती (पुणे) येथे झालेल्या बीएसएफ मॅरेथॉन स्पर्धेत ५ हजार मीटरचे अंतर केवळ २४ मिनिटं २२ सेकंदांत पार करत जगभरात विक्रम केला. या उल्लेखनीय यशाच्या गौरवासाठी तिचा लवकरच ब्रिटीश पार्लमेंटमध्ये सत्कार होणार आहे. साध्या कुटुंबातील आर्याचे वडील पंकज टाकोने हे वर्धा पोलिस विभागात सेवेत असून आई गृहिणी आहेत. कठीण परिस्थितीतही त्यांनी




आपल्या मुलीला पुढे जाण्यासाठी नेहमी प्रोत्साहन दिले. पुलगावमध्ये योग्य क्रीडांगण नसल्यामुळे आर्याने व्हॉलिबॉल मैदानावरच सराव सुरू केला. त्यानंतर वर्धा आणि नागपूर येथे प्रशिक्षण घेऊन तिने आपल्या चिकाटीची गाथा लिहिली.

वयाच्या केवळ १२ महिन्यांनंतर ती चालण्याऐवजी धावू लागली होती, अशी आठवण तिच्या पालकांनी सांगितली. आज तीच धडधडती पावलं देशाचं नाव जगभर पोहोचवत आहेत. पुलगाव या छोट्या गावातून सुरू झालेला हा प्रवास आता प्रेरणेचा विश्वविक्रम ठरला आहे.

# जाम येथे बिबट्याचा मुक्तसंचार : शेतकऱ्यांमध्ये दहशत

**समुद्रपूर जनमाध्यम :** जाम मेनखात परिसरात बिबट्याच्या हालचालींनी गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल संध्याकाळी विलास फ्रॉम मध्ये बिबट्याचे ठसे आढळून आल्याने वनविभागाला कळवली. घटनेची माहिती मिळताच वनाधिकारी राजेंद्र धनविज,व वनरक्षक शशिकांत शेंद्रे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.



जांम चे पोलीस पाटील कवडूजी सोमलकर गावातले नागरिक गोलू साठवणे, सागर वाटमोडे शंकर दुर्गे, चिनू लडके आणि काही नागरिक यांनी पाहणी केली असता हे बिबट्याचे ठसे आहे याची खात्री झाली. काही दिवसांपूर्वी मेणखात येथील कुत्र्याला ठार करून ओढत नेले होते. स्थानिक रहिवाशांच्या मते, गेल्या काही दिवसांपासून लागून असलेल्या कारडा,मेणखात गावात जनावरांच्या हालचालीत अस्वस्थता आणि कुत्र्यांच्या आरडाओरड ऐकू येत होती, मात्र जाम गावाजवळ बिबट्या येईल असे कोणी कल्पनाही केली नव्हती.

वनविभागाने गावकऱ्यांना संध्याकाळनंतर घराबाहेर न जाण्याचे, लहान मुले व पाळीव प्राणी सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले आहे. या घटनेमुळे जाम, मेणखात आसपासच्या भागात घबराट आणि सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

# मुलीमहिलांनी स्वसंरक्षणासाठी कराटे शिकणे ही काळाची गरज



**वर्धा जनमाध्यम :** महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर स्वसंरक्षणाचे तंत्र आत्मसात करणे ही काळाची गरज बनली आहे. कराटे हे केवळ खेळ नसून महिलांना आत्मविश्वास, धैर्य आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारी दिशा आहे, असे प्रतिपादन ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही यांनी केले.ते जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय मुलींच्या कराटे स्पर्धेत मुख्य वक्ता म्हणून बोलत होते. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि वर्धा तालुका क्रीडा स्पर्धा आयोजक समितीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा अधिकारी अनिल निमगडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कोशी उल्हास वाघ, समाजसेवी तुषार देवढे, संयोजक अमोल मानकर, सेन्साई निलेश राऊत, सिहान मंगेश भोंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते.धोक्याच्या परिस्थितीत त्वरित निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मसंयम कराटे प्रशिक्षणातून विकसित होते, असे मत अनिल निमगडे यांनी व्यक्त केले. यावेळी तुषार देवढे आणि कोशी वाघ यांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना प्रेरणा दिली.प्रस्तावना सिहान निलेश राऊत यांनी केली, संचालन अमोल मानकर यांनी केले, तर आभार सिहान मंगेश भोंगाडे यांनी मानले. या स्पर्धेत जिल्ह्यातील सुमारे १५० शालेय मुलींनी उत्साहाने सहभाग घेतला.

# आष्टीत जलवाहिनी घोटाळा: १७ लाख ७७ हजार रुपयांचा धनादेश ठेकेदाराला दिल्याचा मोठा प्रकार, नागरिक पाणीटंचाईत अडकले

**आष्टी जनमाध्यम :** आष्टी नगरपंचायतच्या न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या बांधकामाच्या जागेतून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे स्थलांतर करण्यासाठी १९ लाख ५० हजार रुपयांचा खर्च करण्यात आला. मात्र सदोष आणि निकृष्ट कामामुळे शहरात दोन दिवसाआड पाणीपुरवठा होत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यावर मुख्याधिकारी आणि अभियंत्यांनी नगराध्यक्षांना न कळवता १७ लाख ७७ हजार रुपयांचा धनादेश ठेकेदाराला दिला आहे.नगराध्यक्ष अनिल धोत्रे यांनी मासिक सभेत या भ्रष्टाचाराचा उलगडा करत धनादेश बँकेत रोखण्याचा ठराव घेतला. त्यांनी शिवाय शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची मागणी केली. मात्र, मुख्याधिकारी यांनी ठेकेदाराला आधी बिल दिल्याचे आणि २०३ कपात करून दिल्याचे विधान केले.ठेकेदाराकडे ठरावाशिवाय १९ लाख ५० हजार रुपयांचे बिल मंजूर न करता तयार



करण्यात आले आहे. मंजूर रकमेपेक्षा २.५ लाख रुपये अधिक रक्कम एमबी रेकॉर्ड केली गेली असून या भ्रष्टाचाराबाबत नागरिकांमध्ये गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नगरपंचायतकडून जलवाहिनीच्या कामातील सदोषतेमुळे होणाऱ्या पाणीटंचाईची नागरिकांनी निंदा केली आहे आणि अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार आणि जनतेची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे.या सर्व घटनाक्रमातून स्पष्ट होते की, नगरपंचायत प्रशासनाने पारदर्शकतेचा अभाव ठेवून आणि नियमांवरुन पाणीपुरवठ्यात गडबड करत हे घोटाळे केले आहेत. जलवाहिनीच्या सदोष कामामुळे आष्टी शहरात पाणीटंचाई भासली असून प्रशासनावर विश्वास हा ढासळण्याचा धोका निर्माण झाला आहे

# अंतोरा-लहान आर्वी रस्त्यावर बांबूच्या झाडामुळे राज्य परिवहन बसचा अपघात

## मोटारसायकल चालक गंभीर जखमी

**आष्टी जनमाध्यम :** अंतोरा ते लहान आर्वी मार्गावर आज सायंकाळी ४.४५ वाजता तळेगाव आगाराच्या मोर्शी-हिंगणघाट जाणाऱ्या राज्य परिवहन बसचा एक भीषण अपघात झाला. रस्त्यावर अचानक आलेल्या बांबूच्या झाडामुळे घराकडे जात असलेल्या गोविंदराव रामदास कोहळे (वय ६२) या मोटारसायकल चालकाला बसच्या पुढील भागाशी जोरदार धडक लागली, ज्यात ते गंभीर जखमी झाले. अपघाताची गंभीरता लक्षात घेता, स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत सुरू केली आणि जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्रात



दाखल करून नंतर अमरावती जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. चालकाने वेळीच ब्रेक लावल्यामुळे बस पलटी होण्यापासून वाचली, अन्यथा प्रवाशांच्या जीवाला मोठा धोका होता. या घटनेनंतर तळेगाव परिवहन आगाराचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक घटनास्थळी दाखल झाले, आणि पुढील तपास सुरु आहे. स्थानिकांनी रस्त्यावर येणाऱ्या झाडांची छाटणी करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्वरित प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त केली आहे.हा अपघात सार्वजनिक रस्त्यावरील झाडांची वेळेवर देखभाल न झाल्यामुळे घडल्याचे लोकांच्या लक्षात आले असून, प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी घेण्याची मागणी जोर धरत आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## दहशतीचा जाळ

जगातील दहशतवादास जे दोन देश मुख्यत्वे जबाबदार आहेत, त्यात अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांचा समावेश होतो. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतीच्या आर्थिक सामर्थ्याचे प्रतीक वर्ल्ड ट्रेड सेंटरचे जुळे मनोरे 'अल कायदा'च्या दहशतवाद्यांनी विमानांच्या साहाय्याने उद्ध्वस्त केले. त्यानंतर अमेरिकेने 'अल कायदा'च्या तळांवर अफगाणिस्तानात तुफान बॉम्बहल्ले केले. त्याअगोदर ऑगस्ट १९९८ मध्ये 'अल कायदा'ने टान्झानिया आणि केनियात अमेरिकेच्या वकिलातींवर हल्ले केले होते. लादेन, अल जवाहिरी, अहमद ताहा, शेख मीर हमजा या दहशतवाद्यांनी अमेरिकेविरुद्ध फतवा जारी केला होता. अरब प्रदेशावर अमेरिकी लष्कराचा ताबा, इराकवर आर्थिक निर्बंध आणि इस्त्रायलला अमेरिका देत असलेले पाठबळ, ही तीन कारणे त्यामागे होती. वास्तविक, अफगाणिस्तानात लादेन व तालिबानला अमेरिकेनेच प्रोत्साहन दिले होते.१९८० च्या दशकारंभी सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानचा कब्जा घेतल्यानंतर रशियाला नामोहरम करण्याच्या उद्देशाने अमेरिका आणि पाकिस्तानने अफगाणिस्तान आणि मध्य पूर्व आशियातील बंडखोरांसाठी लष्करी प्रशिक्षण तळ उभे केले. त्यातूनच तालिबानचा उदय झाला. १९८० च्या दशकाच्या अखेरीस रशियाने कब्जा सोडल्यानंतर तालिबानने अफगाणिस्तानचा ताबा घेतला आणि या शक्तींवर कोणाचेच नियंत्रण राहिले नाही. पाकिस्तानातील लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद या संघटनांना तालिबानचेही पाठबळ मिळाले. मात्र, त्यानंतर अमेरिकेने पाकिस्तान व अफगाणिस्तानमध्ये कळसूत्री सरकारे स्थापन केली.काही वर्षांपूर्वी अमेरिकेने अफगाणिस्तानातून माघार घेतल्यानंतर तो पुन्हा तालिबानी राजवटीच्या ताब्यात गेला. वास्तविक, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान हे दोन्ही दहशतवादाला खतपाणी घालणारे देश. त्यामुळे त्यांच्यात नैसर्गिक मैत्री असली पाहिजे, अशी अपेक्षा होती. परंतु, आश्चर्य म्हणजे, दहशतवादाच्या मुद्द्यावरून तालिबानसोबत सुरू असलेल्या पाकच्या वाटाघाटी अयशस्वी ठरल्या आहेत. पाकिस्तानने तालिबान दोहा करारातील आश्वासन पाळत नसल्याचा आरोप केला. अफगाणी दहशतवादी पाकमध्ये धुमाकूळ घालत असून, त्यांना काबूत आणण्यासाठी सहकार्य करा, असा पाकचा आग्रह होता.तालिबानी राजवट पाकविरोधी दहशतवाद्यांना मदत करते, असा आरोप पाकिस्तानचे माहिती व प्रसारणमंत्री अताउल्ला तरार यांनी केला. पाकिस्तानात जे अफगाण घुसखोर शिरले आहेत, त्यांना शोधून देशाबाहेर हाकलून द्या, असे पाकच्या पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरयम नवाज म्हणाल्या. तालिबानी उघडपणे देवबंदी इस्लामवादाचे समर्थन करतात. ही विचारधारा कट्टर धर्मवादी आहे. राष्ट्र ही संकल्पना न मानता ती धर्मसत्तेच्या स्थापनेस महत्त्व देते.पाकमधील झिया-उल-हक असो की आताचे लष्करप्रमुख मुनीर. यांनी जिहादींचा वापर राष्ट्रासाठी करण्याचा निर्धार केला. त्यातूनच तालिबान आणि पाकिस्तानी राजवट यांच्यातील मतभेद अधोरेखित झाले. पाकिस्तानला अफगाणिस्तानमध्ये पख्तुन आणि इतर संस्कृती समाप्त करून, स्वतःची निरंकुश सत्ता प्रस्थापित करायची आहे. त्यामुळे तालिबान २.० राजवट पाकिस्तानच्या तशी विरोधातच आहे. तालिबानने ऑगस्ट २०२१ मध्ये काबूलचा ताबा घेतला, तेव्हा पाकने ताबडतोब तेथे राजनैतिक व लष्करी दूत पाठवले. अफगाणिस्तान आपल्या आदेशानुसार चालावा, ही पाकची इच्छा त्यामधून प्रतिबिंबित झाली. हे तालिबान राज्यकर्त्यांना बिलकूल रुचलेले नाही. या वर्षाच्या प्रारंभीच पाकिस्तानातील ८० हजार अफगाण निर्वासितांना त्यांच्या देशात चालते होण्यास फर्मावले. दीड वर्षापासूनच पाकिस्तान-अफगाणिस्तान यांच्यातील संघर्ष तीव्र होत आहे. तहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) वर अंकुश ठेवा, अशी मागणी तीन वर्षांपासून पाकिस्तान करत आहे. पाकचे सैनिक, तसेच नागरिकांवर होणारे हल्ले थांबवा, अशी अपेक्षा पाकने तालिबानकडे व्यक्त केली. मात्र, तालिबानने 'टीटीपी'विरुद्ध कारवाईची मागणी फेटाळली. तसे केल्यास दोन्ही देशांसह आसपासच्या भागांतही अस्थिरता निर्माण होईल, असे तालिबानचे म्हणणे आहे.'टीटीपी'ने पाकिस्तानच्या पेशावरमधील शाळेवर २०१४ मध्ये केलेल्या हल्ल्यात दीडशे विद्यार्थी मारले गेले होते. मात्र, पाकिस्तानदेखील अफगाणिस्तानात हिंसाचार माजवतो, असे अफगाण नगरिकांचे मत आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानात घुसून, तेथील २१ चौक्या ताब्यात घेतल्या. तर, अफगाणिस्तानने पाकिस्तानचे ५८ सैनिक ठार मारले. काबूलमध्ये पाकिस्तानने बॉम्बस्फोट घडवून आणला. पाकच्या हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानचे तीन क्रिकेटपटू ठार झाले. ड्युरंड सीमेवरील संघर्षात तालिबानचे २० सैनिक ठार झाले. मुशर्रफ अध्यक्ष असताना, पाकिस्तानने अमेरिकेच्या दहशतवादविरोधी आघाडीत सामील होत अफगाणविरोधी भूमिका घेतली होती.२००९ ते २०१८ दरम्यान, बैतुल्लाह महसूद, हकीम उल्लाह महसूद आणि मुल्ला फझ्लुल्लाह हे तालिबानचे तीन नेते अमेरिकी हवाई हल्ल्यात मारले गेले. त्यासाठी पाकिस्तानने सहकार्य केले होते. एकूण, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान हे दोन्ही दहशतवादी देश दहशतवादाचे बळीदेखील ठरले आहेत. मात्र, काबूल आता दिल्लीच्या हातातले बाहुले बनले आहे, असा आरोप पाकच्या संरक्षणमंत्र्यांनी केला आहे. तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमिरखान मुत्ताकी नुकतेच भारत दौऱ्यावर आले. पहलगाम हल्ल्याचा तालिबान राजवटीने निषेध केला होता. भारताने तालिबानी राजवटीशी जुळवून घेतले आहे. तसेच, भारत चाबहार बंदर इराणमध्ये विकसित करत असून, तेथून मध्य आशियात व्यापार करण्यासाठी तालिबानचे सहकार्य आवश्यक ठरते. अफगाण भूमीवरून भारतविरोधी कोणतीही कृती होणार नाही, अशी हमी तालिबान्यांनी दिलेली आहे. तालिबानी राजवटीच्या दहशतवादी धोरणांना वा त्यांच्या महिलाविरोधी दृष्टिकोनास भारताने अजिबात समर्थन दिलेले नाही. मात्र, भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील नवीन व्यावहारिक संबंधांमुळे पाकची पोटदुखी होणे स्वाभाविक आहे. पाकिस्तानवर चाप लावण्यासाठी अफगाणिस्तानचा वापर करून घेणे भारतासाठी श्रेयस्करच ठरले आहे. दहशतीचा जाळ काढण्याची भारताची रणनीती यशस्वी होताना दिसते.

'सामाजिक घौकट बदलत असताना अनेक चुकीचे प्रघात मिसळत असल्यामुळे चिंता व्यक्त होत आहे. सध्या कोणालाच कायद्याचा धाक उरलेला नाही. लोक नियम धाब्यावर बसवतात आणि हे केल्यानंतर समाजातून विरोध, टीका होत नसल्यामुळे आपल्या चुकीच्या कृत्याचीही शेखी मिरवतात. म्हणूनच कायदे कडक करणे, शिक्षा कठोर करण्याबरोबरीने उपद्रवमूल्याला सन्मान, प्रतिष्ठा देणे थांबवायला हवे. तरच अनेक प्रश्न सुटतील.

# शिस्तीची संस्कृती आणायचे आव्हान

वाढती गुन्हेगारी, असामंजस्य, कायद्यातून पळवाटा शोधण्याची बेदरकार वृत्ती आणि या सर्वांच्या परिणामस्वरूप विद्रूप होणारी सामाजिक चौकट हा सध्याचा कळीचा प्रश्न आहे. यायोगे उद्भवणाऱ्या अनेकानेक समस्या सामाजिक सलोखा धोक्यात आणत आहेत. वाढती असुरक्षितता काळजीचे कारण ठरत आहे. म्हणूनच दंगली, सार्वजनिक मालमतेची जाळपोळ, सामाजिक शिस्तीचा अभाव यासारख्या मुद्यांवर विविध पातळ्यांवर चर्चा होत असली तरी याच्या मुळाशी जाऊन विचार करणे गरजेचे ठरते. घराबाहेर पडल्यानंतर आपल्याला अनेकांकडून कायदे तोडले जाताना दिसतात. अगदी एखाद्या मर्सिडिजची काचही खाली होते आणि कचरा वाहेर टाकला जातो. या मानसिकतेचा विचार करताना स्वाभाविकन्न नियम अपुरे असणे, कडक नसणे, अंमलबजावणीचा अभाव, पोलिसांची मोजकी संख्या हे आणि यासारखे मुद्दे समोर येतात. नियम मोडणाऱ्यांना कडक शिक्षा झाली तर याला वेसण बसेल, असा भाबडा आशावाद व्यक्त होतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चार फटके देऊन जेलमध्ये डांवले पाहिजे, अशी वाक्येही सहज तोंडात येतात. उद्वेगातून, खरे तर आपल्या देशामध्ये एखादा हुकूमशहाच हवा, असेही कोणी बोलून जाते. पण जगभरात झालेल्या समूह मानसिकतेच्या अभ्यासातून समोर आलेली गोष्ट अशी की, केवळ शिक्षा वाढवून कधीच कोणता परिणाम दिसत नाही. गुन्हेगारी हे लक्षण आहे. कारण



त्यामागे गुन्हा करणाऱ्यांना मिळणारा मानसन्मान हा खरा काळजीचा मुद्दा आहे.

गुन्हा करणाऱ्यांना प्रतिष्ठा गुन्हा करणाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा मिळते तेव्हा आपसूक लोक त्याकडे ओढले जातात. व्यक्ती नेहमीच छोट्या गुन्हेगारीपासून मोठ्या गुन्हेगारीकडे जाते. म्हणूनच छोटे-छोटे गुन्हे स्वीकारून एक प्रकारे समाज संदेश देत असतो, की तुम्ही कायदे तोडले तरी काळजी नाही; तुम्हाला संरक्षण आहे. शेवटी हाच समाज नियम तोडणाऱ्यांना ताकदवान मानतो. आपल्याकडे नियम वाकवू शकणाऱ्या माणसाला 'भारी' समजले जाते. नकळतपणे ही बाब समाजात बघायला मिळते तेव्हा हा समज दृढ होण्यास वेळ लागत नाही. एखाद्या राजकीय पक्षाचा मेळावा नजरेसमोर आणा... यावेळी आरडाओरडा करत, हेल्मेट न घालता, एका दुचाकीवर तीन चार लोक जाताना दिसतात. त्यांनी गाड्या कशाही लावलेल्या असतात. पण ते संपूर्ण शहर रोखून धरू शकतात, चक्का जाग करू शकतात, ही त्यांची ताकद आहे, असे म्हणत सामर्थ्याचे लक्षण म्हणून समाज त्याकडे बघतो. खरे तर ते सामर्थ्य नसते, उपद्रव्मूल्य असते. मात्र यातला फरक न समजणे हाच खरा आणि मूळ प्रश्न आहे.चुकीचे वागणाऱ्यांना प्रतिष्ठा नको एकदा याला सामर्थ्य म्हटले की त्यामागे प्रतिष्ठा येते आणि ती आपल्यालाही कशी मिळेल याचा विचार गाणूस करतो. यातूनच सिग्नल तोडले जातात. आपल्याला कोणी पकडणार नाही आणि तसे झाले तरी चिरीमिरी देऊन सुटता येईल, असा विचार केला जातो. आपल्या चार-पाच मित्रांमध्ये याची फुशारकीही मारली जाते. हे अनेकांकडून घडते तेव्हा मानसिकरित्या समाजावर परिणाम होत असतो. म्हणूनच अगदी आपल्या नेहमीच्या, साध्या चर्चेतही चुकीच्या गोष्टी करणाऱ्यांना प्रतिष्ठा देणे बंद करुन, चूक करत असल्याचे सांगत त्यांच्याकडे बोट दाखवू लागलो तर कोणत्याही शिक्षेने साध्य न होणारी गोष्ट घडून येईल आणि अशी माणसे चुकीचे काम करण्यापासून परावृत्त होतील. कारण समाजात आपले हे कृत्य लाजिरवाणे मानले जाईल, अगदी जवळच्या मित्रांमध्ये नातलगांगध्येही ते लज्जास्पद गानले जाईल असे कळले की ते टाळण्याची मानसिकता जन्म घेते. म्हणूनच समाज म्हणून नियम तोडण्याची, कायदे वाकवण्याची लाज निर्माण करणे हे आपले काम आहे, असे वाटते. भारतासारख्या देशात अनेक वेळा एक विचित्र आणि विरोधाभासी दृश्य पहायला मिळते. एकाच माणसाचे वर्तन वेगवेगळ्या ठिकाणी पूर्णपणे भिन्न का असते, हा प्रश्न अनेकांना पडतो. जसे की, आधी उल्लेख केल्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणारा माणूस एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये मात्र अगदी कचरा कचरापेटीत टाकतो. भारतात राहणारा भारतीय नागरिक ट्रैफिक सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे अशा बाबी सामान्य मानतो, पण अमेरिकेत गेल्यावर तेच नियम काटेकोरपणे पाळतो. कायद्याची दीर्घकालीन भीती काय कारण आहे या वागण्यातल्या मनोवृत्ती? याचे उत्तर फक्त कायद्यात नाही तर समाजाच्या वर्तनधोरणात, मानसिकतेत आणि सामाजिक शिकवणुकीत आहे. आपण मानवजातीच्या उत्क्रांतीच्या इतिहासात शिकलो आहोत की समूहामध्ये राहणे ही आपल्या अस्तित्वाची गरज आहे. पूर्वीच्या काळात, म्हणजे माणूस टोळी बनवून रहायचा तेव्हा टोळीतून बाहेर फेकले जाणे ही मृत्यूसमान शिक्षा होती. आजही आपल्या मेंदूमध्ये तीच सामाजिक तार जोडलेली आहे. मी आजूबाजूच्या समाजाचा भाग आहे, ही भावना माणसाला मानसिक सुरक्षितता देते. ती गानवाची मूलभूत गरज बनली आहे. आपल्याला कायद्याची किंवा शिक्षेची भीती वाटते का, या प्रश्नाचे उत्तर असे की, ती भीती अतिशय वरवर असते. पण दीर्घकालीन परिणाम करणारी भीती म्हणजे आपल्याला आपले लोक स्वीकारणार नाहीत, हीच असते. म्हणूनच आपण आजूबाजूच्या लोकांप्रमाणेच वागतो. आपण तीच कृती 'नॉर्मल' मानतो, समुदाय मानसशास्त्राचा विचार केला तर समाज म्हणून आपण सहन करतो, तेच हळूहळू आत्मसातही करतो. आधी सांगितल्याप्रमाणे त्यालाच मान-प्रतिष्ठा देतो आणि ती गोष्ट पुढे जात त्या, त्या समाजाच्या वर्तन-संस्कृतीचा भाग बनते.

### कायदाभंग सामर्थ्याचे लक्षण

भारतातही हे चित्र अगदी स्पष्ट दिसते. विशेषतः कायदा गोडण्याच्या बाबतीत ही बाब सर्वत्र बघायला मिळते. एखादा राजकीय नेता कायदे तोडतो, बेकायदेशीर बांधकाम करतो, ट्रैफिक बंद करतो, सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर फ्लेक्सबाजी करतो आणि तरीही समाज त्याला निवडून देत असेल, त्याच्या बडेजावाला दाद देत असेल तर तो कायदाभंग गैर न ठरता नकळत सामर्थ्यांचे लक्षण ठरतो. यामुळे समाजात एक संदेशच जात असतो, की नियन तोडण्याचे आणि ते पचवण्याचे सामर्थ्य असेल तर प्रतिष्ठा मिळते! आणि मी असे केले तरी तुम्ही मलाच मत देणार, जाणार कुठे; असा प्रश्नही जणू तो पुढारी बदलाचे? कायदा बदलतो म्हणून की आपल्या चुकीच्च्या कृतीतून विचारत असतो. म्हणूनच हे चित्र कायदा-व्यवस्थेला आव्हान देणारे आहे. मी पदावर नसलो, आमदार-खासदार-मंत्री नसलो तरी हे करू शकतो, हा संदेश त्या बेकायदेशीर फ्लेक्समधून येत असेल आणि समाज तो खपवून घेत असेल तर मोठी चूक घडते, लगोलग शेजारी तसाच दुसरा फ्लेक्स लागतो. त्याला काय बिघडते, असे तेव्हाही आपले म्हणणे असते. अशाप्रकारे आपण कायदा तोडणाऱ्याला प्रतिष्ठा देतो. त्याला चांगले म्हणतो. मानाने त्याच नगरसेवकाला आपल्या संकुलात प्रमुख पाहुणा म्हणून बोलावतो. अशा प्रत्येक वेळी कायदा मोडला तरी चालेल, असेच आपण अप्रत्यक्षपणे म्हणत असतो. मात्र ही धोकादायक वर्तनसंस्कृती रूजली की ती मोडीत काढणे मोठे कठीण काम ठरते.

**तन्मय कानिटकर**

## प्रमुख पक्ष प्रवक्त्याच्या आरोग्याच्या समस्येवर पक्ष प्रमुखांच मौन?

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रखर प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी आपण एका गंभीर आरोग्य समस्येने त्रस्त असून, त्यावर वैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार घेत असल्याचे एक्स या सोशल मीडिया हँडलवरून पोस्ट करून सर्वांना कळवले होते. यावर देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी त्यांना लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या, आणि राऊत यांनी त्यांचे आभार मानले.सामान्यतः असे दिसून येते की, जेव्हा कोणत्याही पक्षाच्या वरिष्ठ नेत्याला कोणतीही अनुचित घटना किंवा आरोग्यविषयक समस्या उद्भवते, तेव्हा त्याबद्दल पक्षाच्या अधिकृत वेबसाइटवरून किंवा पक्षाच्या वतीने माहिती दिली जाते.विशेष म्हणजे, इतर वेळी साध्या साध्या गोष्टींसाठी पत्रकार परिषदा घेणारे किंवा प्रतिक्रिया देणारे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या आजारपणाबद्दल सार्वजनिकरित्या काहीही बोलल्याचे दिसले नाही. ज्यांनी आपल्या वक्तृत्वाने इतके दिवस शिवसेना (उबाठा) पक्षाला माध्यमांमध्ये सक्रिय ठेवले, त्या नेत्याबद्दल पक्षप्रमुखांकडून कोणतीही प्रतिक्रिया न येणे किंवा याबाबत पक्षप्रमुख काही बोलताना न दिसणे, हे एकूणच आश्चर्यकारक आहे.

**अविनाश देशपांडे,** पुणे

## सांग, सांग भोलानाथ पाऊस कधी थांबे

अनेक हवामान अंदाजाना फोल ठरवत गेली सहा सात महिने झाले पावसाने हाहाकार उडवून दिला आहे. भारतीय इतिहासात कधी नव्हे तो इतका पाऊस बरसत असल्याने कोणालाच काही समजेना यंदाच्या पावसाने सर्वच रेकॉर्ड मोडत एक नवा इतिहास निर्माण केला आहे पण या सर्व बदलांना मानवचे जबाबदार आहे. असे ठणकावून सांगितले तरी ते खोटे ठरु नये देशांमध्ये विविध योजना अर्थात पुल, रस्ते, मोठंमोठे प्रकल्प, उद्योगधंदे यासारखी विकासात्मक कामे करताना निसर्गाला मोठ्या प्रमाणात धक्का पोहचत असल्याचे दिसून येते आहे तसेच युद्धजन्य परिस्थिती यामुळे उष्मा वाढत आह. समुद्रामध्ये सातत्याने निर्माण होणारी वादळे यामुळे पाऊस पडण्यास मदत होत असल्याचे बोलले जात आहे. निसर्गाने आपणाला भरभरुन मौल्यवान निसर्गसंपदा दिल्या आहेत त्यांना आपण धक्का न लावता विकास आराखडा तयार केला पाहिजे आधुनिक जगात वावरत असताना मानवाने अनेक क्षेत्रांत झपाट्याने उल्लेखनीय प्रगती साधली असली तरी निसर्गाच्या विरोधात जावून चालणारे नाही निसर्गाच्या पुढे आपण धावत असल्याने निसर्ग आपला डाव साधत आहे. अनियमित अतिवृष्टी, ढगफुटीसारखा पाऊस तर कधि कडक ऊन, भूकंप, पूरस्थिती वातावरणातील फेर पलटे यासारख्या निसर्गाच्या प्रकोपामुळे मानवाचे जीवन उद्वस्त झाले आहे यंदाच्या पावसाने महाराष्ट्रातील विविध भागातील हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाली आहेत अनेक ठिकाणी जिवीत व वित्तहानी झाली आहे. त्यामुळे सरकार आणि मानवाने या निसर्गाच्या इशाऱ्याकडे वेळीच गांभीर्याने लक्ष देवून उपाय योजना निर्माण केल्या पाहिजेत तरच निसर्गाचा आनंद लुटता येईल.

**राजू जाधव,**
मांगूर जि. बेळगांव

# गावांचा कायापालट अन् देशाचा विकास

**भारत देशातील गावांमध्ये हस्त उद्योगांचा ऱ्हास झाल्याने गावांचा विकास खुंटला. त्यामुळे रोजगाराच्या निमित्ताने लोक गाव सोडून शहरात जाऊ लागले. तेव्हा शहरात जाणाऱ्या नागरिकांना थांबविण्यासाठी गावात पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहेत. देशाचा विकास व्हायचा असेल, तर देशातील प्रत्येक गावाचा कायापालट व्हायला हवा. त्यासाठी शासकीय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास देशाचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा देशाच्या विकासासाठी गावांचा कायापालट होणे गरजेचे आहे. तरच आपला देश अधिकाधिक विकसित होईल. त्यासाठी आपल्या देशात राजकीय इच्छाशक्तीची खरी गरज आहे.**



आपला भारत देश आजही तिसऱ्या जगातील राष्ट्र म्हणून ओळखला जातो. कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील गावांच्या कायापालटवर अवलंबून असतो. गाव, पंचक्रोशी, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश असा विकासाचा आलेख असतो. तेव्हा देशातील गावांचा कायापालट होणे गरजेचे असते. आपल्या देशात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. सध्याची आकडेवारी उपलब्ध नसली तरी देशात सन २०११ च्या आकडेवारीनुसार ६,४९,४८१ गावे होती. त्यातील सुमारे ४१,००० गावे महाराष्ट्रात आहेत. म्हणजे आपल्या राज्यातील एकूण लोकसंख्येचा विचार केल्यास ५४.७८ टक्के लोक ग्रामीण भागात आजही राहतात ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे सन २००१ च्या शासकीय आकडेवारीनुसार आपल्या महाराष्ट्रात ४३,७२० गावे होती. राज्यातील सहा विभागांपैकी कोकण विभागामध्ये ३,१८३ गावे होती. ही आकडेवारी फारच जुनी असली तरी आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. त्यासाठी नियमित जनगणना होणे गरजेचे आहे. जनगणना केल्याने वस्तुस्थिती लक्षात येऊन विकासाची दिशा ठरविणे सोपे जाते. तेव्हा दरवर्षी वर्षाच्या शेवटी विकासकामे व राज्याची वस्तुस्थितीची आकडेवारी प्रकाशित करणे आवश्यक आहे. यातूनच प्रगती कशी साधू शकतो याचा विचारविनिमय होऊ शकतो. केवळ शंभर टक्के विकास निधी खर्च केला म्हणजे विकास झाला असे म्हणता येणार नाही, तर गाव अथवा जिल्ह्यातील गरीबातील गरीब नागरिकाला त्याचा किती फायदा झाला हे जास्त महत्त्वाचे आहे. तेव्हा विकास निधी जरी वितरीत केला तरी तो योग्य कामासाठी केला आहे की नाही त्यावर सुजाण नागरीकांचे लक्ष असायला हवे. तसेच जो निधी वितरीत केलेला असेल त्याची नोंद गावातील ग्रामपंचायतीतील फलकावर ठळक अक्षरात लिहिण्यात यावी. म्हणजे आपल्या गावात किती शासकीय निधी आला त्याचा विनियोग कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला याची माहिती गावातील प्रत्येक नागरिकाला मिळेल. यातून खऱ्या अर्थाने गावात सामाजिक एकता निर्माण होण्याला मदत होते.

कोणत्याही देशाच्या विकासासाठी त्या देशातील गावांचा कायापालट अतिशय महत्त्वाचा असतो. त्यासाठी गावात पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. आजही गावामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव दिसून येतो. तेव्हा नागरिकांना स्वच्छ पाणी, आरोग्याच्या सुविधा, शौचालये, शिक्षण, स्वच्छता, लाईट व्यवस्था, रस्ते, दुकाने, लघु उद्योग, पारंपरिक उद्योग, सामूहिक शेती करणे, कुक्कुट पालन, वराह पालन व व्यावसायिक शिक्षण अशा सुविधा असणे गरजेचे आहे. म्हणजे नागरिक गाव सोडून शहरात जाणार नाहीत. महत्त्वाचे म्हणजे गावात विविध राजकीय पक्ष आपल्या पक्षाचे काम करीत असले तरी गावाच्या विकासासाठी राजकारण बाजूला करून एकत्रित काम केले पाहिजे. आपला देश हा शेतीप्रधान असल्याने शेतीचे उत्पन्न कसे वाढेल त्यापद्धतीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच स्थानिक महिलांचे नोंदणीकृत महिलामंडळ स्थापन करून महिला मंडळाच्या माध्यमातून विकासात्मक शासकीय विविध योजना राबविणे. त्यासाठी महिलांना योग्य प्रशिक्षण देण्यात यावे. केवळ आश्वासने देऊन गावाचा विकास होणार नाही तर आश्वासनांची पूर्तता केल्यास गावाचा विकास होईल. यासाठी गावातील नागरिकांच्या मनातील जातीचे उच्चाटन व्हायला हवे. शेतीला पूरक जोडधंदे निर्माण केले पाहिजेत. त्यामुळे शेतकरी राज्याला आर्थिक बळ मिळेल. निसर्गाचे संतुलन साधण्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावली पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांचे संगोपन करण्यात यावे. पावसाचे पाणी जमिनीत जिरवायला पाहिजे. त्यासाठी ठिकठिकाणी बांध घालायला हवे. यातूनच गावांचा कायापालट होतो. गावातील आजच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास काही गावांमध्ये आजही पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. थोडक्यात सांगायचे तर गावातील रावांमुळे गावातील वाड्या पायाभूत सुविधांपासून वंचित आहेत, मग सांगा गावांचा विकास होणार कसा? तेव्हा अंतर्गत वाद बाजूला सारून गावांचा कायापालट होणे गरजेचे आहे. त्यासाठी गावच्या ग्रामसेवकांनी आपली भूमिका नि:पक्षपातीपणे पार पाडली पाहिजे. कारण ग्रामसेवक हा त्या गावचा ग्रामविकास अधिकारी असून गावच्या प्रशासनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

पुरामुळे शेतकरीराजा संकटात आहेत. तेव्हा गावातील शेतकरी राजाला सामूहिक शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच त्यांना शेतीला पूरक असे जोडधंदे सुरू करून देण्यात यावेत. आजही शेतीचे नुकसान झाले तरी जोडधंद्यामुळे तेवढा आर्थिक आधार मिळू शकतो. त्यात सरकारी मदत मिळाल्याने शेतकरी राजा संकटाला सामोरा जाऊ शकतो. याचा परिणाम गावातील नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी देशातील प्रत्येक गावात पायाभूत सुविधा झाल्याच पाहिजेत तरच गावांचा कायापालट होऊन देशाचा सर्वांगीण विकास होईल.

**- रवींद्र तांबे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ८० हजारांची मागितली लाच

## मारेगाव पोलिसांत गुन्हा दाखल, महिला सरपंच लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

मारेगाव : तालुक्यातील नवरगाव येथील महिला सरपंचाने गावातील जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झाल्यावर बील काढण्यासाठी ८० हजारांची लाच मागितली. तपासणीत लाच मागितल्याचे सिद्ध झाल्याने यवतमाळ लाचलुचपत विभागाने सरपंचाला ताब्यात घेत पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

सुचिता फुलू कुमरे असे लाचेची मागणी करणाऱ्या महिला सरपंचाचे नाव आहे. सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून, त्यांनी नवरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण केले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे बिल काढण्यासाठी आणि बिलाच्या धनादेशावर स्वाक्षरी करण्यासाठी विद्यमान सरपंच सुचिता फुलू कुमरे यांनी कंत्राटदाराकडे ८० हजार रुपयांची लाच मागितली. कंत्राटदाराने तात्काळ यवतमाळ येथील लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो कडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत



प्रतिबंधक विभागाने सापळा रचून या प्रकरणाची पडताळणी केली. पडताळणी कार्यवाहीदरम्यान, सरपंच सुचिता कुमरे यांनी शाळेच्या संरक्षण भिंत बांधकामाच्या बिलाच्या चेकवर सही करण्याकरिता ८० हजारांची लाच रक्कम मागितल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपी सरपंच सुचिता कुमरे यांना तातडीने ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात मारेगाव पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावतीचे पोलीस अधीक्षक मारोती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे, तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळचे पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट यांच्यासह अतुल मते, अब्दुल वसीम, सुधीर कांबळे, जयंत ब्राम्हणकर, संजय भुजाडे, सचीन भोयर, सरिता राठोड आणि अतुल नागमोते यांनी सहभाग घेतला.

# दिग्रस नगरपरिषदेच्या प्रभाग ७ मधुन प्रिती नितीन सोनुलकर इच्छुक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दिग्रस - नगपरीषेदेच्या निवडणूकीचे बीगुल वाजल्यानंतर इच्छुकांनी मोर्चे बांधणीला सुरवात केली आहे.प्रभाग क्रमांक ७ मधुन प्रीती नितीन सोनुलकर जनसेवेच्या ध्येयाने प्रेरित होऊन नगरसेवक पदाच्या उमेदवारी साठी शिवसेना (शिंदे गट) या पक्षाकडून इच्छुक असुन संधी मिळाल्यास नक्कीच संधीचे सोने करीन असे म्हणणे आहे.

पालकमंत्री संजय राठोड यांचे खंदे समर्थक उपशहरप्रमुख नितीन सोनुलकर सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर राहणारे जनतेशी त्यांचा थेट संपर्क असल्याने त्यांना स्थानिक अडचणी आणी विकासाच्या गरजा चांगल्या प्रकारे माहीत आहे त्यामुळे विकासाला गती मीळेल अशी अपेक्षा प्रभागातील नागरीक व्यक्त करत आहे नितीन सोनुलकर या प्रभागातील नागरिक माझ्यासाठी कुटुंबातील सदस्यच आहेत प्रत्येक नागरिकाला आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी, लाईट, यांची स्वाश्वत सोय मिळावी हेच माझे व माझ्या पत्नी चे स्वप्न आहे ही निवडणूक मी स्वार्थासाठी नाही तर विकासाच्या धैर्याने लढणार आहे मला तुमच्या आशिर्वादाची गरज आहे. मी एक साधा कार्यकर्ता म्हणून जनसेवा केली तशीच या पुढेही सुरू राहणार असे त्यांनी सांगितले असतात जनसंपर्क मोठा असुन शहराचा विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, शिक्षण, पर्यावरण यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या नगरसेवकाची आहे शिवसेने कडुन प्रिती नितीन सोनुलकर यांना प्रभाग क्रमांक ७ मधुन उमेदवारी दील्यास विकासाचे नविन दालन खुले, होईल अशी अपेक्षा या प्रभागातील नागरिकांनी व्यक्त केली.

**पक्षाकडून संधी मिळाल्यास निवडणूक लढवणार!**

# न.प.२०२५प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पुसद - नगर परिषद पुसद सार्वत्रिक निवडणूक- २०२५ करीता विधानसभा पुसद-८१ मधील नगर परिषद पुसद क्षेत्रातील मतदार भाग यादी क्रमांक १५३ ते २११ नुसार एकूण १५ प्रभागामध्ये प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी अतुल पंत यांनी प्रसिध्द केल्या आहेत.

त्यामध्ये एकूण १५ प्रभागात ६३५३० मतदार आहेत. त्यात पुरुष ३१६९१, स्त्री ३१८३४ तर इतर ५ असे मतदार आहेत. एकूण १५ प्रभागात ३१ नगरसेवक निवडून द्यावयाचे आहे तर नगराध्यक्ष पदासाठी थेट जनतेतून निवडणूक होणार आहे. अध्यक्षपद हे खुल्या प्रवर्गासाठी आहे. विशेष म्हणजे १५ प्रभागात १६ स्त्री व १५ पुरुष असे एकूण ३१ नगरसेवक उभे राहणार असून त्यांना निवडुन द्यावयाचे आहे. सर्वात जास्त मतदार प्रभाग क्रमांक १५ मध्ये तर सर्वात कमी मतदार प्रभाग क्रमांक १० मध्ये आहेत. प्रत्येक प्रभागात पुढीलप्रमाणे मतदार आहेत प्रभाग (क्र.१) पुरुष-२४६३ स्त्री-२४६३ (४९२६)--(प्रभागक्र.२) पुरुष-२०६८ स्त्री- २०४१ (४१०९)--प्रभाग (क्र.३) पुरुष २३९२ स्त्री-२६९६ (४७८८)--(प्रभाग क्र.४) पुरुष-२२९८ स्त्री- २२१२ (४५१०)---(प्रभाग क्र.५) पुरुष-२११५ स्त्री- २०५७ (४१७२)---(प्रभाग क्र.६) पुरुष-१८७६ स्त्री- १८५८ (३७३४)--(प्रभाग क्र.७) पुरुष-२६७५ स्त्री- २६६९ (५३४४)--(प्रभाग क्र.८) पुरुष-२६१० स्त्री- २५५६ (५१६६)--(प्रभाग क्र.९)पुरुष १६०० स्त्री-१४६७ (३०६७)-- (प्रभाग क्र.१०) पुरुष १३२१ स्त्री- १३०५ (२६२६)--(प्रभाग क्र.११) पुरुष-२०१२ स्त्री- १९५५ (२९६७)--(प्रभाग क्र.१२)पुरुष १७६७ स्त्री- १८५५ व इतर ४ (३६२६)--(प्रभाग क्र.१३) पुरुष १९५७ स्त्री- १९९१ इतर-१ (३९४९)--(प्रभाग क्र.१४) पुरुष १६८३, स्त्री- १८६१ (३५४४)--(प्रभाग क्र.१५) पुरुष- २८५४ स्त्री- २८४८ (५७०२) असे एकूण ६५५३० मतदार आहे.

१ जुलै २०२५ पर्यंत ज्या मतदारांची नावे मतदार यादीत आहेत त्यांना होणाऱ्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ला मतदानाच हक्क बजावता येईल.असे मतदान यादीनुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादी मध्ये आपले नाव तपासून घेणे.

# जि.प. कर्मचारी पतसंस्थेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १.५१ लाखांचा धनादेश सुपुर्द

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सामाजिक दायित्वातून पुढाकार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधीमार्फत मदतकार्य राबविण्यात येत असून, सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, यवतमाळ (नोंदणी क्र. १०९) यांनी या उपक्रमात सहभाग घेतला आहे.

संस्थेच्या वतीने रु. १,५१,०००/- (एक लाख एकावन्न हजार रुपये) इतक्या रकमेचा धनादेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ नानासाहेब चव्हाण यांच्या हस्ते मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपूर्द करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर, सरव्यवस्थापक मारोती राजगडकर, तसेच सर्व संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने सामाजिक जबाबदारी




जपत शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी हातभार लावण्यात आला असल्याचे अध्यक्ष सोनेकर यांनी सांगितले. यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था ही जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्था असून, आपल्या सभासदांच्या आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक कार्यातही सातत्याने पुढाकार घेत आहे. यापूर्वीही संस्थेने शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक उपक्रम राबवून समाजातील दुर्बल घटकांना दिलासा दिला आहे.

या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, जिल्ह्यातील इतर संस्था व संघटनांनीही यापासून प्रेरणा घ्यावी, अशी प्रतिक्रिया प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

# भरधाव वाहनांची समोरासमोर धडक

## मुरळी वळणावरील घटना, तीन महिला जखमी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी : स्विफ्ट आणि थार या दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. सुदैवाने, स्विफ्ट कारमधील दोन्ही एअर बॅग तातडीने उघडल्यामुळे कोणतीही जीवितहानी टळली. मात्र या अपघातात दोन्ही वाहनांमधील एकूण तीन प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना घाटंजी-यवतमाळ मार्गावरील मुरळी आणि आकपुरी वळणावर शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

सीमा फाळके (३६) अस्मिता फाळके (७) रा. वर्धा, आणि रश्मी पटेल (३०) रा. खंडवा अशी अपघातात जखमी झालेल्या महिलांची नावे आहेत. प्राप्त माहितीनूसार, स्विफ्ट वाहन क्र. एमएच ३१ ईए ३६९९ मधून वर्ध्याचे फाळके कुटुंब अनिल फाळके, अर्पित फाळके, सीमा फाळके, अस्मिता फाळके देहेगाव येथून वर्ध्याकडे जात होते. तर थार वाहन क्र. एमएच २५ बीएच ८४४६ एच मध्ये खंडवा येथील श्रीकृष्ण पटेल,



आदित्य पटेल, रश्मी पटेल, अभि पटेल हे खंडवा येथून हैद्राबाद मार्गे बंगळुरूकडे प्रवास करत होते. या दोन वाहनांची घाटंजी यवतमाळ राज्य मार्गावरील मुरळी आणि आकपुरी गावाजवळील वळणावर समोरासमोर धडक झाली. यामध्ये दोन्ही कुटुंबांमधील एकूण आठ प्रवाशांपैकी तीन महिलांना या अपघातात दुखापत झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते मुज्जु पटेल व त्यांच्या मित्रपरिवाराने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना वाहनांमधून बाहेर काढून घाटंजी पोलिसांना घटनेची माहिती दिली. घाटंजी पोलीस ठाण्याचे ठाणेदार केशव ठाकरे यांनी तत्काळ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवले. पोलिसांनी रस्त्यावर दोन्ही बाजूला लागलेल्या वाहनांची गर्दी आणि विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. सर्व जखमींना पुढील उपचारांसाठी यवतमाळ आणि घाटंजी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## गुंज येथे भरधाव ट्रक किराणा दुकानात शिरला

महागाव : माहूरकडून पुसदकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका ट्रकचे नियंत्रण सुटल्याने तो थेट रोडलगत असलेल्या एका किराणा दुकानात घुसला. ही घटना तालुक्यातील गुंज येथे शुक्रवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास घडली. केटीसी कंपनीचा हा ट्रक अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन जयस्वाल यांच्या किराणा दुकानात धडकला. या भीषण अपघातात दुकानाचे मोठे नुकसान झाले असून, ट्रक चालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. सुदैवाने, अपघाताच्या वेळी दुकान बंद असल्याने मोठी जीवितहानी टळली. ट्रक चालकाला झोपेची डुलकी लागल्याने हे अपघात घडला असावा, असा अंदाज परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. या अपघातामुळे स्थानिक परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गुंज येथील हा मार्ग श्री रेणुका देवी आणि दत्तशिखर माहूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांमुळे नेहमीच गजबजलेला असतो.

**तालुका दंडाधिकारी, यवतमाळ यांचे न्यायालय**
Email Id- tahsildaryavatmal@gmail.com
दुरध्वनी क्रमांक ०७२३२-२३८१९४
प्रकरण क्रमांक ३६/जन्म-मृत्यु नोदणी/२०२५
मौजा वाई (रुई) ता.यवतमाळ

**जाहीर सुचना**

ज्याअर्थी, निबंधक तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, रुई (वाई) यांनी मौजा वाई (रुई) ता. यवतमाळ येथील कलीम खाँ कासम खाँ यांची दिनांक १८.०१.१९८८ रोजीची मौजा वाई (रुई) ता. यवतमाळ येथे झालेली जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वाई (रुई) नोंदवहीमध्ये केलेली / झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३ (३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्वत्र नागरीकांना याव्दारे कळविण्यात येते की, कलीम खाँ कासम खाँ, रा.S/O कासम खान, गणपती मंदीर रोड, माळी पुरा, यवतमाळ ४४५००१ यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेण्याबाबत कोणासही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायायलयास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, कोणाराही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही, असे गृहीत धरुन अर्जदार याचा जन्म नोंदीचा आदेश पारीत करण्यात येईल, तदनंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीचा ग्राहय धरण्यात येणार नाही.

आज दिनांक ०६.१०.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**डॉ. योगेश देशमुख**
**तालुका दंडाधिकारी,**
**यवतमाळ**

# राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक पदाधिकारी यांचे राजीनामे

## नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर राज्यमंत्र्यांना मोठा झटका

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाच्या जिल्हा उपाध्यक्षाने राजीनामा दिला आहे. सोबतच अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्षाने देखील राजीनामा दिला आहे. त्या दोघांचेही कट्टर समर्थक असलेल्या ४३ कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे शहराध्यक्षाकडे राजीनामा दिला आहे.

यामुळे पुसद शहरात ऐन निवडणुकीच्या वेळेवर एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी राजीनामा दिल्याने राज्यमंत्र्यांना



मोठा झटका बसला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे जिल्हा उपाध्यक्ष पठाण अहमद खान नजीर खान यांनी दि.२७ ऑक्टोबर रोजी पक्षाच्या जिल्हाध्यक्षाकडे तर अल्पसंख्याक शहराध्यक्ष नन्हे खाँ चांद खाँ यांनी दि. ३० ऑक्टोबर रोजी अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्षाकडे राजीनामा दिला आहे. त्या दोघांच्या ४३ कट्टर समर्थकांनी पक्षांचे शहराध्यक्ष मोहम्मद इरफान यांच्याकडे मोहम्मद फय्याज व्हॉट्सॲपवर राजीनामा दिला आहे.

मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजीनामा दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाला आगामी होणाऱ्या सार्वत्रिक (स्थानिक स्वराज्य संस्था) नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर मोठा हदरा बसला आहे.

# महिला विद्यालयाचा खो-खो संघ विभागस्तरावर

## जिल्हास्तरीय स्पर्धेत सर्व सामन्यात एकतर्फी विजयी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ तर्फे आयोजित जिल्हास्तरीय शालेय खो खो स्पर्धेत स्थानीय महिला विद्यालयातील १७ वर्ष वयोगटातील सर्व सामन्यात विजय संपादन करून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

स्थानीय शिशुविहार मंडळ संचालित महिला विद्यालयाचा १७ वर्ष वयोगटाचा संघ क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या तर्फे आयोजित जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेत सर्व सामन्यात एकतर्फी विजयी संपादन करून अमरावती विभागीय शालेय खो खो स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले. विद्यालयातील विजयी संघात कृतिका राऊत, रुचाली गुरनुले, वेदिका वाघमारे, हर्षदा राऊत,



गौरी दोंदल, हर्षदा भुते, नंदिनी उजवणे, राधिका वाघमारे, गुंजन उमरे, खुशी सायरे,रिद्धी राऊत, मिताली वाघमारे, कुलश्री फुसे, सायली मडावी, पलक वह्राडे यांचा समावेश असून विजयी संघ आपल्या यशाचे श्रेय क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक तथा प्रशिक्षक राहुल अरुण ढोणे सर यांना देतात. विद्यालयाच्या विजयी संघाचे शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्रीताई उपाध्ये, पर्यवेक्षिका रेखाताई कुडमते, सर्व शिक्षक, कर्मचारी,विद्यार्थीनी तसेच शिशुविहार मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत देशपांडे सचिव डॉ. श्रीधर देशपांडे व सर्व संचालक मंडळ त्याप्रमाणे खो खो प्रशिक्षक अविनाश जोशीसर, प्रणय रामटेके, सर्व खेळाडु संघटना पदाधिकारी यांनी कौतुक करून पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.

**तालुका दंडाधिकारी, यवतमाळ यांचे न्यायालय**
Email Id- tahsildaryavatmal@gmail.com
दुरध्वनी क्रमांक ०७२३२-२३८१९४
प्रकरण क्रमांक ३४/जन्म-मृत्यु नोदणी/२०२५
मौजा वाई (रुई) ता.यवतमाळ

**जाहीर सुचना**

ज्याअर्थी, निबंधक तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, रुई (वाई) यांनी मौजा वाई (रुई) ता. यवतमाळ येथील सादीक खॉ कासम खाँ यांची दिनांक १९.०५.१९७६ रोजीची मौजा वाई (रुई) ता. यवतमाळ येथे झालेली जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वाई (रुई) नोंदवहीमध्ये केलेली / झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३ (३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्वत्र नागरीकांना याव्दारे कळविण्यात येते की, सादीक खाँ कासम खॉ, रा.प्लॉट क्रमांक २८२, भोसा रोड, गोल्डन पार्क, यवतमाळ - ४४५००१ यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेण्याबाबत कोणासही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायायलयास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, कोणासही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही, असे गृहीत धरुन अर्जदार यांचा जन्म नोंदीचा आदेश पारीत करण्यात येईल, तदनंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीचा ग्राहय धरण्यात येणार नाही.

आज दिनांक ०६.१०.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**डॉ. योगेश देशमुख**
**तालुका दंडाधिकारी,**
**यवतमाळ**

# दिव्यांग तरुणाच्या जिद्दीला 'स्माईल'ची साथ

## आत्मनिर्भर होण्यासाठी कॉम्प्युटर भेट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी : कमरेखाली अपंग असलेला, पण आत्मविश्वासाने भरलेला एक तरुण... शिक्षण आणि डिजिटल कौशल्यांच्या जोरावर स्वतःचं भविष्य घडवण्याचा निर्धार... आणि त्याच्या या प्रवासाला साथ देणारी "स्माईल फाउंडेशन" ही सेवाभावी संस्था! आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या तीन तत्त्वांवर कार्य करणारी स्माईल फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत वणीतील गुरुनगर येथील एका दिव्यांग युवकाला आत्मनिर्भरतेची दिशा दिली. संस्थेच्या उपक्रमांतर्गत या तरुणाला संगणक, टेबल आणि आवश्यक साहित्य देण्यात आले. ही मदत संस्थेचे सदस्य सुभाष आत्राम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.





या तरुणाचे जीवन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झाले. मोठा होताच त्याने घरी हातभार लावण्यास सुरुवात केली. मात्र कामावर असताना एक अपघात झाला आणि त्याला कमरेखाली अपंगत्व आले. मात्र त्याने हार मानली नाही. हा तरुण उत्कृष्ट चित्रकार आहे. त्यामुळे तो डिजिटल डिझायनिंग, ऑनलाइन कोर्सेस आणि विविध कौशल्ये आत्मसात करत आहे. संगणकाच्या मदतीने तो आता स्वयंरोजगाराच्या दिशेने पावले टाकत आहे. त्याचं स्वप्न केवळ स्वतःचं नाही, तर कुटुंबालाही आधार देण्याचं आहे. या प्रेरणादायी प्रवासात स्माईल फाउंडेशनने दानदात्यांच्या सहकार्याने त्याला नवी दिशा दिली. "उज्वल भविष्यासाठीची प्रेरणा" ठरणाऱ्या या उपक्रमासाठी पीयूष आत्राम, आदर्श दाढे, विश्वास सुंदराणी, उत्कर्ष धांडे, खुशाल मांढरे, तन्मय कापसे, अनिकेत वासरिकर, कार्तिक पिदुरकर, जगदीश गिरी, कुणाल आत्राम, निकेश खाड़े, प्रसाद पिपराडे, गौरव कोरडे, तुषार वैद्य, सचिन भोयर, सचिन काळे, मयूर भरटकर आणि भूषण पारवे यांनी परिश्रम घेतले.

# लिंगायत समाज यात्रेत सहस्त्रबाहु चॅरिटेबल ट्रस्टचा सामाजिक उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : बीड जिल्ह्यातील कपिलाधार येथे पार पडणाऱ्या वीरशैव लिंगायत समाज यात्रे दरम्यान समाजातील बांधवांसाठी सहस्त्रबाहु चॅरिटेबल ट्रस्ट, उमरखेड यांच्या वतीने दि 31 रोजी मोफत औषध वितरणाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी वीरशैव लिंगायत समाज संघटना उमरखेड, जंगम समाज संघटना उमरखेड आणि सौ. पार्वतीबाई का .शिरडकर यांचे संयुक्त सहकार्य लाभले.

यात्रेत सहभागी सर्व समाज बांधवांची वैयक्तिक आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी औषधी संच सहस्त्रबाहु चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी नितीन भुतडा, सचिन जयस्वाल यांच्या हस्ते प्रकाश दुधेवार, डॉ. शिवकुमार शिवणकर, बालाजी शिरडकर, रवी पुजारी आणि प्रा. संतोष बिच्चेवार यांना सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळू भट्टड, वसीम शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक रामोड, वाहतूक शाखेचे रोहित बेंबरे ,भागेश चिंचोलकर शिव माने मयूर रावले आदी मान्यवर उपस्थित होते.

दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपत सहस्त्रबाहु ट्रस्टतर्फे विविध यात्रांमध्ये मोफत औषध वितरण व आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातात. लिंगायत समाजाच्या वतीने ट्रस्टच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. सेवेतून समाज आरोग्यदायी" हा ट्रस्टचा संदेश यात्रेतूनही झळकला!

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### आसेगापूर्णा येथे सरदार पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी

**पूर्णानगर-** स्थानिक छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यस्थीती संयुक्तरित्या डॉ. प्रवीण सरदार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. याप्रसंगी विध्यार्थ्यानी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून एकात्मतेची शपथ घेतली. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे व इतर मान्यवरांनी या महामानवाच्या अष्टपैलू जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला संजय सोळंके, विकी पवार, सुजल डांगे व असंख्य गणमान्य उपस्थित होते.




### छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात सरदार पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**खल्लार-** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे रासेयो पथकाच्या वतीने लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून तसेच भारताच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री भारतरत्न इंदिरा गांधी आर्यन लेडी यांची पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी डॉ.प्रविण सदार, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे यांच्यासह कार्यक्रमाला संजय सोळंके, विकी पवार, सुजल डांगे रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

### केवलराम काळे यांची नियुक्ती

**अचलपूर-**आदिवासी विकास महामंडळाचे विद्यमान संचालक आ. केवलराम काळे यांची पुन्हा संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याने भाजपा पक्षाचे मेळघाट ग्रामीणचे जिल्हा सरचिटनीस सुधीर रसे यांनी आ.केवलराम काळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



आदिवासी विकास महामंडळाच्या नाशिक येथे झालेल्या निवडणुकीत अविरोध विजयी झाल्याचे त्यांची मोर्चेबांधणी यशस्वी झाल्याचे राजकीय क्षेत्रात मानले जात आहे. सध्या निवडणुकीचा काळ सुरू झाला असून पुढे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पंचायतीच्या निवडणूका आहे. त्या दृष्टीने आदिवासी विकास महामंडळावर निवडून येणे हे महत्त्वाचे मानले जात आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या अनेक योजनातून आ. काळे यांनी अनेक आदिवासींचे कुटुंबे आर्थिकरित्या फुलविले असून अतिदुर्गम भागातील राजकारणात त्यांची मोठी पकड असल्याचे दिसून येते.यावेळी भाजपा पक्षाचे जिल्हा सरचिटनीस सुधीर रसे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की ,आ. केवलराम काळे यांनी महामंडळाच्या खावटी कर्ज योजनेतून कुपोषणग्रस्त भागाला पावसाळ्यात ४ महिने पुरेल एवढी खावटी मिळवून देण्यास सहकार्य केले आहे.तसेच आ . केवलराम काळे यांनी नागरिकांना अनेक योजनेचा लाभ देऊन आदिवासींचे जीवनमान उंचावण्यात मदत झाल्याचे भाजपा पक्षाचे सुधिर रसे यांनी सांगितले.

# अचलपूर नगरपरिषदेच्या ७७४ आक्षेपांवर झाली सुनावणी

## पालिकेच्या २० प्रभागांमध्ये ९९ हजार ६५९ मतदार; आरक्षणात अनेक इच्छुक उमेदवारांची झाली गोचा

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठ्या 'अ' वर्ग अचलपूर नगर परिषदेच्या मतदार यादीवरील आक्षेप निकाली काढण्यात आले आहेत. जुळ्या शहरातून ४१ नगरसेवक व नगराध्यक्षपदासाठी ९९ हजार ६५९ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव झाले. त्यामुळे भाऊंची गोची झाली, तर काहींचे नशीब प्रभागातही फुटले. परिणामी भैया मागे पडले आणि जुळ्या शहरात भैयांसोबत भाभीजींची छबी शुभेच्छा फलकांवर झळकली.



अचलपूर - परतवाडा या जुळ्या शहरातील नगर परिषदेच्या निवडणुकीत नेहमीप्रमाणे अनेकांची निराशा झाली. नगराध्यक्षपदासाठी पाच वर्षे स्वप्न बघणाऱ्यांचा मोहभंग झाला. तथापि, पत्नीचे नाव पुढे करून उमेदवारी मागण्याची तयारी अनेकांनी विविध पक्ष-संघटनांकडे केली आहे. पालिकेत एकूण २० प्रभाग आहेत. त्यांतून ४१ नगरसेवक निवडून येतील. प्रभाग क्रमांक २० मध्ये तीन नगरसेवक निवडून द्यावे लागणार आहेत. नगराध्यक्षपद जनतेतून असल्याने यंदाही चुरस राहणार आहे.

### प्रभाग क्रमांक २० मध्ये सर्वाधिक मतदार

अचलपूर नगर परिषदेमध्ये एकूण ९९ हजार ६५९ मतदारांमध्ये १० इतर मतदारांचा समावेश आहे, यात ५० हजार ३१ पुरुष व ४९ हजार ६२३ महिला आहे. सर्वात कमी मतदार प्रभाग क्र. २ मध्ये ४११९ असून सर्वाधिक महात्मा ज्योतिबा फुले प्रभाग २० मध्ये ६८०१ आहेत.

### प्रभागनिहाय मतदारयादी

प्रभाग १ गणेशनगर ४७८४, प्रभाग २ सिव्हिल लाइन्स ४११९, प्रभाग ३ लोकमान्य टिळक ५७६५, प्रभाग ४ राणी लक्ष्मीबाई ५२१०, प्रभाग ५ राममंदिर ४९७९, प्रभाग ६ महाराणा प्रताप ४६६६, प्रभाग ७ छत्रपती शिवाजी महाराज ४३४९, प्रभाग ८ संत गाडगेबाबा ४४१८, प्रभाग ९ लाल बहादूर शास्त्री ४५६८, प्रभाग १० डॉ. बाबासाहेब आंबेडकर ५१५३, प्रभाग ११ मेहराबपुरा ५१०२, प्रभाग १२ स्वामी विवेकानंद ५४७५, प्रभाग १३ चौधरी मैदान ५६२५, प्रभाग १४ डॉ. झाकीर हुसेन ४९५७, प्रभाग १५ बुंदेलपुरा ५०९३, प्रभाग १६ अश्रफपुरा ४६९७, प्रभाग १७ मो. आझाद अ. कलाम ४७९१, प्रभाग १८ जगदंबा देवी ४६७५, प्रभाग १९ शहीद भगतसिंग ४४३२, प्रभाग २० म. ज्योतिबा फुले ६८०१

### २२३ आक्षेप फेटाळले

वॉर्ड पुनर्रचना, मतदार यादीवर एकूण ७७४ आक्षेप नोंदविले होते.अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, मुख्याधिकारी डॉ. धीरज गोहाड यांच्यासह अधिकाऱ्यांनी सुनावणी घेत ५५१ आक्षेप मान्य करीत त्यावर दुरुस्ती सुचविली. २२३ आक्षेप फेटाळण्यात आले.

# पत्रकारांचे संघटन मजबूत असणे काळाची गरज-सरवटकर

## स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या मेळावा

**अमरावती (प्रतिनिधी)** आज देशात, राज्यात तसेच जिल्यात पत्रकारांवर भ्याड हल्ले, अपहरण, होत असून या घटना दिवसेंदिवस वाढत असून शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने लोकशाहीचा चौथा आधारस्थंभ ढासळत चालला आहे. त्यासाठी यावर रामबाण औषध म्हणून पत्रकारांच संघटन मजबूत असणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी पत्रकार संघांचे अमरावती जिल्हा अध्यक्ष संजय सरवटकर यांनी शासकीय विश्राम भवन कॅम्प अमरावती येथे स्वाभिमान श्रमिक पत्रकार संघाच्या मेळाव्यात केले. प्रमुख अतिथी म्हणून वाय. एम. रामटेके, सामाजिक गोलमेज परिषद कोअर कमेटीचे वरिष्ठ सदस्य भाऊसाहेब सरकटे उपस्थित होते.




याप्रसंगी सर्वप्रथम उपस्थित पत्रकार बांधवाचा व मान्यवरांचा परिचय व नंतर स्वागत करण्यात आले. नंतर जिल्हाध्यक्ष यांनी पत्रकार संघाची भूमिका समजावून सांगितली असता असंख्य पत्रकारांनी स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे सदस्य अर्ज भरून घेतले. व संघटन मजबूत करण्याचे आश्वासन दिले. बैठकीला प्रामुख्याने अमोल खंडारे, अजय रामटेके, अ. अलीम, अ. तमीज, मनोज कांबळे, रवि हजारे, प्रशांत रामटेके, सुनील पाटील, कैलास इंगळे, साजित अख्तर अ. काजी, आदेश पाठक, कासम शहा इमाम शहा, ॲड. राजू बक्षी जामनेकर, प्रेमदास मानकर, धनराज खर्चान, रमेश औघड, देवराव मोलके अतुल भटकर, कमलेश सरवटकर, सो. पूजा ढोके श्रीकृष्ण नाईक, किरण शहारे, सुनील घटाळे आदी पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आकाशवाणी लेखक संजय वाघुळे तर आभारप्रदर्शन गजानन जिरापुरे यांनी केले.

# गेल्या तीन दिवसापासून पाणी टंचाईमुळे नागरिक त्रस्त

## विविध ठिकाणी विजेचा ही लपंडाव सुरू

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहरामध्ये गेल्या तीन दिवसापासून अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाच्या उदासीन कारभारामुळे पाणी टंचाई चा समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.शहरात पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. सोबतच महावितरण विभागाकडून सुद्धा अनेक भागात दोन-तीन दिवसापासून विजेचा लपंडाव सुरू आहे.



एकीकडे चार ते पाच तास वीज पुरवठा खंडित असल्यामुळे याचा फटका मात्र नागरिकांना ,विद्यार्थी, वृद्ध मंडळींना बसत आहे. पण या संदर्भात विदर्भ मिल पावर स्टेशन येथे कार्यालय असल्याने तेथील दूरध्वनी क्रमांक सुद्धा बंद आहे.यामुळे अचलपूर नगर परिषद व महावितरण परतवाडा कार्यालय यांच्या दुर्लक्षामुळे अचलपूर शहरातील नागरिक दोन-तीन दिवसापासून विविध समस्यांचा सामना करीत आहे. परतवाडा शहरांमध्ये एका नदीच्या संरक्षण भिंतीचे काम सुरू असताना अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाच्या पाईपलाईन लिकेज झाली होती. अनेक दिवसांपासून जुळ्या शहरात अचलपूर न.प पाणीपुरवठा विभागाचे मुख्य पाईपलाईन लिकेज होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे .यामुळे विविध विकासकामे सुरू असताना अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी ,अधिकारी त्यावेळी उपस्थित नसतात का ? हा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे. अनेक वेळा जेसीबी द्वारे मुख्य पाईपलाईन फुटल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी दोन ते तीन दिवस लागतात आणि नागरिकांपर्यंत पाणीपुरवठा खंडित असतो.

याचा फटका मात्र सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून ठोस उपाय योजना राबवली जाणार का? हा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे. सोबतच विविध भागात अनेक वेळी वीज पुरवठा खंडित होत असल्याने वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी सुद्धा लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे पक्षाचा उमेदवार विजयी होणार-ज्ञानेश्वर धाणे

## युती न झाल्यास स्वबळावर निवडणूक लढवणार, जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहरातील टक्कर चौक येथे शिवसेना (शिंदे ) पक्षाचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा आज संपन्न झाला. यावेळी शिवसेना (शिंदे) गटाचे उपनेते माजी आमदार ज्ञानेश्वर धाणे पाटील, सह संपर्कप्रमुख अमरावती गजानन वाकोड, श्याम देशमुख, जिल्हाप्रमुख अमरावती सुनील डिके, जिल्हाप्रमुख एड.ठाकूर प्रमोद सिंह गड्रेल, संपर्कप्रमुख महिला आघाडी वर्षा भोयर, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड आदी नेते मंडळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बीलनपुरा शाखेचे उद्घाटन सोहळा झाला.

तसेच रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा सुद्धा यावेळी झाला. या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित नेते मंडळींचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सामान्य माणसाची प्रलंबित विविध शासकीय कार्यालयाशी संबंधित कामे मार्गी लागणार आहे. आणि न्याय मिळणार आहे. त्यासोबत अचलपूर न. प नगराध्यक्षपद शिवसेना च्या ताब्यात होते. यावेळी सुद्धा शिवसेना शिंदे गटाचा उमेदवारच विजयी होणार




आहे. आणि यासाठी स्थानिक पातळीचे सर्व नेते मंडळी आग्रही असून वरिष्ठ स्तरापर्यंत या संदर्भात नेते मंडळींनी पाठपुरावा करण्याचा आग्रह सुद्धा त्यांनी यावेळी व्यक्त केल. या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सामान्य माणसाला मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. आणि सामान्य माणसाला न्याय मिळणार आहे.

शिवसेना (शिंदे) गटाचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी जनसामान्यांसाठी राबविलेल्या कल्याणकारी योजनांमुळे संपूर्ण राज्य, देशात त्यांनी वेगळी ओळख मिळाली आह.

अचलपुर न.प नगराध्यक्ष पद शिवसेना पक्षाच्या ताब्यात असल्याने यंदाही अचलपूर नगराध्यक्ष पदावर शिवसेना (शिंदे) गटाचा उमेदवार विजयी होणार असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. यासाठी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे निर्देशही माजी आमदार ज्ञानेश्वर धाणे पाटील यांनी दिले.यावेळी उपस्थित विविध नेते मंडळींनी आपआपली मनोगत व्यक्त केली. यावेळी मोठ्या संख्येने शिवसेना शिंदे गटाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी श्याम सिंह गड्रेल,तालुकाध्यक्ष विवेक महल्ले, शहराध्यक्ष विलास सोळंकी, शहराध्यक्ष आतिश अहिर, माजी नगरसेवक राजू शर्मा, राजू केदार, विनोद गोखले, नितीन चंदेले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मित्रवर्य अनिल अग्रवाल यांस वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा!



मैत्री म्हणजेच अनिल

'मैत्री जपणं आणि सतत गोतावळ्यात राहणं हे जर कोणाला परफेक्ट जमलं असेल तर माझ्यापुढे एकच नांव येतं ते म्हणजे अनिल अग्रवाल' अनिल ला हे समीकरण पक्कं जमलं. अमर्याद व्यक्तिमत्त्वाचा धनी आणि कुशल संघटक संपादक असलेला आमचा सर्वांचाच मित्र अनिल अग्रवाल याचा आज वाढदिवस. सांध्य दैनिक अमरावती मंडल आणि आपली मातृभूमि या दोन वर्तमानपत्राचा अनिल संपादक आहे.

सकाळी प्रकाशित होणाऱ्या दैनिक वर्तमानपत्रांच्या स्पर्धात्मक जगात सायंकाळचे एखादे दर्जेदार वर्तमानपत्र रूजविणे, हे नक्कीच सोपे नाही. ज्या वर्तमान पत्राला आपण सांध्यदैनिक असं म्हणतो, असे सांध्यदैनिक हे अमरावती सारख्या छोट्या शहरात यशस्वीपणे रूजविणे हे अत्यंत अवघड काम. मुंबई, नाशिक पुणे वगळता मोठमोठ्या शहरांमध्ये आजही सांध्यदैनिक नाहित ही वस्तुस्थिती आहे. पण अमरावतीत मात्र सांध्यदैनिक वाचायची सवय लावली ती अनिल अग्रवाल या उमद्या पत्रकारानेच. सांध्य दैनिकासोबतच आपली मातृभूमि हे सकाळी प्रकाशित होणारे दैनिकही अनिल ने प्रचंड मेहनत घेऊन वाचकांच्या मनोमनी उतरवलं. सोबतच अमरावती मंडल ची डिजीटल आवृत्ती, दृकश्राव्य माध्यमातून झालेली मंडल ची प्रगती आणि सामाजीक माध्यमाद्वारे झालेला अमरावती मंडल चा प्रवास हा थक्क करणारा आहे. अनिल च्या या सर्व उपक्रमात मोठे बंधू राजेश अग्रवाल यांची वर्तमान पत्राशी असलेली बांधिलकी आणि सातत्य हे कौतुकास्पद आहे. अमरावती मंडल च्या कार्यालयात प्रवेश करतानाच उजवीकडे एका लहानश्या टेबलवर राजेश नामक हे व्यक्तिमत्व चोवीस तासांपैकी अठरा तास हमखास दिसणार.

एकतीस वर्षांपुर्वी १९९२ पासून सुरू केलेले हे सांध्यदैनिक टिकवून ठेवून वाचकांना दररोज नवनवा वाचनिय मजकूर पुरविणे हे अनिलने शक्य करून दाखविले. टेलिव्हिजन वरील वृत्तवाहिन्यांचे जाळं आणि सोशल मिडीयाच्या या जमान्यात जेथे नावाजलेल्या दैनिकांनी अक्षरशः माना टाकल्या आणि त्यांची वर्तमान पत्रं वीस वीस पानावरून दहा पानांची झाली. तिथे मात्र अनिल आजही अमरावती मंडल हे सांध्यदैनिक अठरा ते वीस पानांचे प्रकाशित करतोय. कधी कधी तर मंडल ची दैनिक पृष्ठसंख्या तीस ते चाळीस पानांवर सुध्दा असते.

अमरावतीच्या बाजारपेठेत, आणि आता घराघरांतही मंडल या सांध्यदैनिकाची आतुरतेने वाट पहाणारा वाचक वर्ग तयार करण्यात अनिल च्या कल्पकतेला मानावेच लागेल. बरं नुसता वाचक वर्गच नाही तर मंडल मधील बातमीची विश्वासार्हता अनिलने जपली आहे. अनिल ची तीन दशकाची पत्रकारीता मी बघितली आहे. त्याच्या संपुर्ण पत्रकारीतेचा मी पण एक साक्षीदार आहे. अनिल हा एक उत्तम संघटक आहेच. तीस वर्षांपासून त्यानं त्याच्या संस्थेकरीता काम करणारी माणसं टिकवून ठेवली आहे. कुशल संघटक असल्यानेच त्यानं तयार केलेल्या टिम च्या आधारावर तो यशस्वी संघटक संपादक झाला आहे. पण मला नेहमी असं वाटतं की अनिल पत्रकारितेत आला आणि शैक्षणीक क्षेत्र एका उमद्या प्राध्यापक, वक्ता आणि शिक्षकाला मुकले... अनिल पत्रकारीतेत नसता आला तर नक्कीच एक उत्तम असा लोकप्रिय प्राध्यापक, शिक्षक किंवा प्रेरक वक्ता झाला असता. त्यानं कौशल्यपुर्ण शिक्षण देणारी व्यवसाभिमुख शाळा महाविद्यालये काढून ज्ञानदालने खुली केली असती. 'तो नेहमी म्हणतो की, नोकरी करनेसे बेहतर खुद मालक बनो. छोटा मोटा कोई भी व्यापार शुरू करो'. अर्थात त्याच्या या प्रेरणेने काही जणांनी स्वतः चा व्यवसाय नक्कीच सुरू केला असेल यात मुळीच शंका नाही. मेहनत, चिकाटी अन् जिद्दीच्या भरवश्यावर त्यानं मंडल आणि मातृभूमीचा व्याप वाढविला आहे. या प्रकाशनाच्या माध्यमातून कित्येक लोकांना रोजगार दिला आहे. त्याच्या अंगी नेतृत्वाचे गुण आहेतच. तो एक चांगला नेता सुध्दा होऊ शकतो. पण त्यानं रोजगारभिमुख होणे पसंत केले आहे. कोरोना सारख्या जिवघेण्या कठीण प्रसंगातही त्यानं कित्येक हातांना काम दिले आहे. संघर्षावर चिकाटीनं केलेली मात म्हणजेच त्याचं सांध्यदैनिक मंडल हे आहे. अमरावती मंडल हे सांध्यदैनिक आज अमरावतीचे ब्रैंड झाले आहे. सांध्यदैनिक म्हणजे अमरावती मंडल हे समिकरण वाचकांमध्ये रुजले आहे.

बरं येवढं यश मिळवूनही हा आपला जमिनीवरच. कुणी आवाज द्यायचा अवकाश की हा ओ द्यायला तत्पर. मैत्री जपणं आणि सतत गोतावळ्यात राहणं हे याला पक्कं जमलं. त्याच्या संघटन कौशल्याचं उत्तम उदाहरण म्हणजे अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ होय. एखाद्या प्रकल्पाचा सरकार दरबारी पाठपुरावा करणे हे काही सोपं काम नाही पण या पठ्ठ्यानं कागदोपत्री पाठपुरावा करून सरकारचे दरबारी हलविले. जिवाभावाची जमवलेली माणसं अन मित्रमंडळींचे सहकार्य मिळविले आणि पत्रकारांसाठी पत्रकार संघांची एक उत्तम वास्तू उभी केली. जिल्हा मराठी पत्रकार संघाची इमारत उभी करण्याचे संपुर्ण श्रेय अनिलचेच. संघटनेच्या सदस्यांचे योगदान आहेच. पण अनिलने दृढनिश्चय केला म्हणून पत्रकार भवनाची वास्तू अस्तित्वात आली हेही तेवढंच खरं. पत्रकार कल्याणाच्या अनंत खटपटी तो सतत करीत असतो. प्रसारमाध्यमांशी संबधीत सर्वोच्च संस्था असलेल्या प्रेस कौन्सील ऑफ इंडिया चे सदस्यपदही त्यानं भुषविले आहे. वृत्तपत्र मालकांची देशपातळीवर असलेली 'इलना' या संघटनेतही अनिल गेल्या कित्येक वर्षापासून सक्रिय आहे. मालकांच्या या संघटनेत अनिल अमरावतीचेच नाही तर संपुर्ण विदर्भाचे प्रतिनिधीत्व करतो. देशपातळीवर त्याचा जनसंपर्क दांडगाच आहे. राजकिय, सामाजिक, प्रशासनिक पातळीवर त्याचे देशांतर्गत चांगले संपर्क आहे. एखादी घटना घडली की ती अनिलला सर्वप्रथम तर कळतेच पण त्या घटनेमागची बातमी म्हणजेच सत्यस्थिती त्याला माहिती असते. त्या विषयावर त्यानं कित्येक लोकांशी चर्चा केलेली असते. थोडक्यात काय तर घटनेच्या पृष्ठभूमीचा आणि पार्श्वभूमीची चिरफाड केल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. पत्रकार जगतातील हे एक नावाजलेले नांव म्हणजे अनिल.

'वयाची त्रैपन्न वर्ष पुर्ण करून आज (३ नोव्हेंबर) अनिल चौपन्नाव्या व्या वर्षात पदार्पण करतोय. त्यानं आजपर्यत बघितलेली स्वप्न पुर्ण झाली आहेतच. यापुढेही त्याची सर्व स्वप्न, इच्छा, आकांक्षा पुर्ण होवोत हीच इश्वररचरणी प्रार्थना. त्याची सर्व स्वप्न पुर्ण होऊन त्याला निरामय आयुष्य प्रदान करावे बहाली करावे ही प्रार्थना आणि अनिल च्या पुढच्या वाटचालीस कोटी कोटी शुभेच्छा'!

**संजय पाखोडे, अमरावती**

# ऐसा हा योगिराजु,तो विठ्ठल मज उजु

महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनाच्या मुख्य स्त्रोताच्या केंद्रस्थानी आहे पंढरीचा श्री विठ्ठल आहे. श्री विठ्ठलाच्या पायी माथा टेकण्यासाठी असंख्य वारकरी तसेच भक्तिवंत मोठ्या श्रद्धेने त्याच्याकडे जातात. जणूकाही 'विठो पालवीत आहे' या भावनेने त्याच्या पायी माथा टेकतात. असा देवही कुठे नाही अन् असे भक्तही नाहीत.कार्तिकी एकादशी, त्यानिमित्त आपल्याकडे धर्मशास्त्रानुसार प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक पंधरवड्यातील अकरावी तिथी म्हणजे एकादशी असे म्हटले जाते. प्रत्येक महिन्याचे पंधरा दिवसांचा एक असे दोन भाग असतात. पहिल्या भागाला शुक्ल किंवा शुद्ध पक्ष असे म्हणतात, तर दुसऱ्या पंधरवड्याला कृष्ण किंवा वद्य असे म्हणतात. त्यामुळे प्रत्येक महिन्यात शुद्ध किंवा शुक्ल आणि वद्य किंवा कृष्ण अशा दोन एकादशी असतात. चैत्र महिन्यापासून शुद्ध पंधरवड्यातील चौथी दशी म्हणजे शयनी एकादशी असते. तिला महाएकादशी असेही म्हटले जाते.

एकादशीची उत्पत्ती कशा प्रकारे झाली, याबद्दलची माहिती पद्मपुराणाच्या उत्तरकांडामध्ये सांगितलेली आहे. मूर नावाचा एक अत्यंत उन्मत्त राक्षस देवांना अतिशय छळत होता. तेव्हा देवांनी भगवान विष्णूंची प्रार्थना करून त्यांना या दैत्याचा वध करण्याची विनंती केली. या कामामध्ये भगवान विष्णूंना एका देवतेचे साहाय्य झाले. तिच्या साहाय्याने विष्णूंनी त्या राक्षसाचा वध केला. त्यावेळी तिन्ही लोकांत, चारही युगांत आपले श्रेष्ठत्व असावे असे मागणे त्या देवतेने भगवान विष्णूंकडे मागितले. सर्व तीर्थांहून ती श्रेष्ठ समजली जावी, तसेच जो कोणी या दिवशी उपवास करून भगवान विष्णूंची भक्ती करेल त्यावर विष्णूंनी प्रसन्न व्हावे, असाही वर तिने मागितला. विष्णूंनी तो वर दिला आणि त्यांनी त्या देवीचे नाव एकादशी असे ठेवले. ज्या पद्मपुराणात एकादशीच्या उत्पत्तीसंबंधीची ही कथा आहे.एकादशी हे एक व्रत असून ते काम्य व नित्य अशा दोन प्रकारचे असते. एकादशीमध्ये स्मार्त व भागवत असे दोन भेद आहेत. पंचांगाप्रमाणे एकापाठोपाठ दोन एकादशी आल्या, तर पहिली कादशी स्मार्त आणि दुसरी एकादशी भागवत असे म्हणतात. ती भागवत एकादशी वारकऱ्यांना अभिप्रेत असते. आषाढ महिन्यातील शयनी एकादशी आणि कार्तिक महिन्यात येणारी प्रबोधिनीएकादशी व्रताच्या दृष्टीने खूप महत्त्वाच्या आहेत. आषाढातील एकादशीला भगवान विष्णू निद्रा घेत असतात म्हणून तिला शयनी एकादशी असे म्हणतात, तर कार्तिक महिन्यातील एकादशीला ते जागृत होतात म्हणून तिला प्रबोधिनी एकादशी असे म्हटले जाते. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या कालावधीला चातुर्मास असे



म्हणतात. या चातुर्मासात वारकरी मंडळी आणि इतर अनेक लोक व्रतवैकल्ये तसेच अनुष्ठान, विविध ग्रंथांचे पारायणे करतात. भागवत पुराणाचे वाचन या चार महिन्यांत रोज केले जाते. भाद्रपद महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात सात दिवस भागवताचे वाचन करून आठव्या दिवशी गोवर्धन काला प्रसाद म्हणून वाटला जातो. पंढरपुरामध्ये देहू, आळंदी या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भजन, कीर्तन, ज्ञानेश्वरीचे पारायण, प्रवचन आदी कार्यक्रम नित्यनेमाने वारकऱ्यांनी समूहाने करावयाची असतात. यामध्ये अक्षरशः हजारो मंडळींचा दरवर्षी सहभाग असतो. 'चंद्रभागेत करू स्नान। घेऊ पुंडलिकाचे दर्शन। किंवा 'विठ्ठल मंदिराच्या कळसाचे घेऊ दर्शन अथवा पादस्पर्शपूर्वक विठ्ठलाचे दर्शन अशाप्रकारे यावेळी दर्शन घेतले जातेमूर्तिशास्त्राने सर्वसामान्यांचे चर्मचक्षू आणि भावचक्षू यांचा सूक्ष्म विचार केला.

विठ्ठलाची मूर्ती ही योगस्थानक मूर्ती आहे. योग, भोग, वीर आणि अभिचारिक हे मूर्तीचे चार प्रकार असतात. पैकी भोग मूर्ती असते, ती ऐहिक प्राप्त करून देणारी, समृद्धी देणारी असते. विठ्ठलाच्या या मूर्तीला दोनच हात आहेत. एका हातात शंख आहे, तर दुसऱ्या हातात कमळ आहे. म्हणजे गदा आणि चक्र ही शस्त्रं त्याच्या हातात नाहीत. कारण, तो योगी आहे. 'चित्तवृत्ति निरोध:' असे पतंजलींनी म्हटले आहे. योग करताना छाती, मान आणि डोके एका ओळीत पाहिजे. तेही विठ्ठलाच्या या मूर्तीचे आहे आणि ती मूर्ती उभी आहे, म्हणून तिला स्थानक म्हणायचे.

वारकरी पंथातील आद्यगुरू संत ज्ञानेश्वर महाराजांनीही त्याला योगीराज असे संबोधले आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'ऐसा हा योगिराजु, तो विठ्ठल मज उजु।' उजु म्हणजे आवडणे. हा योगिराज आहे म्हणून मला आवडतो, असे कोणी म्हणावे? तर स्वत: योगी असलेल्या ज्ञानदेवांनी. याशिवाय शंकराचार्यांच्या पांडुरंगाष्टकामध्ये 'महा योगपीठे, तटे भीमरथ्याम, वरे पुंडरिकाय धातुमुनिंद्रै' अशी सुरुवात आहे. म्हणजे, हे महायोगपीठ आहे. तिथे हा योगी विठ्ठल आहे. ज्ञानेश्वरही त्याला योगी म्हणतात. म्हणूनच विठ्ठलाचे परमभक्त हे निरिच्छ, संपत्तीचा मागे नसलेले, निर्मोही योगी आहेत असे आपल्याला दिसते.

संत नामदेव, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सेना न्हावी, संत सावता माळी, संत जनाबाई, संत सखुबाई या साऱ्यांमुळे वारीला प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि हिमालयात उगम पावणाऱ्या गंगोत्रीची काशीला येईपर्यंत ज्याप्रमाणे सागरवत गंगा झाली तद्वत ज्ञानेश्वरांच्या काळापासून वारीला पूर येत गेला आणि आज तर लाखो लोकांच्या समुदायाने वारी दुथडी भरून वाहत असल्याचे दिसते. शेकडो वर्षांपासून लाखो वारकरी अनंत हालअपेष्टा सहन करीत, उन्हा-पावसाची पर्वा न करता आषाढीसाठी जणू काही 'विठो पालवीत आहे' या भावनेने त्याच्या पायी माथा टेकण्यासाठी निरपेक्षपणे जातात, त्याचे तरी रहस्य काय आहे? 'योगिया दुर्लभ' अशा त्याचे केवळ दर्शन घडावे, या असीम श्रद्धेने! असा देवही कुठे नाही अन् असे भक्तही नाहीत.

**डॉ. गो. बं. देगलूरकर,**
ज्येष्ठ मूर्तीशास्त्रज्ञ

# भारतासाठी चाबहार बंदराचे धोरणात्मक महत्व



चाबहार बंदर भारतासाठी खूप महत्वाचे आहे. ते एक धोरणात्मक व्यापार मार्ग प्रदान करते जे भारताला पाकिस्तानमधून न जाता अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांमध्ये प्रवेश करण्यास मदत करते. हे बंदर भारतासाठी पर्यायी व्यापार मार्ग तयार करते आणि मध्य आशिया आणि युरोपला आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर (INSTC) चा भाग म्हणून काम करते. शिवाय, ते भारताला इराणमध्ये महत्त्वपूर्ण उपस्थिती देते आणि प्रादेशिक भू-राजकारणात चीनच्या प्रभावाचे संतुलन साधण्यास मदत करू शकते.

इराणमधील चाबहार बंदर भारतासाठी धोरणात्मक महत्त्वाचे आहे. कारण ते भारताला पाकिस्तानला मागे टाकून अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांपर्यंत पोहोचण्यासाठी पर्यायी मार्ग प्रदान करते.हे बंदर अफगाणिस्तानमधून माल वाहतूक सुलभ करते, ज्यामुळे या प्रदेशाशी व्यापार आणि आर्थिक संबंध वाढतात.चाबहार बंदराचा विकास भारताला पाकिस्तानमधील ग्वादर बंदरात गुंतवणूक करून अरबी समुद्रात चीनच्या उपस्थितीचा सामना करण्यास मदत करतो.चाबहार बंदर विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट आफ्रिकन देशांशी व्यापार वाढवण्यावर केंद्रित नाही. बंदराचे धोरणात्मक स्थान अफगाणिस्तान आणि मध्य आशियामध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी अधिक काम करते.भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी चाबहार बंदराचे काही अप्रत्यक्ष फायदे असू शकतात, परंतु बंदराच्या विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट तेल उत्पादक अरब देशांशी संबंध मजबूत करणे नाही.चाबहार बंदराचा विकास हा इराण आणि भारतादरम्यानच्या गॅस पाइपलाइनच्या चर्चेपेक्षा वेगळा आहे. या बंदराचे प्राथमिक उद्दिष्ट व्यापार आणि वाहतूक मार्ग स्थापित करणे आहे.चीनने बांधलेल्या पाकिस्तानच्या ग्वादर बंदराच्या तुलनेत चाबहार बंदर भारतासाठी धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. २००३ मध्ये अटल बिहारी बाजपेयी सरकारच्या काळात भारताने इराणशी चाबहार बंदरासाठी चर्चा सुरू केली होती. अमेरिका इराण तणावामुळे या चर्चा थांबल्या. २०१३ मध्ये मनमोहन सिंग यांनी ८ अब्ज रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती. २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराण आणि अफगाणिस्तानच्या नेत्यां सोबत द्विपक्षीय करार केला. ज्यामध्ये भारताने टर्मिनल साठी ७०० कोटी रुपये आणि बंदराच्या विकासासाठी १२५० कोटी रुपये कर्ज देण्याची घोषणा केली. २०२४ मध्ये परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी कनेक्टिव्हिटी वर चर्चा केली. भारतीय कंपनी आयजीपीजीएलच्या मते पूर्ण झालेल्या चाबहार बंदराची क्षमता ८२ दशलक्ष टन असेल.इराणच्या चाबहार बंदरात आपले कामकाज सुरू ठेवण्यासाठी भारताला अमेरिकेच्या निर्बंधांमधून सहा महिन्यांची सूट मिळाली आहे. २९ सप्टेंबरपासून लागू होणाऱ्या या सूटची पुष्टी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने (एमईए) केली. बदलत्या जागतिक धोरणात्मक परिस्थितीत भारताला या धोरणात्मक बंदर प्रकल्पात आपला सहभाग कायम ठेवण्यासाठी या निर्णयामुळे तात्पुरती सूट मिळाली आहे.२०१८ मध्ये, अमेरिकेने इराण स्वातंत्र्य आणि काउंटर-प्रसार कायदा (आयएफसीए) अंतर्गत एक विशेष सूट दिली, ज्यामुळे भारत आणि इतर अनेक देशांना निर्बंधांचा सामना न करता चाबहारमध्ये काम करण्याची परवानगी मिळाली. तथापि, अमेरिकन सरकारने गेल्या महिन्यात घोषणा केली की ही सूट रद्द केली जाईल, ज्यामुळे इराणी पायाभूत सुविधांशी संबंधित क्रियाकलापांवर निर्बंध कडक केले जातील.व्यापक धोरणात्मक चौकटीचा भाग असलेल्या या हालचालीमुळे या प्रकल्पात भारताच्या चालू सहभागावर परिणाम होण्याची अपेक्षा होती. परराष्ट्र मंत्रालयाचे (एमईए) प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पुष्टी केली की भारताला ऑपरेशन सुरू ठेवण्यासाठी सहा महिन्यांची सूट देण्यात आली आहे, ज्यामुळे भारताला त्याच्या प्रादेशिक वचनबद्धतेचे व्यवस्थापन करण्यासाठी वेळ मिळाला आहे.चाबहार बंदरासाठी अमेरिकेच्या निर्बंधांमधून भारताने सहा महिन्यांची सूट दिली आहे, ही भारताच्या प्रादेशिक भागीदारी धोरणातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

भारत, इराक आणि अफगाणिस्तान यांनी एका त्रिपक्षीय करारावर सहमती दर्शवली ज्यामुळे चाबहार मार्गाचा वापर करून तिन्ही देशांमधील वाहतूक आणि वाहतूक कॉरिडॉरची पायाभरणी करणे आवश्यक झाले. कारण ते सागरी वाहतुकीचे एक प्रमुख केंद्र आहे. मध्य आशिया आणि अफगाणिस्तानला पर्यायी व्यापार मार्ग म्हणून काम करणाऱ्या अफगाणिस्तानच्या अनुषंगाने चाबहार बंदरापासून झाहेदानपर्यंत रेल्वे मार्गाची स्थापना करण्यावरही चर्चा झाली. भारतीय रेल्वे बांधकाम आणि इराणी रेल्वे मंत्रालय यांच्यात एक सामंजस्य करार झाला, ज्यामध्ये असे म्हटले होते की भारत बांधकामासंबंधी सर्व सुपरस्ट्रक्चर काम, सेवा आणि वित्तपुरवठा सुलभ करेल. नंतर जुलै २०२० मध्ये, भारताकडून झालेल्या विलंबामुळे, इराणला रेल्वे बांधकाम सुरू करावे लागले. तथापि, भारताच्या मते, इराणकडून योग्य अधिकार देण्यात विलंब झाला. भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण संबंधांमध्ये या बंदराचे धोरणात्मक महत्त्व विशेषतः महत्त्वाचे आहे. चाबहार बंदरामुळे भारताला इराणमध्ये प्रवेश मिळेल, जो आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरचा एक महत्त्वाचा प्रवेशद्वार आहे, ज्यामध्ये भारत, इराण, रशिया, मध्य आशिया आणि युरोपमधील समुद्री, रेल्वे आणि रस्ते मार्गांचा समावेश आहे.

**प्रा. डॉ सुधीर अग्रवाल**
वर्धा-९५६१५९४३०६

# प्रबोधोत्सव व तुळसीविवाह



प्रबोधोत्सव हा क्वचित ग्रंथात कार्तिक शुद्ध एकादशीला करावा असे म्हटले आहे. रामार्चनचन्द्रिकादि ग्रंथात द्वादशीलाच करावा असे म्हटले आहे. उत्थापनाच्या (उठण्याच्या) मंत्रातही द्वादशिचाच निर्देश असल्याने, तो द्वादशीलाच करणे योग्य आहे. त्याकरिता द्वादशीच्या रात्रीच्या पहिल्या भागात जर रेवतीच्या शेवटच्या चरणाचा योग असेल, तर तो उत्तम होय. तसा जर योग नसेल तर रात्रीच्या पहिल्या भागात फक्त रेवतीयोग असला तरी योग्य आहे. त्याच्या अभावी रात्रीच्या पहिल्या भागात फक्त द्वादशी किंवा तिच्याही अभावी रात्रीच्या पहिल्या भागी निवळ रेवती अथवा त्या दोहोंचाही रात्री अभाव असल्यास, दिवसासच द्वादसीत हा प्रबोधोत्सव करावा, असे कौस्तुभात जरी सांगितले आहे, तरी 'पारणेच्या पूर्वरात्री' असे वचन असल्याने, पारणेच्या रात्रीच्या पहिल्या भागात द्वादशीचा अभाव असताही त्रयोदशीतच पारणेच्या दिवशी प्रबोधोत्सव करण्याचा संप्रदाय आहे. याप्रमाणेच नवमीपासून तीन दिवसपर्यंत किंवा एकादशीपासून पुनवेपर्यंत कोणत्या तरी एका दिवशी, अथवा कार्तिकशुद्धात विवाहनक्षत्री तुलसीविवाह करावा. असे तुळशीच्या लग्नाचे जरी अनेक काळ आहेत, तरी पारण्याच्या दिवशीच प्रबोधोत्सवाच्या कर्मासह तंत्रानेच सर्वत्र तुळशीचे लग्न करतात; यास्तव तुळशीचे लग्नसुद्धा प्रबोधोत्सवासारखेच पारण्याच्या रात्रीच पहिल्या भागात करावे. प्रबोधोत्सव आणि तुलसीविवाह जर निरनिराळे करायचे असतील, तर तुळशीचे लग्न निराळ्या वेळी करावे. पुण्याहवाचन, नान्दीश्राद्ध, विवाहहोम वगैरे अंगांसह तुलसीविवाहाचा प्रयोग कौस्तुभादि ग्रंथात पाहावा. प्रबोधोत्सवा बरोबरच तुलसीविवाह करण्याचा शिष्टाचार असल्याने त्या बाबतीत येथे संक्षेपानेच ते कर्म लिहितो. देशकालादिकांचा उच्चार करून,

'श्रीदामोदरप्रीत्यर्थं प्रबोधोत्सवे संक्षेपतस्तुलसी विवाहविधिंच तंत्रेण करिष्ये तदंगतया पुरुषसूक्तेन विधिना षोडशोपचारैस्तंत्रेण श्रीमहाविष्णुपूजां तुलसीपूजांच करिष्ये' असा संकल्प करून, न्यासादिक केल्यावर श्रीविष्णु व तुलसी यांचे ध्यान करावे. सहस्त्रशीर्षा या मंत्राने श्रीमहाविष्णु व तुलसी यांचे आवाहन करून, आसनम वगैरे स्नानापर्यंत पूजा करून मंगलवाद्ये वाजवावीत, आणि सुवासिनीकडून किंवा स्वतः आपण नागवेलीच्या पानांनी सुगन्धी तेल व हळद लावून ऊन पाण्याने विष्णु व तुळस यांना मंगलस्नान घालावे. त्यानंतर पंचामृतस्नान घालून स्वच्छ पाण्याने अभिषेक करावा. वस्त्र, जानवे व चंदन ही नंतर विष्णूला अर्पण करून, तुळशीला-हळद, कुंकू, गळेसर व इतर मंगलालंकार देऊन, मंत्रपुष्पासहित सर्व पूजा संपवावी. त्यानंतर घंटा वगैरेंच्या वाजवण्याने देवाला जागे करावे. जागे करण्याचा मंत्र - इदंविष्णु योजागार' हा आचार करणे तर प्राप्तच आहे. याच दिवशी चातुर्मास्यव्रताचीही समाप्ति करण्यास काही ग्रंथकारांनी सांगितले आहे. कार्तिकमासव्रत चातुर्मास्यव्रत यांची उद्यापने चतुर्दशी किंवा पौर्णिमा या तिथींवर करावीत. असेही इतर ग्रंथकार म्हणतात.

**अशोक कुलकर्णी**

# विवाह सोहळ्यांचे बदलते स्वरूप - योग्य की अयोग्य ?

तुळशी विवाह लागले की लगीनसराई सुरु होते. काही दिवसांतच आजूबाजूला सनई चौघड्यांचे सूर कानी पडू लागतील. हिंदू धर्मात १६ संस्कारांपैकी पाणिग्रहण म्हणजेच विवाह संस्काराला अनन्यसाधारण महत्व आहे. ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमाला सुरुवात करण्यापूर्वी जो संस्कार केला जात असे त्यालाच पूर्वी विवाह संस्कार म्हटले जात असे. आजही गृहस्थाश्रमाला म्हणजेच संसाराला सुरुवात करण्यातील आरंभीचा टप्पा म्हणून विवाह संस्काराचे महत्व अबाधित आहे. देव, अग्नी आणि ब्राह्मण यांच्या साक्षीने हा विवाह संस्कार पार पडतो. विवाह संस्कारामध्ये श्री गणेश पूजन, सीमांतपूजन, मधुपर्कपूजन, गौरीहरपूजन, कन्यादान, मंगळसूत्र बंधन, अक्षतारोपण, मंगलाष्टके, विवाह होम, पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी, गर्भाधान असे अनेक विधी असतात. या प्रत्येक विधीच्या वेळी म्हटले जाणारे मंत्र, केलया जाणाऱ्या कृती यामागे ऋषीमुनींचा संकल्प कार्यरत असतो, त्यामुळे या विधी भावपूर्ण होणे अत्यंत महत्वाचे असते. विवाह संस्कार म्हणजे उभयतांना केवळ सहचर्य करण्याची अनुमती देणारा संस्कार नसून भावी जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सांगड घालण्याची शिकवण देणारा संस्कार आहे. विवाहसंस्कारात नियोजित विधींना अधिक महत्व देण्यात आले आहे. सध्याच्या घडीला विवाहातील धार्मिक विधीपेक्षा अन्य गोष्टींना आणि कृत्रिम अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. विवाह संस्कारात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे, ज्यामुळे विवाहातील मुख्य विधींनाच बगल दिली जात आहे. विवाहासारख्या धार्मिक कार्यक्रमाचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे, ज्यामुळे त्यातील सात्विकताच लोप पावू लागली आहे.



विवाह जुळवण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे दोन्हीही भारतीय दंडविधानानुसार गंभीर गुन्हे आहेत. तरीही देशातील अनेक भागांत आजही हुंडा दिला आणि घेतला जात आहे. या हुंड्याच्या लोभामुळे दरवर्षी कितीतरी नववधूंचा छळ केला जातो. त्यापैकी कितीतरी जणी या छळाला कंटाळून आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग स्वीकारतात. व्हाट्स अप आणि टेलिग्रामच्या दुनियेतेतही आज महागड्या लग्नपत्रिका छापल्या जातात. लग्न पार पडल्यानंतर खरेतर पत्रिकेला काहीच महत्व उरत नाही, तरीही केवळ आपली पत दाखवण्यासाठी काही ठिकाणी महागड्या पत्रिका छापल्या जातात. विवाहाचे बॅनर्स आणि होर्डिंग्स लावण्याची पद्धत गेल्या काही वर्षांपासून रूढ होत चालली असून यावरही अवास्तव खर्च केला जात आहे. विवाहासाठी निश्चित केलेल्या मुहूर्तावर विवाह लागणे, अत्यंत महत्वाचे आहे, पुरोहितांकडून मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी देवतांना उपस्थित राहण्यास आवाहन केले जात असल्याने मुहूर्ताला देवता सूक्ष्मरूपाने येतात, असा लोकांचा समज आहे. अनेक जण लग्न लागल्यानंतर स्वागत समारंभाची आणि भोजनाची वेळ पाळून विवाहाला उपस्थित राहतात. पूर्वी लग्नाची मंगलाष्टके म्हणण्यात चढाओढ लागत असे. एक मंगलाष्टक संपले कि दुसरे मंगलाष्टक म्हणण्याची संधी साधण्यासाठी उपस्थितांकडून धडपड केली जात असे. हल्ली काही विवाह सोहळ्यांना तर केवळ मंगलाष्टके म्हणण्यासाठी वाद्यवृंद आणि गायक बोलावले जातात. त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. वधूवरांनी एकमेकांना पुष्पहार घालून झाल्यावर त्यांच्या मस्तकावर अक्षता वाहण्याची पद्धत आहे; मात्र अनेक जणांना याविषयी पुरेशी माहिती नसल्याने मंगलाष्टके म्हणतानाच अक्षता उधळल्या जातात. परिणामी अक्षता वधू वरांच्या मस्तकावर न पडता कार्यक्रमस्थळी सर्वत्र विखुरल्या जातात. वधू-वरांनी एकमेकांना पुष्पहार घालणे हा विवाहातील एक महत्वाचा क्षण असतो. त्यालाही मनोरंजक करण्यासाठी हल्ली वधू-वरांना उगाचच उंचावर उचलून सहजपणे हार न घालू न देण्यासाठी आटापिटा केला जातो. ज्यामुळे त्यातील धार्मिकता निघून जाऊन तो केवळ मनोरंजनाचा क्षण बनतो. स्वागत समारंभासाठी परिधान करण्यात येणारे हिंदू वधु-वरांचे कपडेही हल्ली पाश्चात्य पद्धतीने शिवण्याची प्रथा पडू लागली आहे. त्यामुळे सकृतदर्शनी विवाह ख्रिश्चनांचा आहे कि हिंदूंचा हा उपस्थितांनाही प्रश्न पडतो. हल्ली विवाह विधी पार पडल्यानंतर सर्वांना एकत्र गोळा करून त्यांच्या समक्ष वधु-वरांकडून महागडा केक कापला जातो. हिंदू धर्मात शिजलेल्या अन्नपदार्थांवर सूरी फिरवणे वर्ज्य मानले जाते. त्यामुळे विवाहासारख्या सात्विक कार्यक्रमामध्ये अशी असात्त्विक कृती करणे अयोग्यच म्हणावे लागेल. हल्ली लग्नाच्या सिद्धतेसाठी अधिक वेळ द्यायला नको म्हणून इव्हेन्ट मॅनेजमेंट कंपनीला लाखो रुपये देऊन कंत्राट दिले जाते. ही कंपनी विवाहातील धार्मिक विधींना अधिक महत्व न देता सोहळा अधिकाधिक मनोरंजक आणि आकर्षक कसा होईल याकडे अधिक लक्ष देतात. त्यामुळे अनेक ठिकाणी धार्मिक विधी चालू असताना दुसरीकडे सिनेसंगीत चालू असते. त्यामुळे उपस्थितांचे अधिक लक्ष त्याकडेच जाते. विवाह विधी सुरु असताना जी शांतता अपेक्षित असते ती न पाळता सर्वत्र गोंगाटाचे वातावरण असते. आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी याच कंपन्यांकडून वधु-वरांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे सिनेगीतांवर नृत्य बसवले जातात, विवाह विधीनंतर त्याचे विशेष सादरीकरण असते. स्टेजवर लोकांसमोर नाचायचे आहे, तर सर्व व्यवस्थितच व्हायला हवे यासाठी अनेक जवळचे नातेवाईक लग्नाच्या तयारीत हातभार लावण्यापेक्षा या नृत्याच्या तयारीतच अधिक व्यस्त असतात. विवाह विधी हा वर आणि वधु या दोहोंच्या नातेवाईकांसाठी आनंदाचा विधी असतो, त्यामुळे विवाहाप्रित्यर्थ उपस्थितांना प्रीती भोजन दिले जाते. हे भोजन वधु वरांच्या कुटुंबाच्या ऐपतीनुसार दिले जायला हवे; मात्र इथेही आत्मप्रौढीसाठी भोजनात नको तितक्या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. काही ठिकाणी भोजनासाठी शाकाहार आणि मांसाहार असे वेगवेगळे कक्ष उभारले जातात. याशिवाय चायनीज, इटालियन पदार्थांचे कक्ष उभारण्याचीही पद्धत हल्ली रूढ होत चालली आहे. शहरी भागांत भोजनासाठी सर्रास 'बुफे' पद्धत अवलंबली जाते, ज्यामध्ये आपले ताट स्वतःहून वाढून घ्यायचे असते. बऱ्याचदा उपस्थित मंडळी आपल्या भुकेचा अंदाज न घेता केवळ समोर ठेवले आहेत म्हणून नको तितके पदार्थ ताटात वाढून घेतात आणि संपवता न आल्याने त्यातील काही पदार्थ ताटातच अर्धवट खाऊन सोडून देतात. दरवर्षी लगीन सराईमध्ये असे कितीतरी टन अन्न केवळ ताटात अर्धवट सोडून दिल्यामुळे वाया जाते. आज भारतात असाही वर्ग आहे ज्यांना प्रतिदिन २ वेळचे पोटभर अन्न मिळणे दुरापास्त आहे. अशा भारतात जेवण ताटात सोडून वाया घालवणे म्हणजे अन्नदेवतेचा अवमान नव्हे का ? अशा प्रसंगी भोजनाकरीता भारतीय पंगत अधिक योग्य ठरते; मात्र तिलाच आज 'आऊटडेटेड' ठरवण्यात आले आहे. विवाहानंतर मंजुळ आवाजाच्या पारंपरिक वाद्यांनीशी वधु -वरांची वरात काढण्याची प्रथा लोप पावत चालली आहे. हल्ली वरातीसाठी डीजे, बेण्डबाजा आणि कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीसाठी हजारो रुपये उधळले जातात. याशिवाय मित्र मंडळींना मद्याच्या आणि मांसाहाराच्या मेजवान्या देण्यासाठी खर्च होतो तो वेगळाच. विवाह सोहळा म्हणजे खरेतर वधु-वरांचा उत्सव, मात्र त्यातही हल्ली नातेवाईकांचे मानापमान नाट्य पाहायला मिळते. वर किंवा वधूच्या आईवडिलांनी मनासारखे कपडे किंवा दागिने घेतले नाहीत, पत्रिकेत नाव टाकले नाही म्हणून ऐन लग्नातही नातेवाईकांचे रुसवे फुगवे सुरु असतात. यांचा मान राखण्यासाठी पुन्हा वेगळा खर्च केला जातो.

लग्न सोहळ्यासाठी खरेतर आपल्या ऐपतीप्रमाणेच खर्च केला जावा; मात्र 'लोकांना काय वाटेल' या विचाराने वर-वधूच्या कुटुंबियांकडून लग्न सोहळा दिमाखात पार पडावा यासाठी कर्ज काढून नको त्या गोष्टीसाठी नको तेव्हढा खर्च केला जातो. त्यामुळे विवाह संस्कारातील धार्मिक विधी राहतात बाजूला आणि अनावश्यक बाबींसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो. लग्नानंतर गृहस्थाश्रम आरंभ होतो. नवा संसार उभा करण्यासाठी जागोजागी धनाची निकड भासते; मात्र वधु-वरांची सुरुवातीची काही वर्षे लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्यातच व्यय होतात. विवाह संस्कारामध्ये केवळ धार्मिक विधींना महत्व असून आपल्या इभ्रतीखातीर त्याला लावण्यात आलेल्या उपरोक्त बाबींचा मुलामा निव्वळ दिखाव्यासाठी असतो. पूर्वी अनोळखी व्यक्तींसोबत विवाह संस्कार करून केलेले विवाहही पुढे आयुष्यभर टिकून राहात असत, त्यामुळे घटस्फोट नावाचा प्रकार त्यावेळी अस्तित्वातच नव्हता. 'घटस्फोट' हा शब्दही केवळ पती पत्नीमधील नाते संपवण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणारा शब्द आहे त्यामुळे हिंदू धर्मशास्त्रात या किंवा अशा अर्थाच्या कोणत्याच शब्दाचा उल्लेख नाही. हल्ली घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यामागे अनेक कारणे असली तरी विवाह संस्कारांना दिले जाणारे दुय्यम महत्व याचाही इथे उल्लेख करावासा वाटतो. लोकांना, नातेवाईकांना काय वाटेल या विचाराने आपण कर्जबाजारी होऊन लग्न सोहळे साजरे करत असू तर हेच लोक नंतरही आपल्याला नावे ठेवणारच आहेत हे लक्षात घ्यायला हवे. विवाह संस्कारांत शिरलेल्या अनिष्ट प्रथांचे समूळ उच्चाटन झाले कि त्यासाठी केला जाणारा अवास्तव खर्चही वाचेल. यासाठी सर्वानीच पुढाकार घेऊन विवाह संस्कारात परंपरागत विधींना प्राधान्य द्यायला हवे.

**जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# मनरेगा अंतर्गत वैयक्तिक कामांवर दोन लाखांची मर्यादा

## केंद्र सरकारने लावले आर्थिक निर्बंध

### -शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर



**अमरावती :** अल्पभूधारक शेतकरी व गरिबांच्या उपजीविकेचा आधार बळकट करण्यासाठी मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या वैयक्तिक लाभार्थी कामांवर केंद्र सरकारने नवीन आर्थिक बंधने लागू केली आहेत. ग्रामीण विकास मंत्रालयाने जारी केलेल्या नव्या गाईडलाईननुसार आता वैयक्तिक कामांसाठी प्रति लाभार्थी कमाल खर्चाची मर्यादा दोन लाख रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला असून दोन लाखांत विहिर, फळबाग लागडीचे कामे होणार कशी, असाही प्रश्न उपस्थित केला आहे.

मनरेगा अंतर्गत सध्या २६६ प्रकारच्या कामांना परवानगी आहे. त्यापैकी ६८ कामे वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी राखीव आहेत. या कामांमध्ये जमीन विकास, सिंचन, वृक्षारोपण, जलसंधारण, बायोगॅस निर्मिती, स्वच्छता आणि उपजीविकेच्या

साधनांची निर्मिती अशा उपक्रमांचा समावेश आहे. परंतु आता या वैयक्तिक कामांसह सार्वजनिक कामांवर देखील आर्थिक बंधन लादले आहे. वैयक्तिककरिता २ लाख तर सार्वजनिक कामांवर २० लाखांची मर्यादा ठेवण्यात आली आहे. परंतु वैयक्तिकमध्ये ग्रामीण भागात अनेक कामांसाठी विशेषतः विहिरींच्या बांधकामासाठी पाच लाखांहून अधिक खर्च येत असताना, केवळ दोन लाखांच्या मर्यादेमुळे शेतकऱ्यांमध्ये आणि ग्रामपातळीवरील कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाच्या या निर्णयामुळे अनेक अपूर्ण कामे अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, 'दोन लाखांत ना विहीर, ना पाण्याची व्यवस्था उभी राहते. शासनाने प्रत्यक्ष वास्तव पाहून निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे. केंद्र सरकारने मात्र या मर्यादेचे कारण खर्चातील पारदर्शकता आणि अनियमितता रोखण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, राज्यस्तरावर या निर्णयाबाबत पुनर्विचार करण्याची मागणी जोर धरत आहे. विभागीय आयत्तांनी देखील याबाबत शासनाला मर्यादा वाढविण्याबाबत पत्राव्दारे मागणी केली आहे.

# शहरात लागू होणार 'कुल रुफ' उपनियम

## -सर्व शासकीय व खासगी इमारतींना बंधनकारक होणार

**अमरावती :** शहराच्या वाढत्या उष्णतेच्या संकटाला तोंड देण्यासाठी आणि ऊर्जा बचतीसाठी महापालिकेने 'कुल रुफ उपनियम २०२५' लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दरम्यान, २०३० पर्यंत ५ चौ. किमी कुल रुफ क्षेत्र तयार करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली.

सदर उपनियमाच्या माध्यमातून शहरात उष्णता-संबंधित वीज मागणी कमी करण्यासाठी तसेच शहरी उष्णता बेटांचा प्रभाव घटवण्यासाठी 'कुल रुफ'चा वापर करण्यात येणार आहे शहराच्या उष्ण हवामानाचा विचार करता कूल रूफच्या वापरामुळे उष्णता कमी होईल आणि उष्णता-संबंधित वीज मागणी २३ टक्क्यांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. यामुळे अंदाजे ३२ जीडब्ल्यूएच ऊर्जा बचत होईल. सर्व शासकीय, व्यावसायिक, सार्वजनिक आणि निवासी इमारतींमध्ये कुल रुफ पद्धत लागू करण्याचा नियम करण्यात येणार आहे. विशेषतः ५०० चौ. मी. पेक्षा मोठ्या नवीन निवासी इमारतींमध्ये कुल रुफ व्यवस्था अनिवार्य केली जाणार आहे. 'सी ४०' संस्थेच्या अहवालानुसार शहरातील उष्णतेमुळे उर्जा वीज वापर आणि शिखर मागणीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे कुल रुफसच्या अंमलबजावणीमुळे शहराच्या तापमानात घट होईल, अशी अपेक्षा आहे.




### 'कुल रुफ' म्हणजे काय?

कुल रुफ म्हणजे इमारतीच्या छतांच्या पृष्ठभागावर अशापद्धतीने उपाय केले जातात की त्यामुळे सूर्यप्रकाशाचे जास्तीत जास्त परावर्तन होते.

परिणामी, छताचे तापमान पारंपारिक छतांच्या तुलनेत लक्षणीयरित्या कमी होते. यामुळे वातानुकूलनाच्या आवश्यकता कमी होतात आणि शहरी उष्णतेची समस्या सुटण्यास मदत होते. दरम्यान, कुल रुफमध्ये परावर्तक कोटिंग्स, ग्रीन रुफ, सौर उर्जा प्रणाली, लाइम वॉश आणि सिंथेटिक मेम्ब्रेन यांचा समावेश आहे.

# श्रीरामनगर येथे स्ट्रीट लाइट बंद असल्याने परिसरात काळोख

## -प्रहारचे आयुक्तांना निवेदन

**अमरावती :** प्रभाग क्र. १ शेगाव-रहाटगाव अंतर्गत येत असलेल्या श्रीरामनगर येथील स्ट्रीट लाइट बंद असल्याने परिसरात रात्रीला काळोख झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. याबाबत प्रहारचे चंदू खेडकर यांनी आयुक्तांना निवेदन देऊन स्ट्रीट लाईट सुरू करण्याची मागणी केली.

श्रीरामनगरच्या हनुमान मंदिराच्या जवळील ओपन स्पेस समोरील स्ट्रीट लाइट कित्येक दिवसांपासून बंद आहे. ओम कॉलनीत दोन पूलावर दोन नवीन लाइटची गरज आहे. याची माहितीसुद्धा दोन महिने आधी दिली होत. अद्यापही लाईट लागलेले नाहीत. त्याच लाइनमधील स्वतंत्र लाईट चार महिन्यापासून बंद आहे. तसेच व्हीआयपी कॉलनी पोलवर दोन लाइट तसेच केवल कॉलनी येथील पोलवर दोन लाइट बंद आहे. याबाबत तक्रारी करून दोन महिने लोटले आहे. ह्या तक्रारीच्या संदर्भात येत्या दोन दिवसात निर्णय न झाल्यास महानगरपालिकेतील पूर्ण लाइट काढून भंगारमध्ये विकण्यात येईल, असा इशारा निवेदनातून चंदू खेडकर यांनी आयुक्तांना दिला आहे.

# धामणगाव रेल्वेत खाटू श्यामबाबांची निशाण यात्रा उत्साहात

## -अखंड ज्योत आणि 'जय श्री श्याम'च्या घोषात गुंजला परिसर

**धामणगाव रेल्वे :** खाटू नरेश श्री श्यामबाबांच्या जन्मोत्सवानिमित्त शनिवारी शहरात भक्तिमय वातावरणात निशाण यात्रेचे आयोजन करण्यात आले. तिलक चौक येथील शर्मा गल्ली येथून प्रारंभ झालेली ही शोभायात्रा तिलक चौक, मेन रोड, गांधी चौक, स्टेशन रोड मार्गे भ्रमण करून पुन्हा शर्मा गल्लीतील शंकरलाल गुलझारीलाल शर्मा यांच्या निवासस्थानी पोहोचली.

सुशोभित चारचाकी वाहनावर विराजमान असलेल्या श्री श्याम बाबांची अलौकिक झांकी आणि अखंड ज्योत ही यात्रेचे मुख्य आकर्षण ठरली. मार्गात ठिकठिकाणी भाविकांनी पुष्पवर्षाव, आरती आणि पूजन-अर्चन करून 'जय श्री श्याम' व 'श्याम तेरे भक्तों का रखियो मान' अशा घोषणांनी वातावरण भक्तिमय केले. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने महिला, पुरुष व बालभक्तांनी सहभाग घेत श्रद्धाभावाने निशाण यात्रेचे स्वागत केले. यात्रेच्या समारोप प्रसंगी शंकरलाल गुलझारीलाल शर्मा यांच्या निवासस्थानी श्री श्याम आरती पार पडली आणि उपस्थित भक्तांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.



# विद्यापीठात धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त व्याख्यानमाला मंगळवारी

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त मंगळवार, ४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार असून, 'धम्मचक्र प्रवर्तनाची वर्तमान काळातील प्रासंगिकता' या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम हे व्याख्यान देणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू यांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी केले आहे.

# श्रीगुरुदेव सुसंस्कार शिबिराचा समारोप

## -संस्कार देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान

**अंजनसिंगी :** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित श्रीगुरुदेव सुसंस्कार शिबिराचा समारोप व पुण्यतिथी महोत्सवामध्ये शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये आदर्श, सद्भावना आणि कर्तव्यबुद्धी रुजवणाऱ्या अशा शिक्षकांचा 'शिक्षक सेवाव्रती' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या पुरस्काराने सन्मानित ग्रामगीताचार्य हनुमंत ठाकरे (बौद्धिक शिक्षक), योग शिक्षक मुकेश कोल्हे, भाषणकला शिक्षक तुलसीदास झुंजुरकार, संगीत शिक्षक प्रज्वल टोंगे, प्रा. प्रशांत टांगले, निलेश मोहोकार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या गिता गुल्हाने, सरपंच चंद्रशेखर कडू, तसेच श्री गुरुदेव सेवा मंडळ चिंचपूरचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



# 'अग्निपंख' वक्तृत्व स्पर्धेत उर्वी वाघ ठरली उत्कृष्ट बालवक्ता

**तिवसा/प्रतिनिधी :-** दिनांक १५ ऑक्टोबर रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती अर्थात वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून अग्निपंख इंटरनॅशनल फाउंडेशन मुंबई द्वारा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांमधून राज्यातील ४० विद्यार्थ्यांची उत्कृष्ट बालवक्ता म्हणून निवड करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करजगाव ची विद्यार्थिनी उर्वी अमोल वाघ हिची निवड झाली आहे.उर्वी हि शाळेतील प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने भाग घेते. तिला बालपणापासूनच भाषणाची आवड असून त्याचे फळ तिला मिळाले.



तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले सर , वर्गशिक्षिका सविता पारसे मॅडम व वृषाली बंड मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश गाढवे, तसेच सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, गावचे सरपंच आशिष बांबल,उपसरपंच रवी कोंडे आदी सर्वांनी तिचे कौतुक केले आहे. ती आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, व शाळेतील शिक्षकांना देते.

# कर्मचारी संघटनेच्या बैठकीत विविध समस्यांवर मंथन

**अमरावती :** जिल्हा परिषद कार्यालय लिपीकवर्गीय कर्मचारी संघटनेची सभा शनिवारी पार पडली. सभेला अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष पंकज गुल्हाने तसेच संघटनेचे सचिव संजय राठी, उपाध्यक्ष गजानन कोरडे, राज्य प्रसिद्धीप्रमुख हेमंत येवले, कोषाध्यक्ष श्रीकांत मेश्राम यांची उपस्थिती होती. जुनी पेन्शन योजनेसह विविध मुद्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

कर्मचाऱ्यांच्या वेतनातील विसंगती दूर करण्यासाठी आणि पदांचे पुनर्वर्गीकरण करण्यासंदर्भात बैठकीत चर्चा झाली. शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. सोबतच आगामी वर्षातील बैठका, अधिवेशन, प्रशिक्षण कार्यक्रम व सामाजिक उपक्रम यांचे नियोजन निश्चित करण्यात आले. मागील कालावधीतील जमा-खर्चाचा तपशील सादर करण्यात आला व सभेने एकमताने मंजूर केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सन २००५ नंतर अनुकंपावर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी उच्च न्यायालयात जाण्याबाबत चर्चा झाली. इच्छुक सदस्यांनी सहमती दर्शविली. अध्यक्षांच्या परवानगीने संघटनेच्या सामाजिक उपक्रमांवर व राज्य अधिवेशनाच्या तयारीवर चर्चा करण्यात आली. सभेत अमिषा सिंगलवार यांची प्रसिद्धी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी नीलेश तालन, विजय कविटकर, विजय कोठाळे, प्रवीण जिचकार, अमिषा सिंगलवार, सुजित गावंडे, सुनील वानखडे, यशकुमार माहुलकर, अमित बारबुद्धे, परीक्षेत बाराते, चेतन रायचुरा, विश्वकांत राठोड, निशांत तायडे, प्रकाश गौरखेडे, राहुल रायबोले, सुभाष जाधव, अपर्णा आत्राम, जीवन नारे, पितम चर्जन, दिनेश तांबडे, मंगेश मानकर, सुशील कटके, एस. टी. तिवारी, पंकज गोरले, प्रीती दिवाण, किरण खांडेकर, दिनेश राऊत, समीर लेंडे, अंकुश पवार, विजय उपरीकर उपस्थित होते.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५७**

आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# श्री क्षेत्र ज्ञानदेवाश्रम अमरावती ते श्री क्षेत्र कौंडण्यपूर पायदळ पालखी सोहळा २०२५

**कुऱ्हा :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गुरुवर्य जयराम बाबा उर्फ भामटी महाराजांचे कृपा आशीर्वादाने श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यापुर कार्तिक मास सोहळा येथे कार्तिक शुद्ध ११ एकादशी रविवार २ नोव्हेंबरला श्री गुरुवर्य जयरामबाबा उर्फ भामटी महाराज यांचे ज्ञानदेव श्रम अकोली रस्ता अंबाविहार अमरावती येथून दुपारी २ वा. पायदळ पालखी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे.

या पायदळ पालखी दिंडी सोबत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पातशे (दिंडी चालक), ज्ञानदेव आश्रम अमरावती दिंडीचे विणेकरी ह.भ.प. अनुप महाराज देशमुख अमरावती ,मृदंग वादक ह.भ.प. गजानन महाराज चोरे (धामणगाव), ह. भ.प. सागर महाराज कडू हनवतखेड ,दिंडीचे चोपदार ह.भ.प. रामेश्वर मिसळकर (धामणगाव चोरे), ह.भ.प. दयाराम काळंके (धामणगाव चोरे) या दिंडीसोबत दिंड्या सहभागी मध्ये हनवतखेड येथील तरुण युवक वारकरी दिंडी एकलासपूर, धोतरखेडा, धामणगाव, निजामपूर,वडूरा,सर्फापुर कल्होडी, अमरावती येथील वारकरी भजनी संच व संत जयरामबाबा महिला भजनी मंडळ अमरावती हे राहणार आहे. २ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबर २०२५ सायं. ६ वा. रुक्मिणी हरण मंदिर श्री अंबिका देवी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथे पोहोचणार असून ६ नोव्हेंबरला सकाळी ८ वा. नगर प्रदक्षिणा सकाळी ११ वा. गोपालकाला कीर्तन ह.भ.प. श्री गुरुवर्य ज्ञानेश्वर महाराज पातशे यांच्या अमृतवाणीतून होईल. दुपारी १ वा. महाप्रसादाची व्यवस्था श्री अंबिका देवी संस्थान ह.भ.प. प्रकाश जानराव कदम यांचे कडून होईल. या पायदळ पालखी सोहळा दिंडी आयोजन व व्यवस्थापन समिती सल्लागार समिती पालखी सोहळा सोबत असलेल्या वारकऱ्यांच्या अन्नदाते यांचा सहभाग आहे.



**दि.अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती**
**कॉंग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती**
**फोन नं.०७२१-२६७४६८४, २६७१०४३**

## निविदा सुचना

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बॅंक लि., अमरावती ला दैनंदिन व्यवहाराकरीता लागणारे व्हावचर कागदपत्रे व रजिस्टर व ईतर बाबींची छपाई करुन घ्यावयाची आहे. त्याकरीता नोंदणीकृत व छपाई कामाचा अधिकृत परवाना धारकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा फॉर्म बॅंकेच्या मुख्यालयात रु.५००/- वर (ना-परतावा) नगदी भरणा करुन दिनांक ०३.११.२०२५ ते ०९.११.२०२५ पर्यत दुपारी ४.३० वाजेपर्यंत प्राप्त करता येतील. सिलबंद निविदा दिनांक १०.११.२०२५ ला अनामत रक्कम रु.५०००/- चा भरणा करुन बॅंकेच्या मुख्यालयास दुपारी ४.३० वाजेपर्यंत सादर करावी. निविदेच्या अटी व शर्ती निविदा फॉर्मसोबत जोडल्या आहेत.

**अमरावती**
**दि.०३.११.२०२५**

**सरव्यवस्थापक,** **अध्यक्ष,**
**दि.अम.जि.प.शिक्षक सहकारी बॅंक लि., अमरावती**

## महानगरपालिका, अमरावती
## - बांधकाम विभाग -

जा.क्र.अमनपा/बांवि/शअ/जा.सु/२९८/२०२५
दिनांक ०२.११.२०२५

## जाहीर सूचना

जनहीत याचिका क्र.७१/२०१३ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे न्यायालयीन आदेशान्वये निर्देश वजा सुचना जारी केलेल्या आहेत. त्यानुसार रस्त्यावरील खड्डे दुरावस्था पाहता मा.उच्च न्यायालयाने सर्वसामान्य जनतेस त्यांचे तक्रारी संदर्भात दाद मिळावी याकरीता समिती गठीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नागरीकांचे सोईचे दृष्टीकोनातून महानगरपालिका अमरावती द्वारे खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सदस्य पदनाम | कार्यालयाचा पत्ता | समिती पद |
|---|---|---|---|
| १. | आयुक्त, महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका, अमरावती, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ | अध्यक्ष |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती | न्याय सेवा सदन, जिल्हा व सत्र न्यायालय परिसर, अमरावती-४४४६०२ | सह अध्यक्ष |
| ३. | शहर अभियंता महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका अमरावती, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ | सदस्य सचिव |
| ४. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती | सार्वजनिक बांधकाम विभाग, कॅम्प, अमरावती-४४४६०२ | सदस्य |
| ५. | सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, अमरावती | वाहतूक शाखा, इर्विन चौक, अमरावती-४४४६०२ | सदस्य |
| ६. | पोलीस निरीक्षक | पोलीस स्टेशन, अमरावती महानगरपालिका हद्द | सदस्य |

नागरिकांचे सोईचे दृष्टीकोनातून महानगरपालिका, अमरावती द्वारे झोनस्तरीय स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेले असून रस्त्यावरील खड्डे दुरावस्था नागरिकांना तक्रारी दाखल करण्याचे अनुषंगाने झोन निहाय खालील उप-अभियंता यांची **नोडल ऑफिसर** म्हणून नियुक्ती केलेली आहे.

सर्व जनतेस याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, रस्त्यावरील खड्डे व त्यांची दुरावस्था याबाबत नोडल अधिकारी, ई-मेल, भ्रमणध्वनी एस.एम.एस. व अमनपाचे वेब पेज वर **रस्त्यावरील खड्डे बाबत तक्रार** या स्वरुपात तक्रार द्यावी/दाखल करावी.

| अ क्र. | झोन क्र./झोनचे नांव | प्रभाग क्र./ प्रभागाचे नांव | नोडल अधिकारी | भ्रमणध्वनी व व्हॉट्सअप क्र. | मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १. उत्तर झोन (रामपुरी कॅम्प) | १. शेगांव-रहाटगांव २. श्री संत गाडगेबाबा पीडीएमसी ३. नवसारी ५. महेंद्र कॉलनी-नवीन कॉटन मार्केट ६. विलास नगर-मोरबाग | श्री.ए.ए. अवसरे, उप-अभियंता | 9960488582 | zone1amccorp@gmail.com |
| २. | २. मध्य झोन (राजापेठ) | ७. जवाहर स्टेडीयम १२.रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद १३.अंबापेठ-गौरक्षण १८.राजापेठ-श्री संत कंवरराम | श्री.पी.व्ही. इंगोले, उप-अभियंता | 7030922887 | zone2amccorp@gmail.com |
| ३. | ३. पुर्व झोन (दस्तुर नगर) | ८. जोग स्टेडीयम-चपराशीपुरा ९. एस.आर.पी.एफ.-वडाळी १०.बेनोडा-भिम नगर-दस्तुर नगर ११.फ्रेजरपुरा | श्री.नितीन बोबडे उप-अभियंता | 9096589789 | zone3amccorp@gmail.com |
| ४. | ४. दक्षिण झोन (बडनेरा) | १९.साईनगर २०.सुतगिरणी २१.जुनी वस्ती बडनेरा २२.नवीवस्ती बडनेरा | श्री.एस.जे. तायडे उप-अभियंता | 9370154241 | zone4amccorp@gmail.com |
| ५. | ५.पश्चिम झोन (भाजी बाजार) | ४. जमिल कॉलनी १४.जवाहर गेट बुधवारा १५.छाया नगर-गवळीपुरा १६.अलीम नगर-रहमत नगर १७.गडगडेश्वर | श्री.व्ही.पी. देशमुख उप-अभियंता | 8856882600 | zone5amccorp@gmail.com |

तसेच तक्रार नोंदविण्याकरीता अमनपा ने नागरिकांकरीता खालील सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

१. मनपा मेल आयडी - ee1pwdamc@gmail.com

**(सौम्या शर्मा-चांडक, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**महानगरपालिका, अमरावती**

# चान्नी ते सुकळी फाटा रस्ता झाला 'तलाव'

## अपघातात वाढ ; संतप्त वाहनधारकांचा निषेध आंदोलन



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चान्नी ते सुकळी फाटा हा मुख्य रस्ता पावसाच्या पाण्यामुळे अक्षरशः तलावाचे रूप धारण करत असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. रस्त्यावरील खोल खड्डे, साचलेले पाणी आणि उडणाऱ्या चिखलामुळे या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, अनेक दुचाकीस्वार खड्ड्यात पडून जखमी झाले आहेत. वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. ग्रामस्थ आणि वाहनधारकांनी वारंवार संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही दखल घेतली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी २ नोव्हेंबर रोजी सकाळी रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये उभे राहून शासनाचा निषेध केला आणि तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली. 'अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नाही. रस्त्याची दुरुस्ती तात्काळ न झाल्यास याच रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

'चान्नी ते सुकळी फाटा रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, रस्त्याची पूर्ण चाळणी झाली आहे. अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे आम्ही २ नोव्हेंबर रोजी शासनाचा निषेध केला. जर रस्त्याची दुरुस्ती तातडीने झाली नाही, तर रास्ता रोको आंदोलन केले जाईल.'

**जहूर खान,**
सरपंच खेट्री तथा अध्यक्ष, अखिल भारतीय सरपंच संघटना पातूर

'पातूर तालुक्यातील दिग्रस ते तुलंगा तसेच सुकळी फाटा ते चान्नी रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे.

दिग्रस येथे काही दिवसांपूर्वी रास्ता रोको आंदोलन झाले होते, त्यावेळी संबंधितांनी आश्वासन दिले, मात्र काम झाले नाही. आता पुन्हा आंदोलन करावे लागेल, अशी वेळ आली आहे.'

**दिलीप परनाटे,**
जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

# 'त्या' बहुप्रतिक्षित रस्त्याचे काम अखेर सुरू होणार!

## हिवरखेड–चिचारी–धोंडा आखर आदिवासी भागातील रस्त्याच्या स्वप्नपूर्तीकडे निर्णायक पाऊल!

IMPACT जनमाध्यम IMPACT

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड चिचारी चंदनपुर धोंडा आखर या वर्षानुवर्ष पासून मागणी असूनही रखडलेल्या या रस्त्याचे काम सुरू व्हावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे, यांच्यासह संबंधितांनी हा विषय रेटून धरला होता. यासाठी स्थानिकांना रस्ता रोको आंदोलनाची हाक दिली होती. दैनिक जनमाध्यम ने सुद्धा सातत्याने ह्या मुद्दा ठळक बातम्या प्रकाशित केल्या होत्या. अखेर त्या रस्त्याचे काम आता सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

तेल्हारा तालुक्यातील या दुर्गम आणि पर्यावरण संवेदनशील आदिवासी गावांना जोडणाऱ्या रस्त्याची मागणी गेल्या दशकभर प्रलंबित होती. स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही या भागात कितीतरी गावांमध्ये लालपरीही पोहोचलेली नाही. रस्त्याच्या अभावामुळे शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण आणि पुनर्वसित आदिवासी समुदायाला शिक्षण, आरोग्यसेवा आणि बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत होते. मागच्या प्रत्येक निवडणुकीत हा विषय कळीचा आणि आश्वासनांचा मुद्दा बनलेला होता आणि त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही आणि स्थानिक लोकांच्या हालअपेष्टा थांबल्या नाहीत. विधानसभा निवडणुकीपूर्वीच श्रेयवाद लाटण्यासाठी भूमिपूजन समारंभ होऊनही, निविदा मंजूर होऊनही, काम सुरू करण्यासाठी कोणतीही प्रगती झालेली नव्हती.

मार्च २०२५ मध्ये सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांनी या प्रश्नावर पुढाकार घेत मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य अभियंता संभाजी माने यांच्याशी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत या रस्त्याचे सामाजिक गांभीर्य आणि पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित करण्यात आले. संभाजी माने यांचे निर्देशानंतर ग्रामविकास विभाग, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना विभाग (अकोला आणि अकोट ) यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. या चर्चेसोबतच माहितीच्या अधिकारातून माहिती मिळवून या रस्त्याबाबत असलेल्या अडचणींचाही रजनीश पोटे यांनी सखोल अभ्यास केला.

या चर्चेनंतर प्रस्तावित काँक्रीट रस्त्याच्या पर्यावरणीय अडचणी लक्षात घेऊन, अधिकाऱ्यांनी डांबरी (BT) रस्त्याचा पर्याय स्वीकारला. तांत्रिक आणि आर्थिक पुनर्मूल्यांकन करून डांबरी रस्त्यासाठी मंजुरी मिळवण्यात आली. त्यानंतर पर्यावरणीय दस्तऐवजांची पुनर्रचना करून नागपूर, अमरावती आणि अकोट येथील वन विभागाशी समन्वय साधून आवश्यक परवानग्यांसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली. या भागासाठी गठीत करण्यात आलेली पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) देखरेख समिती ही अमरावती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे. या समितीमध्ये वन विभाग, स्थानिक प्रशासन आणि तज्ज्ञ सदस्यांचा समावेश असून, ती प्रस्तावित विकास कामांवर पर्यावरणीय दृष्टीकोनातून मार्गदर्शन करते आणि मंजुरी देते. वन अधिकाऱ्यांच्या झालेल्या बदल्या, नव्याने रुजू होणारे अधिकारी इत्यादी कारणामुळे या समितीचे गठण आणि बैठक या दोन्ही गोष्टींना उशीर होत होता. या पर्यावरण संबंधित मंजुरी प्रक्रियेला गती मिळावी म्हणून रजनीश पोटे यांनी ग्रामविकास मंत्री, सचिव ग्रामविकास खाते मंत्रालय आणि जिल्हाधिकारी अमरावती यांच्याशी संवाद साधून विशेष प्रयत्न केले. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी या समितीची अमरावती येथे बैठक पार पडली असून, मु. ग्रा. स. योजेनच्या अधिकाऱ्यांना लवकरच वन विभागाकडून औपचारिक मंजुरीचे पत्र लवकरच मिळण्याची अपेक्षा आहे.

अकोला आणि अकोट येथील ग्रामविकास विभाग, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांनी रस्त्याचे काम जलद गतीने सुरू करण्यासाठी आपली तयारी दर्शवली आहे. निधीची जुळवाजुळव, ठेकेदार, यंत्रसामग्रीची उपलब्धता आणि स्थानिक समन्वय यावरही काम सुरू आहे. औपचारिक मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळेल.

हा रस्ता केवळ पायाभूत सुविधा नाही, तर या भागातील हजारो आदिवासी नागरिकांसाठी जीवनरेषा ठरेल सततच्या पाठपुराव्यामुळे वन विभागाची परवानगी मिळाली असून आता या रस्त्याची स्वप्नपूर्ती लवकरच प्रत्यक्षात उतरेल, अशी आशा आहे.

**रजनीश पोटे,**
सामाजिक कार्यकर्ते, पुणे.

............

या रस्ता सिमेंट काँक्रीट चा होणार होता, परंतु त्याला वन विभागाचे परवानगी मिळत नव्हती, त्यामुळे नव्याने डांबरीकरणसाठी वनविभागाकडे मागितलेली परवानगी प्रतीक्षेत होती. आता ती परवानगी मिळाली असून लवकरच पत्र प्राप्त होणार आहे. त्यानंतर तात्काळ या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात येईल.

**संजय बोचे**
उपविभागीय अभियंता,
मुख्यमंत्री ग्रामसडक योजना.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १०८/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** गौसंपदा संरक्षण ट्रस्ट खाकटा ता. तेल्हारा जि. अकोला

**अर्जदार :-** श्री.बंडू चिंतामण गवारगुरु रा. खाकटा ता. तेल्हारा जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१०००/-रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ११३/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. शामसुंदर देशी गौरक्षण ट्रस्ट व अनुसंधान येदलापुर ता. अकोट जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. गजानन भूजिंगराव मेश्राम रा. येदलापुर ता.अकोट जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१०००/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ११६/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. हनुमान मंदिर संस्थान प्रांजली नगर उमरी मोठी ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. जिवन ओंकार कल्याणकर रा.उमरी मोठी, अकोला, ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदर चा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन):- **काही नाही**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) मौजे - उमरी प्र. बाळापुर ता. जि. अकोला गट नं. ११० मधील प्लॉट नं. २१ एकूण क्षेत्रफळ ९०० चौरस फुट त्यावर बांधकाम केलेले श्री. हनुमान मंदिर १५x१५= २२५ चौरस फुट उर्वरित ६७५ चौरस फुट खुली जागा आहे. जागेची चतु: सीमा पुर्वेस :-रोड पश्चिमेस :- सर्व्हिस लाईन उत्तरेस :- श्री. ठाकरे व श्री. मेहरे यांचे घर दक्षिणेस :- श्री ढगे यांचे घर मालमत्तेची अंदाजे किंमत ३,२९,१२३/-रु

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियती चा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कया नीशी आज दिनांक १४ / १० / २०२५ रोजीदिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ११२/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** वीर हनुमान मंदिर ट्रस्ट बरडे प्लॉट अकोट ता. अकोट जि. अकोला

**अर्जदार :** श्री. वसंत परशराम मेंगजे रा. बरडे प्लॉट अकोट ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१०००/-रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियती चा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

# पातुर तालुक्यात कधीही न दिसणाऱ्या उमेदवाराला लागले निवडणुकीचे डोहाळे !

■ प्रतिनिधी | पातूर ■

महाराष्ट्रामध्ये महानगरपालिका ,नगरपरिषद ,जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक होणार असल्याचे चित्र आहे यामुळे पाच वर्ष कधीही जनतेच्या संपर्कात न राहणारे कोणालाही न दिसणारे असे आता आपल्या स्वार्थासाठी डबक्यातील बेंडक निवडणुका पाहून पावसाळा आला कि कुत्र्यांच्या छत्र्या उगवतात, अनुभवाचे बोल पावसाळा आला कि पावश्या ओरडतो, मिरुग किडा दिसु लागतो, बेडकांची ड्रायड्राय सुरु होते, कुत्र्यांच्या छत्र्या उगवतात.. त्याच प्रमाणे नेत्यांची खैरात सुरु होते, निवडणुक पुढे लागणार असे लक्षात आले की.. नेते जनतेच्या दारात.. कोणीही यमलोकी गेलं कि दाहाव्या चे करायाला हजर.. गावात रस्ते, गट्टर, स्वच्छता, धूळ, गुणवत्ता, शासकीय अडवणूक, विद्यार्थी, कामगार, शेतकरी सगळंयांची प्रश्न दिसु लागतात.. दर महिन्याला ग्रामसभा, वॉर्डसभा, गट्सभा, गणसभा, आठवा बैठकी, जनता दरबार, अधिकाऱ्याना लुटपुटची शिवीगाळ.. मोर्चे ,आंदोलन कायकाय नाटक... करतील याचा नेम नाही. केवळ पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद नजरे समोर ठेऊन.. आणि प्रत्येक दरबारात, मिटींगला तेच कार्यक्रत, तेच प्रश्न विचारणारे.. आहे की नाही गोलमाल.. असे चित्र पातुर तालुक्यात पाहायला मिळत आहे या नोटंकी बाज उमेदवारीची स्वार्थी सेवा जनतेला कळून आहे परंतु आता या स्वार्थी लोकांपासून 'बहती है गंगा धोलो हात ! भलं होत आहे तर करून घ्या अशी चर्चा तालुक्यातील गाव वस्तीत चालू आहे.

# श्यामबाबा जन्मोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद; भक्तांनी दर्शन घेतले दर्शन

**अकोला :** लाखो भाविकांचे पूजनीय श्री श्याम बाबांच्या तीन दिवसांच्या पवित्र जयंती सोहळ्याला भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तीन दिवसांच्या या सोहळ्यात अंदाजे साठ हजार पेक्षा जास्त पुरुष आणि महिलांनी यात सहभाग घेतला. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती. यावेळी जबलपूर आणि वृंदावन येथील हेमेश राज आणि त्यांच्या लोक कलाकारांनी कृष्ण नृत्याने भव्य उत्सव साजरा केला. श्याम भजनांच्या सादरीकरणाने भाविकांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी भक्तांवर सुगंधाचा वर्षाव करण्यात आला. सर्वांसाठी दर्शनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. जयपूरच्या भजन गायिका श्रीमती अंजू शर्मा यांच्या श्याम भजन संध्याकाळने उत्सवाचा समारोप झाला. या कार्यक्रमाला दूरदूरच्या भाविकांनी हजेरी लावली. मंदिरात प्रभावी विद्युत व्यवस्था, नेत्रदीपक आतषबाजी, फुलांची सजावट, विविध झांकी,दिव्य ज्योत, पुजाऱ्यांची पूजा, हवन, अभिषेक, केक वाटप आणि प्रसाद असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. उत्सवाच्या शेवटी रामदेव बाबा-श्यामबाबा सेवा समितीच्या संपूर्ण कार्यकारिणी आणि विश्वस्तांनी सर्व भक्तांचे आभार मानले.

# गोपाष्टमी निमित्त भूमिपुत्र गोशाळेत गोमाता पूजन व आरतीचा भक्तिमय सोहळा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील मळसुर–पांगरा मार्गावरील भूमिपुत्र गौरक्षण गोशाळेत गोपाष्टमीच्या पवित्र दिनानिमित्त गोमाता पूजन व आरतीचा भक्तिमय कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व उत्साहात पार पडला. हा सोहळा ३० ऑक्टोबर रोजी संपन्न झाला.

या प्रसंगी भाविकांनी गोमातेला पूजन अर्पण करून आरती केली व गोसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. गावातील नागरिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत भावपूर्ण वातावरण निर्माण केले.

पौराणिक परंपरेनुसार, भगवान श्रीकृष्णाने याच दिवशी गोपालकांच्या सेवेला प्रारंभ केला होता, म्हणून ही तिथी गोपाष्टमी म्हणून साजरी केली जाते, अशी श्रद्धा उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला गोशाळेचे अध्यक्ष शुभम थिटे, तसेच भगवान थिटे, अलका थिटे, सोनाली थिटे, अनिका शुभम थिटे, अक्षय काळे, गोलु देवकते, ओमकार देवकते, कैलास मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते.



समारोपात गावकऱ्यांनी 'गोसंवर्धन, गोसंरक्षण व गोसेवा' या तीन तत्वांचा समाजात प्रसार करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या शेवटी 'गोसेवा हीच खरी भक्ति' हा मंगल संदेश देत उपस्थितांनी गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# खोट्या तक्रारींमुळे पातुर तालुक्यातील शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर

**पातुर :** पातुर तालुक्यातील काही पांढरपेशी भुरट्या नेत्यांकडून शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध खोट्या तक्रारी केल्या जात असल्याने कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटला आहे. अशा तक्रारींमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून, त्यांच्या मनोबलावर परिणाम होत असल्याची चर्चा तालुकाभर सुरु आहे.तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांची पदे अपुरी असल्याने एका कर्मचाऱ्यावर अनेक विभागांचा कार्यभार आहे. या वाढत्या कामाच्या ताणात काही भुरटे नेते उपोषण, आंदोलनाचा धाक दाखवून दबाव तंत्राचा वापर करत आहेत. जे अधिकारी किंवा कर्मचारी त्यांच्या अवास्तव मागण्यांना नकार देतात, त्यांच्याविरुद्ध खोट्या तक्रारी दाखल केल्या जात असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी मोफत केवायसी शिबिराचे आयोजन

## स्व. आ. गोवर्धन शर्मा यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरणानिमित्त जनकल्याणाचा उपक्रम

**अकोला :** राज्याच्या जनकल्याणकारी परंपरेला बळकटी देणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' या उपक्रमाचा लाभ सध्या राज्यभरातील लाखो भगिनींना मिळत आहे. महिला सक्षमीकरण, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षा या तिन्ही उद्दिष्टांना साधणाऱ्या या योजनेंतर्गत पात्र महिलांना दरमहा आर्थिक साहाय्य देण्यात येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या वतीने ही महत्त्वाकांक्षी योजना राबविली जात आहे. राज्यातील बहुसंख्य भगिनींनी या योजनेत नोंदणी करून आर्थिक लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र, तांत्रिक कारणांमुळे अनेक लाभार्थिनींची केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने काहींना या योजनेचा लाभ तात्पुरता थांबला आहे. अनेक ग्रामीण व शहरी भागांमध्ये आवश्यक माहिती, मार्गदर्शन व दस्तऐवजांची पूर्तता न झाल्याने महिलांना अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर, स्व. आ गोवर्धन शर्मा,लालाजी यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरणानिमित्त 'माझी लाडकी बहीण'



योजनेसाठी मोफत केवायसी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.दि ३ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत जठारपेठ चौक, अकोला येथे हे शिबिर भरविण्यात येणार असल्याची माहिती ॲड. गिरीश गोखले यांनी दिली. 'लालाजी' म्हणून लोकप्रिय असलेल्या स्व. गोवर्धन शर्मा यांनी आपल्या कार्यकाळात अकोल्यात अनेक विकासकामे राबवली. सामाजिक संस्थांशी घट्ट संबंध ठेवले आणि लोकाभिमुख राजकारणाचा आदर्श ठेवला. त्यांच्या स्मृतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे शिबिर म्हणजे त्यांच्या जनसंपर्कातून समाजसेवेच्या परंपरेचा एक भाग असल्याचे ॲड. गिरीश गोखले यांनी सांगितले.

या कॅम्पमध्ये पात्र लाभार्थींना त्यांची केवायसी प्रक्रिया मोफत पूर्ण करून घेता येईल. शासनाने ठरविलेल्या सर्व निकषांनुसार आवश्यक कागद पत्रांची पडताळणी करून योजनेचा अखंड लाभ मिळावा, यासाठी प्रशिक्षित स्वयंसेवक व अधिकारी उपस्थित राहतील. महिलांना त्यांचे आधार क्रमांक, मोबाईल लिंकिंग व लाभार्थी खाते पडताळणीसाठी संपूर्ण मदत मिळणार आहे. यासाठी लाभार्थीचे आधार कार्ड, पती किंवा वडिलांचे आधार कार्ड, 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी लिंक असलेला मोबाईल क्रमांक हे दस्तऐवज सोबत आणून लाभार्थिनींनी जेवायला प्रक्रिया पूर्ण करावी, असे ॲड. गिरीश गोखले यांनी केले आहे. कै. गोवर्धन शर्मा यांनी आपल्या आयुष्यात अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांतून समाजसेवेचे उदाहरण घालून दिले. त्यांच्या स्मृतीनिमित्त राबवण्यात आलेले हे शिबिर त्यांच्या 'जनतेसाठी नेहमी उपलब्ध' या कार्यपद्धतीचा पुढचा टप्पा ठरणार आहे, असेॲड. गोखले म्हणाले. शासनाच्या या योजनेत कोणतीही भगिनी लाभापासून वंचित राहू नये, हा या कॅम्पमागील प्रमुख उद्देश आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला हातभार लावणाऱ्या या उपक्रमामुळे केवळ लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये आर्थिक सहाय्य मिळणार नाही, तर त्यांचा सामाजिक सन्मान आणि आत्मविश्वासही वाढणार आहे. 'माझी लाडकी बहीण' योजना ही केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नाही; ती महिला सक्षमीकरणाचा व्यापक आराखडा आहे. महिलांना कुटुंबात, समाजात आणि रोजगाराच्या क्षेत्रात स्वावलंबी बनवण्याचा हेतू या योजनेतून साध्य होणार आहे, असे गिरीश गोखले यांनी सांगितले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विरुळ सर्कलचे राजकारण तापले : उमेदवारीच्या स्पर्धेत गटबाजीचा जोर

**विरुळ (आ,)/सचिन देवताळे**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका कधी जाहीर होतील याची उत्सुकता असतानाच विविध राजकीय पक्षांनी आपापली तयारी सुरू केली आहे. आगामी निवडणुकांचे रण सजू लागले असून ग्रामीण भागात बैठकां-मिळाव्यांची लगबग दिसून येते.आर्वी तालुक्यातील विरुळ जिल्हा परिषद सर्कल राजकीय दृष्ट्या नेहमीच गाजलेले क्षेत्र मानले जाते. या सर्कलमध्ये विरुळ व रसुलाबाद या दोन पंचायत समित्यांचा समावेश आहे. नव्या आरक्षणानुसार जिल्हा परिषदेसाठी अनुसूचित जमात, विरुळ समितीसाठी ओबीसी महिला आणि रसुलाबादसाठी अनुसूचित जमात अशी आरक्षण यादी जाहीर झाली आहे. त्यामुळे काही पारंपरिक दावेदार नेत्यांचा हिरमोड झाला असून पक्षांत उमेदवार ठरवताना गणित मांडावी लागत आहेत.मागील दहा वर्षांत शेतकरी संघटनेचे गजानन निकम यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक सत्ता स्थिर होती. मात्र यंदा भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शेतकरी संघटना आणि प्रहार पक्ष स्वतंत्रपणे लढण्याच्या तयारीत असल्याने लढत चुरशीची होणार आहे. नुकताच आमदार सुमित वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा मेळावा विरुळ येथे पार पडला, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या बैठकीही झाल्या आहेत.खासदार अमर काळे यांच्या राष्ट्रवादी प्रवेशानंतर काँग्रेसचे समीकरण बदलले आहे. आमदार सुमित वानखेडे आणि आमदार दादाराव केचे यांच्या समर्थकांमध्ये उमेदवार ठरवण्यावरून चर्चा रंगू लागली आहे. तसेच गजानन निकम यांचा शेतकरी संघटना गट आणि प्रहारचे राजू सावरकरही आपली ताकद दाखवण्यासाठी सज्ज असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे विरुळ सर्कलची निवडणूक यावेळी राजकीयदृष्ट्या लक्षवेधी ठरणार आहे.




## भाजपमध्ये गटबाजीचा उफाळा; पक्षाची एकता धोक्यात

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या फेरीत भारतीय जनता पक्षात गटबाजीचा स्फोट झाला आहे. पक्षातील दोन प्रमुख आमदार सुमित वानखेडे व दादाराव केचे यांनी वेगवेगळ्या मेळाव्यांचे आयोजन करून पक्षाची एकता भंग केल्याचा आरोप वाढू लागला आहे. आमच्या प्रतिनिधीने आमदारांशी संपर्क साधला असता सुमित वानखेडे यांनी प्रतिसाद दिला नाही तर दादाराव केचे हे झाडगाव सर्कलमध्ये बैठकीत असल्याचे सांगितले आगामी निवडणुकीत याचा भाजपाच्या विजयावर परिणाम होण्याची चिंता मनामध्ये उमटू लागली आहे.भाजपमधील गटबाजीचा उगम लोकसभा निवडणुकीमध्ये दिसून आला, जिथे अतिआत्मविश्वासाने कार्यकर्ते आपापल्या गटात विखुरले गेले होते,

**आरक्षणामुळे स्थानिक नेत्यांत संभ्रम, उमेदवारीवर राजकीय गणिते बदलली!**

# एका दिवसात दोन मृत्यूंनी कुटुंबावर दुःखाचं सावट; सकाळी बहिण गेली, सायंकाळी भाऊही निघाला

**वर्धा जनमाध्यम :** आयुष्यभर एकमेकांसोबत सुख-दुःख वाटून घेणाऱ्या बहीण-भावाच्या नात्याने शेवटच्या क्षणापर्यंत एकरूपता जपली. वृद्धापकाळाने सकाळी बहिणीचं निधन झालं आणि त्याच दिवशी सायंकाळी भावाचाही मृत्यू झाला. या दुहेरी दुःखाने ठाकरें आणि राऊत घराण्यावर शोककळा दाटून आली आहे.साईनगर, वर्धा येथील शांता मनोहर ठाकरे (वय ८४) यांचं निधन झालं. त्यांच्या निधनाची बातमी नागपूरच्या अंबादासपंत राऊत (वय ८८) यांना मिळताच ते वर्धा येथे आले. दुपारी बहिणीवर अंत्यसंस्कार पार पडले.अंत्यसंस्कारानंतर अंबादासपंत बहिणीच्या आठवणीत गप्प बसले होते. थोड्याच वेळात त्यांची प्रकृती खालावली. त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र उपचारादरम्यान सायंकाळी त्यांनीही प्राण सोडले.या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एका दिवसात दोन मृत्यूंच्या घटनांनी परिसरात वातावरण शोकाकुल झालं आहे. बहीण-भावाच्या या प्रेमळ नात्याची कहाणी लोकांच्या मनाला चटका लावून गेली.

# जुने चेहरे बाजूला, नव्या नेतृत्वाची झंकारः स्नेहा आकरे रणांगणात

## जनतेला फसवणाऱ्या राजकारणाला दिलं आव्हान, प्रभाग १५ मध्ये बदलाची चाहूल

**वर्धा/जनमाध्यम**

नगरपरिषद निवडणुकीचे बिगुल वाजताच प्रभाग क्रमांक १५ मध्ये जुन्या गोटांना काळजीच्या रेषा पडल्या आहेत. कारण या वेळी मैदानात उतरली आहे नवी ताकद स्नेहा आशिष आकरे, समाजात न कामाचा गवगवा आणि मतदारांशी केवळ आश्वासनांचे नाते ठेवणाऱ्या जुन्या राजकारणावर स्नेहा आकरे यांनी थेट घाव घालत नवा बदल घडविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.निस्वार्थ ग्रुप आणि सन्मान महिला ग्रुपच्या माध्यमातून त्यांच्या पती आशिष आकरे यांनी समाजकार्यातून विश्वास आणि माणुसकीची ओळख निर्माण केली. जुन्या नेत्यांनी मतांच्या गणितावर सत्ता मिरवली, तर या तरुण जोडीने रुग्णसेवा, रक्तदान शिबिरे, पर्यावरण मोहिमा, आणि जनकल्याण उपक्रमांतून जनतेचा खरा विश्वास कमावला आहे. प्रभागाचा विकास न घोषणांमध्ये, तर कृतीत दिसावा, हाच आमचा संकल्प आहे. प्रत्येक घरापर्यंत बदल पोहोचवायचा, असे स्नेहा आकरे यांनी उमेदवारी जाहीर करताना सांगितले.स्थानिक पातळीवर त्यांच्या उमेदवारीने नुसती चर्चा नाही, तर जुन्या राजकीय समीकरणांची मुळं डळमळीत झाली आहेत. 'सेल्फीसाठी समाजकार्य' आणि फायदेबाजीसाठी सत्ता करणाऱ्या जुन्या मंडळींवर प्रहार करत नव्या नेतृत्वाने आशेचा किरण दाखवला आहे. प्रभाग १५ आता खऱ्या जनतेच्या बदलाकडे पाहत आहे.



# व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून द्या

**वर्धा :** पी.एम विश्वकर्मा योजनेंतर्गत खरेदी-विक्री करण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे, मागणीसाठी सुमीत गणेशराव सतारे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. सुमीत हा आर्वी नाका परिसरात राहतो. त्याने पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत व्यवसाय करण्यासाठी अर्ज केला आहे. सोबतच त्यांनी आवश्यक ते कागदपत्रे सोबत जोडले आहेत. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी योजनेचा लाभ देण्यात येईल, असे सांगितले. मात्र, वर्ष लोटले तरी अद्यापही सुमीत यास योजनेचा लाभ देण्यात आला नाही. यामुळे त्याला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. सोबतच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तो सतत बँकेत चकरा मारत अहे. मात्र, कर्ज मिळत असल्याने तो अडचणीत सापडला आहे. कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे, या मागणीसाठी सुमीत सतारे यांनी निवेदन दिले.

# आ.सुमित वानखेडे यांच्या प्रयत्नाने २१ गावांतील शेतीला मिळणार दिवसा वीजपुरवठा

**कारंजा (घा.) जनमाध्यम;** तालुक्यातील सारवाडी जिल्हा परिषद सर्कलअंतर्गत सावळी (बु.) येथील महावितरणच्या ३३ केव्ही सबस्टेशनमधून राजनी व सावळी फिडरला वीजपुरवठा होतो. या परिसरातील शेतांमध्ये सध्या सर्वत्र ओलीताचे काम सुरू असल्यामुळे व दोन्ही फिडरवर वाढलेल्या मागणीमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे शक्य होत नव्हते. शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेता आ. सुमित वानखेडे यांनी वरिष्ठस्तरावर प्रयत्न केल्याने अखेर त्या २१ गावांतील शेतीला दिवसा वीजपुरवठा होणार आहे.

सदर गावे परिसर जंगलाला लागून असल्यामुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागायचा. त्यामुळे सातत्याने दिवसा वीजपुरवठा करण्यासंदर्भात शेतकऱ्यांकडून मागणी होत होती. याबाबत शेतकऱ्यांच्या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन दिवसा सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्याची मागणी महावितरणाचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा यांच्याकडे केली होती. त्यानुसार अवघ्या दोन दिवसांत तातडीने नागपूर येथून ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर सावळी (बु.) सबस्टेशनसाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे ट्रान्सफॉर्मर स्थापित झाल्यावर या सबस्टेशनअंतर्गत येणाऱ्या २१ गावांना शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या गंभीर समस्येची दखल घेत आ. सुमित वानखेडे यांनी शेतकऱ्यांची समस्या मार्गी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहे.



## संक्षिप्त

### आई-वडिलांची सेवा करणे हे परमकर्तव्य आहे

**समुद्रपूर.** आई-वडिलांच्या चरणी खरे स्वर्ग आहे. आई-वडिलांची सेवा करणे हीच देवाची खरी सेवा आहे. वडील हा कुटुंबाच्या अस्तित्वाचा पाया असतो. आई कुटुंबाचा आधार देखील असू शकते, परंतु खरा पाया म्हणजे वडील. तथापि, काही प्रकरणांमध्ये, व्यसनांच्या आहारी गेलेले वडील आपल्या मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवू शकत नाहीत आणि त्यांना पूर्णपणे शिक्षण देऊ शकत नाहीत. प्रत्येक व्यक्तीचे त्यांच्या आयुष्यात समाजाप्रती कर्तव्य असते. आपण या भावनेने वागले पाहिजे. समुद्रपूर तहसीलमधील उमरी येथील रहिवासी सीताराम मोहितकर यांना श्रद्धांजली वाहताना, प्रसिद्ध कीर्तन वादक आणि सात खंजरी वादक मोहनदास चोरे यांनी कीर्तनादरम्यान हे विचार व्यक्त केले. योगेश सीताराम मोहितकर हे ग्रामगीताचार्य राजेंद्र मोहितकर गुरुजी यांचे धाकटे भाऊ होते. गुरुजींनी स्वस्त धान्य दुकान चालवून ग्रामगीतावर चिंतन करताना हे विचार व्यक्त केले. आदर्श कोळमकर यांनी हार्मोनियमवर, प्रकाश येवले यांनी तबल्यावर आणि प्रकाश कदम आणि अधावू यांनी गायनावर सप्त खंजरी कीर्तन सादर केले. कार्यक्रमाची सांगता श्रद्धांजलीने झाली. गावातील आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते,

### सट्टापट्टी जुगा अड्डा उधळला

**वर्धा :** सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेला सट्टापट्टी जुगार अड्डा पोलिसांनी उधळून लावला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या पथकाने वायगाव हळद्या येथे केली. पाच जुगाऱ्यांना बेड्या ठोकण्यात आला. त्यांच्याकडून ४ लाख ४ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत समुद्रपूर पोलिसांत गुन्हा दाखल केला. मुजिप शेरखा पठाण, अनिल सोमाजी घोडे, अरबाज बशीर शेख, तुकाराम धनबाजी शेंडे (रा. समुद्रपूर), संदीप देवीदास मानकर (रा. वायगाव) अशी अटक जुगाऱ्यांची नावे आहे. समुद्रपूर हद्दीत गस्त सुरू असताना आरोपी सार्वजनिक ठिकाणी सट्टापट्टीचा जुगार चालवत असल्याचे समजले. पोलिसांनी रोख १५ हजार रुपये, पाच मोबाईल, तुन दुचाकी, आकडे लिहिलेला कागद चार लाख चार हजारांचा माल जप्त केला.

### पदवीधर निवडणुकीसाठी नोंदणी मोहीम

**हिंगणघाट जनमाध्यम :** येत्या नागपूर विभाग पदवीधर विधानपरिषद निवडणुकीसाठी मतदार नोंदणीचे अभियान सुरू झाले असून, इच्छुकांनी ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत फॉर्म भरावेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसकडून आवाहन करण्यात आले आहे. नोंदणीसाठीचे फॉर्म नंदोरी चौक, झुलेलाल मॉलच्या वरील मजल्यावर असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात उपलब्ध असून, तेथेच जमा करता येतील.फॉर्मसमवेत पासपोर्ट साईज फोटो, डिग्री किंवा डिप्लोमा मार्कलिस्टची आणि आधार कार्डची स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रत आवश्यक आहे. वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, तसेच राजू मुडे (९७६४२७०८५९) आणि निखिल ठाकरे (९६२३०२८४०४) यांनी इच्छुकांनी नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे. शिक्षित मतदारांचा पुढाकार लोकशाहीला बळ देणारा ठरेल, असे मत पक्षाने व्यक्त केले आहे.

### कुलूप बंद घराला चोरट्यांनी केले टार्गेट

**हिंगणघाट :** येथील संत कबीर वार्ड येथील दशरथ वामनराव मुंगले (वय ४८) हे आपल्या पत्नी, मुलगा आणि मुलीसोबत अक्षता लावण्यासाठी गिरड येथे गेले होते. घराला कुलूप लावून सर्व कुटुंब बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्याने संधी साधत घराच्या समोरच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने ४५ हजार रुपये रोख आणि दागिणे ऐवज लंपास केला. शनिवारी गिरडवरून परतल्यावर मुंगले कुटुंबाला घरफोडीची घटना लक्षात आली. या प्रखरणी हिंगणघाट पोलिसांनी चोरटयांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# नगर पालिकेत ३२७ हरकतींचा निपटारा; आता ८८ हजार १३ मतदार

## अंतिम मतदार यादी जाहीर, एका प्रभागात सरासरी पाच हजार मतदार; इच्छूकांमध्ये हालचालींना वेग

**वर्धा/जनमाध्यम**

नगरपरिषदेची निवडणूक दारात आली आहे आणि त्याआधीच शहरातील राजकीय वातावरण अक्षरशः तापले आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने मतदार यादीची प्रक्रिया पूर्ण करत अखेर ३२७ हरकतींचा निपटारा करून वर्धा नगर परिषदेची अंतिम मतदार यादी जाहीर केली आहे. नव्या यादीत ८८ हजार १३ मतदारांचा समावेश असून हाच आकडा पुढच्या लढाईतील जनादेश ठरवणार आहे.निवडणुकीचा बिगुल केव्हाही वाजू शकतो. त्याची चाहूल लागताच शहरात राजकारणाचे तापमान वाढले आहे. प्रभागनिहाय मतदारसंख्या निश्चित झाल्याने आता प्रत्येक इच्छूक उमेदवारचा डोळा प्रभागवार आकडेवारीवर स्थिरावला आहे. कुठे मतदार पाच हजारांच्या घरात, तर कुठे साडेचार हजारांवर. त्यामुळे प्रत्येक मताचा हिशोब आता गणिताच्या पाटीवर मांडला जात आहे.पूर्वी १९ प्रभाग आणि ३८ सदस्य असलेली वर्धा नगर परिषद आता २० प्रभाग व ४० सदस्यसंख्येसह नव्या रचनेत उतरली आहे.

यामुळे अनेकांचे प्रभाग बदलले, काहींचा मतदारवर्ग तुकड्यात विभागला. वर्षानुवर्षे प्रभागस्थ असलेल्या नेत्यांची गणितेही गुंतली आहेत. त्यामुळे या रचनेने राजकारणात नवीन समीकरणांची बीजे रोवली आहेत.सुरुवातीला तयार झालेल्या प्रारूप मतदार यादीवर नागरिकांनी दणक्यात हरकती नोंदवल्या. त्यांची संख्या होती तब्बल ३२७. मतांचे हक्क, नावे वगळली जाणे, नव्या समावेशाची मागणी या सर्व तक्रारींची सुनावणी झाल्यानंतर अखेर प्रशासनाने अचूक पडताळणी करून १ नोव्हेंबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध केली.आता ७ नोव्हेंबर रोजी बुथनिहाय मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

यादीनंतर निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याची शक्यता आहे. शिवसेना, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, अपक्ष उमेदवारांनी डोळ्यातील धूळ झटकत आपापले घरचलन सुरू केले आहे. जनतेचा सेवक बनण्याची घोषणा देणारे अनेकजण आता गल्लोगल्ली दिसत आहेत.अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याने कोणता प्रभाग कुणाचा? या चर्चेला उधाण आलं आहे. शहरातील चहाचे कप आणि राजकीय पत्ते दोन्ही गरम झाले आहेत.

नगरसेवक पदासाठीचा हा संघर्ष आता केवळ मतांचाच नव्हे, तर अस्तित्वाचा लढा बनणार हे निश्चित आहे. वर्धा नगर परिषदेची निवडणूक म्हणूनच यावेळी वेगळाच उत्सव ठरणार आहे.



# स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यापूर्वी सावधगिरी बाळगा

## विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छता निरीक्षक (हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर) अभ्यासक्रमासाठी मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मात्र, अनेक युवक-युवतींना फसवणुकीपासून वाचण्यासाठी तज्ज्ञांनी आवाहन केले आहे की विद्यार्थी संस्थेची शासनमान्यता आणि ळउण मान्यता असलेली असायला हवी. विशेषतः स्वच्छता निरीक्षक पदासाठी प्रवेश घेत असताना, फक्त मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि संस्थांमधूनच अभ्यासक्रम पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.

यामुळेच शासनासमोरील अनधिकृत, खाजगी संस्था किंवा कोर्ससंबंधी फसवणूकीपासून बचाव करण्याची गरज आहे.स्वच्छता निरीक्षक हा पद आता महत्त्वाचा होत आहे कारण देशाला प्रदूषणमुक्त आणि निरोगी बनवण्याचा मार्ग स्वच्छतेतून सुरू होतो. या पदासाठी मंत्रालयाने आणि राज्यस्तरावर भरपूर जागा काढल्या आहेत.

मात्र, अभ्यासक्रमातील दर्जा आणि मान्यता नसल्यास, विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळण्याची शक्यता कमी होते. म्हणून, युवकांनी शासनमान्य आणि ळउण मान्यता असलेल्या संस्थांमध्येच प्रवेश घ्यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेकडूनही स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम १ वर्षाचा आयोजित केला जातो, ज्यात लोकप्रशासन, पर्यावरण नियोजन, नगर व्यवस्थापन, शहरी दारिद्र्यनिर्मूलन यांसारख्या अनेक विषयांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाद्वारे युवक आधुनिक कौशल्ये मिळवून सरकारी नोकरीस पात्र ठरू शकतात.विद्यार्थ्यांनी कोरड्या मोहांपासून बचाव करणे अत्यंत गरजेचे असून, प्रवेश फी आणि अभ्यासक्रमाची अधिकारिक माहिती तपासूनच निर्णय घ्यावा. शासन व संबंधित तज्ज्ञांनी योग्य मार्गदर्शन दिल्याने युवकांच्या हितासाठी ही काळजी घेणे आवश्यक आहे.या इशाऱ्यामुळे युवकांनी अभ्यासक्रमाच्या दर्जावर विशेष लक्ष देऊन फसवणूक टाळावी, अशी अपेक्षा केली जात आहे.

# नाफेड पोर्टल अजूनही बंदच

**वर्धा.** या वर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसामुळे सोयाबीन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीपासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेडने सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया ३० ऑक्टोबरपासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि, नाफेड पोर्टल बंद असल्याने शेतकऱ्यांची नोंदणी सध्या अशक्य आहे.

वृषी किंमत आधार योजनेअंतर्गत, सरकारने सोयाबीनसाठी ५३२८ रुपये प्रति क्विंटल आधारभूत किंमत निश्चित केली आहे. नोंदणी कालावधी ३० ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर पर्यंत आहे, तर खरेदी प्रक्रिया १५ नोव्हेंबरपासून ९० दिवसांसाठी सुरू होणार आहे. ऑनलाइन नोंदणी ३० ऑक्टोबर रोजी सुरू होणार होती, परंतु तांत्रिक अडचणींमुळे पोर्टल पूर्णपणे कार्यरत नाही, ज्यामुळे शेतकरी नोंदणी करू शकत नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. नाफेड पोर्टल बंद असल्याने नोंदणी शक्य नसल्याचे खरेदी आणि विक्री समितीचे अध्यक्ष पंकज घोडमारे यांनी सांगितले. तथापि, सोयाबीन नोंदणी पोर्टल पुढील काही दिवसांत पुन्हा सक्रिय केले जाईल. म्हणून, वर्धा तहसीलमधील शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह वर्धा तालुका सहकारी खरेदी आणि विक्री समिती मर्यादित कार्यालयात भेट द्यावी आणि त्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. वर्धा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांकडून सोयाबीन नाफेडसाठी आधारभूत किमतीवर खरेदी केले जाईल,

# स्काऊट गाईडच्या डायमंड जुबली सेलिब्रेशन शिबिराकरिता निवड

**देवळी जनमाध्यम :** भारत स्काऊट गाईड या शैक्षणिक चळवळीला येत्या ७ नोव्हेंबर रोजी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने राष्ट्रीय कार्यालयातर्फे दिल्ली येथील नॅशनल ट्रेनिंग सेंटर गडपुरी परिसरात ६ ते ८ नोव्हेंबर दरम्यान 'डायमंड जुबली सेलिब्रेशन' शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. यात भारतातून ३५० स्काऊटस, गाईड्स, रोव्हर्स आणि रेंजर्स सहभागी होणार आहेत. सदर शिबिराकरिता महाराष्ट्र राज्यातर्फे वर्धा भारत स्काऊटस आणि गाईड्स तर्फ स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील १२ रोव्हर्स आणि रेंजर्स यांची निवड झालेली असून ते महाराष्ट्र राज्याचे रोव्हर विभागाचे प्रशिक्षक तथा रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या नेतृत्वात सहभागी होत आहे. यात सहाय्यक रेंजर लीडर कल्याणी लिखार, वैष्णवी शिरभाते, रेंजर आरती मरघडे, कांचन देशमुख, तनीषा उईके, साक्षी सातव, यामिनी पारधी, विक्की पेंदोरकर, कुंदन कावडे, राम देशमुख, निशांत शितळे व विपुल पेंदाम यांचा समावेश आहे. सदर शिबिरात आपआपल्या राज्याच्या परंपरेवर आधारित नृत्य, वेशभूषा, भाषांचे देवाण-घेवाण, राष्ट्रीय एकात्मता, देशभक्तीपर गीत, वक्तृत्व व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. आपल्या यशाचे श्रेय यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुनिता सोनारे, जिल्हा संघटक नितेश झाडे व गाईडच्या जिल्हा संघटक वैशाली घोम यांना देतात.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ‘सीसीआयच्या कठोर अटींनी कापूस शेतकऱ्यांचा हमीभाव धोक्यात’

**अमरावती / का.प्र.**

भारतीय कापूस महा मंडळाने (सीसीआय) हमीदरात कापूस खरेदी करण्याचा निर्णय घेतला असला, तरी प्रति एकर ३ ते ५.६० क्विंटल खरेदी करण्याची ठेवलेली अट कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाचक ठरणार आहे. विशेष म्हणजे कापूस खरेदीची ही अट जिल्हानिहाय वेगवेगळी आहे. बाजारात सध्या हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विकावा लागत आहे. दुसरीकडे सरकारी अटी, निकषांमुळे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल किमान एक हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागणार आहे.

अतिवृष्टी, सततचा पाऊस यांमुळे राज्यात कापसाचे यंदा मोठे नुकसान झाले. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना मोठा आधार ठरणारी ‘सीसीआय’ची कापूस खरेदी अनेक ठिकाणी अद्याप सुरू झाली नाही, त्यामुळे शेतकरी चिंतित आहेत.

केंद्र सरकारने देशभरातील ११ प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये ५५० किमान आधारभूत किंमत खरेदी केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेतला. कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना ‘कपास-किसान’ ॲपवरून नोंदणी करावी लागते. त्यातही नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची पडताळणी करण्यासाठी (व्हॅलिडेशन) कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा तांत्रिक अडचणींमुळे विलंब होतो. या पार्श्वभूमीवर सीसीआयने नोंदणीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.



> कापसाला हमीभावापेक्षा कमी किंमत मिळत असेल, तर सरसकट सर्व कापूस खरेदी करण्याची व्यवस्था सरकारने करायला हवी. एकरी खरेदीची मर्यादा घालणे चुकीचे आहे. ज्या प्रमाणे कापूस एकाधिकार योजना राबविण्यात आली होती, ती आता सीसीआयमार्फत सरकारने राबवावी. शेतकऱ्यांचा संपूर्ण कापूस खरेदी करावा. अन्यथा शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल.
>
> **विजय जावंधिया,** शेतकरी नेते.

**आर्द्रतेच्या निकषाने अडचण?**

सीसीआय कापूस खरेदी करताना १२ टक्क्यांपेक्षा कमी आर्द्रता असलेला कापूस खरेदी करीत असते. मात्र यंदा अतिवृष्टीमुळे कापूस ओला झाल्याने राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त कापसात आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने या निकषात बसणे अवघड आहे. ८ ते १२ टक्के ओलावा आणि लांब धागा अशा दर्जाच्या कापसासाठी ८,११० रुपयांचा हमीदर निश्चित करण्यात आला आहे. मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७, ७१० रुपये हमीभाव आहे. राज्यात पावसाळी वातावरणामुळे ओलावा साधारणपणे १२ ते २० टक्क्यांदरम्यान असतो. मात्र सीसीआय केवळ ८ ते १२ टक्क्यांपर्यंत आर्द्रतेचा कापूसच खरेदी करते. हीच विद्यमान नियमावली आहे. या कठोर निकषांमुळे हमीभाव मिळणे कठीण मानले जात आहे.

सासीआय एकरी ३ ते ५.६० क्विंटल कापूस खरेदी करणार असल्याने शेतकऱ्यांना उरलेला कापूस हमीभावापेक्षा कमी किमतीत व्यापाऱ्यांना विकावा लागेल, त्यात कापूस उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

### *आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव स्पर्धेमध्ये*

## वसुधाताई देशमुख अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सुयश



**अमरावती/का.प्र.**

कृषी महाविद्यालय अकोला यांच्याद्वारे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये वसुधाताई देशमुख अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांनी फोक डान्स प्रहसन मूक नाट्य वाद विवाद स्पर्धा रांगोळी स्पर्धा पेंटिंग स्पर्धा क्ले मॉडलिंग स्पर्धा इत्यादी विभागामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता यापैकी प्रहसन या कला प्रकारात महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आणि त्यांची निवड आंतरविद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धा इंद्रधनुष्य करिता झाली.

सदर स्पर्धा या कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. फोक डान्स या कला प्रकारांमध्ये रोप्य पदक प्राप्त केल. या संपूर्ण कला प्रकारामध्ये २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यामधील फोक डान्स या कलाप्रकारांमध्ये नऊ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व प्रहसन या कला प्रकारामध्ये सहा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असा एकूण १५ विद्यार्थ्यांनी थेटर या प्रकारामध्ये सांघिक उपविजेतेपद प्राप्त केलं. सर्व विद्यार्थ्यांना कृषी महाविद्यालय अकोल्याचे सहयोगी अधिष्ठाता डॉक्टर संजय भोयर यांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली व्यासपीठावर कृषी महाविद्यालयाच्य आयोजन समितीचे प्रमुख डॉक्टर वाळके उपस्थित होते त्याचप्रमाणे डॉक्टर मोहन तोटावार विद्यापीठाचे संचालक विद्यार्थी कल्याण डॉक्टर संदीप हाडोळे हे उपस्थित होते. या आंतर महाविद्यालय युवा महोत्सवामध्ये जवळ जवळ २२ महाविद्याल याच्या वेगवगळ्या विभागात तीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. वसुधाताई देशमुख अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जे यश प्राप्त केले त्या यशाचे श्रेय श्रम शाफल्य फाउंडेशनच्या सन्माननीय अध्यक्ष माजीमंत्री मा. वसुधाताई देशमुख महाविद्यालयीन स्थानिक विकास समिती चे सर्व सदस्य महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य खेडकर महाविद्याल याचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. उदय देशमुख कोरिओग्रा फर उमेश गजभिये महाविद्याल यातील सर्व प्राध्यापक वृंद व इतर कर्मचारी रुंद यांना दिले.

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आढावा बैठक



**अचलपूर/वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने परतवाडा येथे विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकित पक्षाचे नेते व महासचिव आ. संजय खोडके यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकांचा आढावा घेतला.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुरेखा ठाकरे, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. आ. संजय खोडके महणाले, पक्षाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ३ नोव्हेंबरपासून सलग जिल्हानिहाय आढावा सुरू आहे. अमरावती जिल्ह्याचा आढावा ६ नोव्हेंबरला घेतला जाणार असून, आज अचलपूर, अंजनगाव सुर्जी आणि दर्यापूर येथे पदाधिकाऱ्याशी संवाद साधण्यात आला. जिल्ह्यात पक्ष कुठल्या भागात सक्षम आहे आणि कोणत्या ठिकाणी उमेदवार निवडून आणू शकतो, याचा सविस्तर आढावा अचलपूर, दर्यापूर, अंजनगांव सुर्जी येथे घेण्यात आला.

जिथे तिन्ही पक्षांना फायदा होईल, त्या ठिकाणी प्रभागनिहाय युती केली जाईल. मात्र विरोधी पक्षाशी कोणतीही युती होणार नाही.

महायुतीला फायदा होईल या धोरणावर राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार निश्चित करेल. शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप नेत्यांशी सुसंवाद ठेवून, कटुता न आणता निवडणुका लढवल्या जातील. याप्रसंगी सुरेखाताई ठाकरे व संतोष महात्मे यांनी संबोधीत केले.या बैठकीत गुरु पठाण, निखील ठाकरे, प्रकाश वैद्य, प्रकाश ठाकरे, गजानन बिजागरे, सुनिल पांडे, रिंकू शुकला, नानू जयसिंघानी, अजय अग्रवाल, साहेबराव दामोदरे तसेच महिला व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**श्री. ए.बी.कट्टे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक-२४७२/२०२५
सिमा वि निरंक पुढील तारीख ०४.१२.२०१५

**जाहिरनामा / सायटेशन**

**अर्जदार- १. सीमा रघुनाथ गद्रे,**वय - ५६ वर्ष, व्यवसाय- घरकाम रा. प्लॉट नं ४२, अर्जुन अपार्टमेंट त्रिमूर्ती नगर रोड बॅंक ऑफ इंडिया च्या मागे त्रिमूर्ती नगर नागपूर **२. श्रीमती शोभा अरूण वैशपांयन,** वय -७६ वर्ष, व्यवसाय- घरकाम रा. बालाजी प्लॉट, राजापेठ अमरावती **३. सौ. श्रुती श्रीकांत दामले,** वय -५२ वर्ष, व्यवसाय-नौकरी रा. राम नगर शाळा बालाजी प्लॉट राजापेठ अमरावती ४**. सौ कल्याणी समीर पेंडसे,** वय- ४९ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. गुरू मंदिराजवळ कारंजा लाड, ता कारंजा जि वाशिम

**विरुध्द**
**गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत अरूण श्रीधर वैशंपायन दि २२.०८.२०१८ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार सीमा रघुनाथ गद्रे व इतर यानी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**त्यापेक्षा सीमा रघुनाथ गद्रे व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु, मयतांचे वारसदार नाही अमे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ३०.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
वरीष्ठ स्तर अमरावती

### एसीबीचा उपक्रम; दक्षता सप्ताहात पथनाट्यातून

## अभियान भ्रष्टाचाराविरुद्ध निर्भयतेने आवाज उठवा

**अचलपूर/वार्ताहर**

भ्रष्टाचार हा देशाच्या विकासाला लागलेला सर्वांत मोठा ‘कॅन्सर’ आहे. या ‘कॅन्सर’ने समाजाच्या सर्व स्तरातील प्रामाणिक नागरिकांना लाचार बनवले आहे. मात्र आता नागरिकांनीही भ्रष्टाचाराविरुद्ध निर्भयतेने आवाज उठवावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक सच्चिन्द्र शिंदे यांनी केले. ‘दक्षता सप्ताह’ निमित्त एंटी करप्शन ब्युरो अमरावती आणि शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती यांच्या संयुक्त विद्यमाने परतवाडा



बसस्था नक परिसरात जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन पोलिस अधीक्षक मारुती जगताप यांनी केले तर नियोजन अतिरिक्त पोलिस अधीक्षक सच्चिन्द्र शिंदे यांच्या संकल्पनेतून डीवायएसपी सुनील किनगे आणि मंगेश मोहोड़ यांच्या पुढाकाराने करण्यात आले. कार्यक्रमास डेपो मॅनेजर जीवन वानखेडे, सामाजिक कार्यकर्ते योगेश खानजोड़े, डॉ. राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, विजय गोंडचवर, विलास सोलंकी, संजय डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.लाच मागणाऱ्याविरोधात तक्रार करा. पथनाटयाद्वारे भ्रष्टाचारमुक्त भारत या विषयावर प्रभावी सादरीकरण एमटीव्ही इरसाल टीमने केले. या टीममध्ये मंगेश ठाकरे, रविकिरण कांडलकर, आचल गजभिये, शुभम खंडारे, प्रज्वल दामले, शुभम स्थूल आणि तुषार रामटेके यांचा समावेश होता. त्यांच्या अभिनयातून लाच देऊ नका, लाच घेऊ नका हा स्पष्ट संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यात आला. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक सच्चिन्द्र शिंदे महणाले, भ्रष्टाचारविरोधात नागरिकांनी निर्भयपणे पुढे यावे. लाच मागणा-या शासकीय किंवा निमशासकीय अधिकाऱ्यां विरोधात तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक संपर्क साधावा.

# संक्षिप्त

## सुनंदा इंगोले यांचा सेवानिवृत्त सत्कार



**नांदगाव खंडेश्वर -** तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा पापळ येथील सहाय्यक शिक्षीका सुनंदा संजय इंगोले यांना वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त निमित्त सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्कार समारंभ निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्याचे पती सेवानिवृत्त लिपिक संजय इंगोले, मुलगा अभिषेक इंगोले फॉर्मशी अधिकारी व मुलगी श्रद्धा इंगोले उपस्थितीत सत्कार करण्यात आला.यावेळी पापळ सरपंच्या उज्ज्वला इंगळे, शाळेचे मुख्याध्यापक पंजाबराव जोगे, केंद्रप्रमुख लोहेगाव बलदेव घुगे, शिक्षण विस्तार अधिकारी विलास बाबरे, नांदगाव खंडेश्वर केंद्रप्रमुख अनिल कोल्हे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप रोहणकर तसेच शाळेतील सहाय्यक शिक्षक गजानन लवंगे, राहूल बिंड, श्रीराम रोठोड, राधा मोहड, मिनाक्षी भरणे, अजय मुरादे व केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## जनता विद्यालयात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती

**अंजनगाव बारी -**जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंजनगाव बारी येथे आधुनिक भारताचे शिल्पकार राष्ट्रीय एकतेचे प्रतीक सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरे करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक विनोद मुगल हे होते प्रमुख अतिथी पर्यवेक्षक गजेंद्र अवघड उपस्थित होते. सर्वप्रथम सरदार वल्लभभाई पटेल याच्या प्रतिमेचे पूजन व हार्रापण कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजेंद्र अवघड यांनी केले त्यांनी विद्यार्थ्यांना सरदार सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेले कार्य तसेच जयंती साजरी करण्याचा हेतू स्पष्ट केला. शाळेतील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी आणि पर्यवेक्षक, प्राचार्य विनोद मुगल यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली.



## तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याचे भुमिपुजन

**शिराळा -** येथील तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्या परिसराचे सौंदर्यकरणाचे भुमिपुजन करण्यात आले. याप्रसंगी कृउबास संचालक मिंलिदभाऊ तायडे, मारोतरावजी नागे, नंदकुमार चिंचखेडे, यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. सर्व प्रथम भगवान बुद्धांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे पुजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी पत्रकार डीआर वानखडे, गोपीचंद मेश्राम, भिमराव बोरकर विजय चिंचखेडे जितेंद्र गजभिये सुरेश खाडे, चौबे बाबु मेश्राम रुपराव डोंगरे शितल चिंचखेडे , जयश्री चिंचखेडे, कुसुम महाजन आरती महाजन शिल्पा मेश्राम रुपाली बोरकर ममता महाजन यशोदा मेश्राम साधना मेश्राम आशाबाई राऊत बेबी मेश्राम देवराव मेश्राम प्रविण मेश्राम आदी उपस्थित होते.



## पुरुषोत्तम काळे यांचा सेवापुर्ती सत्कार

**अमरावती -** येथील विभागीय महसूल आयुक्त कार्यालयातील पुरुषोत्तम काळे हे नियत वयोमाना नुसार महसूल सहाय्यक या पदावरून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंगल यांच्या अध्यक्षतेखाली शाल,श्रीफळ, पुष्पगुष्य देऊन नुकताच उत्साहात झाला.याप्रसंगी, प्रमुख अतिथी म्हणून अप्पर आयुक्त सुरेश वाघमारे, रामदास सिद्धभट्टी, अजय लहाने, संतोष कवळे, सहाय्यक आयुक्त भूसुधार वैशाली पाथरे,आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.पुरुषोत्तम काळे यांनी देशसेवे करिता २३ वर्ष सेवा समर्पित करून येथील भूसुधार शाखेत अकरा वर्ष उत्कृष्ट व प्रामाणिक पणे सेवा दिली आहे. यावेळी त्यांचे सोबत पत्नी मीरा काळे, सुपुत्र रोहित आणि डॉ. शंतनू काळे, मुक्ता व अनुज काळे, कैलास नगर निवासी राजाभाऊ खवले, प्रा. सुरेश यावले, दत्ताभाऊ घाटोळ, नितीन तायडे, ज्ञानेश्वर यावले, ॲड. प्रभाकर वानखडे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक नायब तहसीलदार श्याम सुंदर देशमुख, आभार तहसीलदार प्रज्ञा काकडे यांनी मानले.



**ZILLA PARISHAD, BULDHANA**
**E-TENDER NOTICE NO.- 2/2025-2026**

E-Tenders are hereby invited for Hand Pump Spare parts from the Hand Pumps spare part manufactures only having valid BIS License for these items, by E-Tenders Method in two bid system.

The details tender documents are available online on website www.mahatenders.gov.in Interested manufactures may visit this site for Bid downloading/uploading from 31/10/2025 To 14/11/2025.

.Sd/-
**Chief Executive Officer**
Zilla Parishad, Buldhana.

## खोट्या आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे ताबा सांगणा-याला न्यायालयाचा दणका

**शिराळा/वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून अमरावती तालुक्या तील शिराळा येथील मौजे शिराळा भाग नंबर ३ गट क्रमांक ६९३ या शेतावर खोट्या आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे ताबा सांगणा-या उमेश कावरे या इसमाला अमरावती न्यायालयाने चांगल्याच दणका दिला व सदर शेत हे बाबुराव बोराळकर यांच्याच मालिकीचे व ताब्यातील असल्याने त्यांच्या ताब्यास उमेश कावरे व त्यांचे कुटुंबीय अथवा त्यांचेकडुन ताबा सांगणा-या कोणत्याही व्यक्तीस तसा अडथळा निर्माण करण्यापासून आदेशान्वये मज्जाव करण्यात आला आहे.विशेष म्हणजे उमेश कावरे याने लिलाबाई कावरे यांच्या आजारपणाचा व अशिक्षित पणाचा फायदा घेवून खोटे व बनावट कागदपत्र तयार केले व त्याआधारे अमरावती न्यायालयात खोटा दावा दाखल केला. त्याचप्रमाणे लिलाबाई कावरे यांच्या

**शेताचे मालक बोराळकरच, न्यायालयाचे शिक्कामोर्तब**



वारसाकडुन बाबुराव बोराळकर यांनी संपुर्ण शेताची रीतसर खरेदी केली असून सुद्धा त्यांच्या ताब्यास कोणत्या न कोणत्या प्रकारे स्वतः व आपल्या पत्नी व मुला मार्फत अडथळा निर्माण करण्याचे प्रयत्न केले तसेच बाबुराव बोराळकर यांच्या माघारी शेतात जावुन सदर शेतातील शेतमाल चोरी करणे सुरू केल्याने बाबुराव बोराळकर यांनी विद्यमान ३ रे सहदिवाणी न्यायधिश कनिष्ठ स्तर अमरावती येथे उमेश कावरे विरुद्ध मनाई हुकूम मिळणेकामी अर्ज सादर केला. या प्रकरणात बाबुराव बोराळकर यांच्या मार्फत ॲड संकेत सुरेश देशमुख यांनी युक्तिवाद केला व बाबुराव बोराळकर यांनी सादर केलेल्या अर्जावर न्यायालयाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी आदेश पारीत करुन बाबुराव बोराळकर यांच्या ताब्यास उमेश कावरे व त्यांचे कुटुंबीय अथवा त्यांचेकडुन ताबा सांगणा-या कोणत्याही व्यक्तीस तसा अडथळा निर्माण करण्या पासून मज्जाव करण्यात आला आहे. या आदेशावर सदर शेताचे मालक बाबुराव बोराळकर यांनी व्यक्त केला.

# भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक, दोघांचा जागीच मृत्यू







**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर-मुर्तीजापूर मार्गावर भरधाव कारने समोरील दुचाकीस जबर धडक दिल्याने भिषण अपघातात दोन मजूरांचा जागीच मृत्यू झाला आहे. सदर घटना रविवारी (दि.२) सायंकाळी पावणेसात वाजताच्या सुमारास घडली.

घर बांधकाम मजूर गौतम अण्णा मोहोड (वय ३७) आणि चालक कैलास एकनाथ पेठकर (वय ४२) दोघेही रा.जांभा खुर्द ता.मुर्तीजापूर अशी मृतकांची नावे आहेत. घटनेच्या वेळी मृतक गौतम व कैलास हे दोघेही दर्यापूर येथून राजकाम आटोपून दुचाकी क्रमांक एम.एच २८ एफ ५३०१ने गावी जात होते. दरम्यान दर्यापूर-मुर्तीजापूर रोडवरील स्वाद हॉटेलजवळ समोरून येणाऱ्या भरधाव कार क्रमांक एम. एच. ४० डी.ई १२०९ ने दुचाकीस जोरदार धडक दिली. या भिषण☞(पान २ वर)

## पैशांच्या दबावानंतर

# पतीकडून पत्नीला तीन तलाक

### -अंजनगाव सुर्जीतील घटना

**अंजनगाव सुर्जी /प्रतिनिधीः** : पैशांच्या लोभाने संसार उद्ध्वस्त झाल्याची घटना अंजनगाव सुर्जी येथे उघडकीस आली आहे. एका महिलेला पतीने पैशांचा दबाव आणत समाजातील लोकांसमोर तीन वेळा 'तलाक' उच्चारून सोडून दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे.




फिर्यादी महिलेचे लग्न वसीम शेख रऊफ कुरेशी (वय ३०) याच्याशी झाले होते. लग्नानंतर सासरी नांदताना सासरच्यांनी तिला सांगितले की, 'तुझ्या मामाने लग्नात आंनदान पुरेसे दिले नाही.' त्यानंतर पतीनेही तिला दबाव आणला की, 'तुझ्या मामाकडून अडीच लाख रुपये आण, नाहीतर☞(पान २ वर)

# मतदार याद्यांमध्ये मोठा घोटाळा

## अनिल देशमुखांचा सरकारवर हल्लाबोल



**अमरावती /प्रतिनिधीः:** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषदेत राज्य सरकारवर तीव्र टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकार निष्क्रिय असल्याचा आरोप केला.

अमरावती च्या विश्राम गृह येथे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पत्रकारांसोबत मनमोकळा संवाद साधला.

पुढे बोलताना ते म्हणाले की 'शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असूनही सरकार हातावर हात धरून बसले आहे. परदेशातून ११ टक्के कापूस आयात केल्याने स्थानिक शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार नाही,' अशी टीका त्यांनी केली आणि तातडीने सोयाबीन खरेदी सुरू करण्याची मागणी केली.

मतदार यादीतील घोटाळ्यांवर बोलताना देशमुख म्हणाले की, काल मुंबईत सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. 'ॲि आणि मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी आहेत. बाहेरच्या राज्यातील नावे याद्यांमध्ये असून, मुंबई मनपा आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानी तब्बल १२० मतदारांची नोंद झाली आहे. शासकीय बंगले बोगस मतदारांसाठी वापरले जात आहेत,' असा आरोप त्यांनी केला.

निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा आरोप करत देशमुख☞(पान २ वर)

# कर्जमाफी पर्यंत शेतकऱ्यांनी भाजपसह सत्ताधारी पक्षांना मतदान करू नये : बच्चू कडू

## पत्रकार परिषदेत कर्जमाफीविषयी मांडले अनेक मुद्दे

अमरावती/प्रतिनिधीः-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपुर्वी कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा केली आहे. ही तारीख त्यांना पाळावीच लागणार आहे. कर्जमाफीच्या दिशेने जर सरकारने हालचाली केल्या नाहीत, तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप, शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला मतदान करू नका, असे आवाहन शेतकऱ्यांना बच्चू कडू यांनी केले आहे.



बच्चू कडू यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना कर्जमाफीविषयी अनेक मुद्दे मांडले. ते म्हणाले, कर्जमाफीचा पैसा हा बँकांकडे जातो. आज शेतकरी अतिवृष्टीमुळे संकटात सापडला आहे. त्याला तातडीच्या मदतीची गरज आहे. आता शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत जात आहे. ३० जून २०२६ पुर्वी कर्जमाफी मिळणार आहे, म्हणजे शेतकऱ्यांना चालू आर्थिक वर्षातील कर्जाची परतफेड करण्याची गरज पडणार नाही. अस्मानी संकटामुळे हे कर्ज फेडणे शक्यही होणार☞(पान २ वर)

# भावानेच रचला भावाच्या खुनाचा कट.!

## पैनगंगा नदीतील अनोळखी मृतदेह प्रकरणाचा उलगडा

### -स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी; दोन आरोपींना अटक

**यवतमाळ /प्रतिनिधीः**–पंधरा दिवसांपूर्वी पैनगंगा नदीत सापडलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणाचा अखेर उलगडा झाला आहे. तपासाअंती हे प्रकरण थरारक ठरले असून, मृतकाचा खून त्याचाच सख्खा भाऊ आणि पुतण्याने केल्याचे समोर आले आहे.



मृताची ओळख मारोती गुणाजी सोनकर (रा. कलगाव, ता. उमरी, जि. नांदेड) अशी पटली आहे. त्याचा खून त्याचाच भाऊ गणेश सोनकर (३१) आणि पुतण्या अमोल श्रीमंगले (२५) या दोघांनी केल्याचे उघड झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारोती सोनकर हा वारंवार दारूच्या नशेत घरच्यांशी वाद घालत असे. त्यामुळे वैतागलेल्या दोघांनी १४ ऑक्टोबर रोजी त्याला मोटारसायकलवरून निर्जन ठिकाणी नेले. तेथे त्याचा गळा आवळून व लाकडी दांडक्याने मारहाण करून त्याचा खून केला. पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाचे दोन्ही हात बांधून त्यांनी तो पैनगंगा नदीत फेकून दिला. १५ ऑक्टोबर☞(पान २ वर)

# अमरावती येथे होणार 'सीआयआयआयटी'च्या कौशल्यवर्धन केंद्रांची उभारणी

## आ. सुलभा खोडके यांच्या प्रयत्नाने अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी अनोखी संधी उपलब्ध

### -उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांचे मानले आभार

**अमरावती/प्रतिनिधी :-** अमरावती जिल्ह्यातील तंत्रशिक्षण व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारण्यास त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या मार्फत अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात खाजगी सहभागातून 'सीआयआयआयटी'च्या कौशल्यवर्धन केंद्रांची उभारणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.





या संदर्भात आ. सुलभा संजय खोडके यांनी मागील सहा महिन्यांपासून केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले असून हजारो उमेदवारांना तांत्रिक प्रशिक्षणासह उद्योगसिद्ध अभियंते घडविण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. आधुनिक उद्योगविश्वात आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास व रोजगार निर्मिती होण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे सीआयआयआयटी केंद्र उभारण्यास मान्यता मिळण्याबद्दल आ. सुलभा खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, ☞(पान २ वर)

# परतवाडा-धामणगांव गढी महामार्गालगत झाडांची अवैध कत्तल

## सा.बां. अभियंत्याच्या सक्रियतेतून कारवाई, वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर, अंजनगाव सुर्जी व चांदुरबाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात हिरव्या झाडांची अवैध कत्तल खुलेआम सुरू असून, परतवाडा वनपरिक्षेत्र कार्यालयाची शांतता ही अवैध कटाईस समर्थन तर नाही ना? असा प्रश्न स्थानिक नागरिकांमधून उपस्थित होत आहे. शेतशिवारातील रस्त्यांलगत असलेली झाडेच नव्हे, तर आता मुख्य रस्त्यांवरील दुतर्फा हिरवी झाडेदेखील दिवसाढवळ्या कुठल्याही परवानगीशिवाय☞(पान २ वर)



भाजप नेते तुषार भारतीय यांच्या प्रयत्नाला यश

# साईनगर प्रभागातील ट्रान्सफॉर्मर करिता १ कोटी ५ लक्ष रुपये मंजूर

**अमरावती :/प्रतिनिधीः** गेल्या काही महिन्यांपासून साईनगर प्रभागात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे दिवसाच्या कोणत्याही वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. पावसाळ्यात तर कोणतीही वारा पाऊस , वादळ नसताना सुद्धा तर उन्हाळ्याच्या काळात ऐन उकाड्यात रात्रीच्या वेळी वीज बंद होत असल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय होत आहे.



साईनगर परिसरात खंडित स्वरूपाचा विद्युत पुरवठा का होतो याबाबत अनेक वेळा वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन मूळ समस्याचे निवारण करण्याच्या दृष्टीने उपाय योजनेचा भाग म्हणून रोहित्र (डीपी) वारंवार☞(पान २ वर)

# प्रभाग मतदार यादीतील घोळ, बायको एका प्रभागात तर नवरा दुसऱ्या प्रभागात

## माजी नगरसेवक बच्चू वानरे यांनी दिला अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी :-** महाराष्ट्र सरकारने नगर परिषद, नगर पंचायत अध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी आरक्षण जाहीर केल्यानंतर प्रारूप मतदार यादी प्रकाशित करण्यात आली. सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी अनेक प्रभागांमध्ये मतदारांच्या नावांमध्ये तफावत आणि गोंधळ असल्याचा आरोप करत तक्रारी दाखल केल्या. या तक्रारी काही प्रमाणात दूर करताना प्रशासनाच्या नाकी नव आले.



परंतु काही प्रभागातील तक्रारीचे निराकरण झाले नाही.यात प्रभाग क्रमांक एक मधील ४० ते ५० नावे प्रभाग क्रमांक दोन मध्ये टाकली असता तक्रारी नंतरही ती नावे प्रशासनाने जैसे थे ठेवण्यात आल्याचा आरोप माजी नगरसेवक बच्चू वानरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला. सर्व राजकीय पक्ष चांदूर रेल्वे नगरपालिकेवर☞(पान २ वर)

# सिलबंद घराचे कुलूप तोडून अनधिकृत प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधीः** : परतवाडा येथे बँकेने जप्त केलेल्या घरात न्यायालयाची परवानगी न घेता अनधिकृतपणे घुसखोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य प्रबंधकांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून जिल्हाधिकारी यांचे आदेश मोडल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटना ३१ ऑक्टोबर रोजीची असून शनिवारी (१ नोव्हेंबर) दुपारी ४ वाजता परतवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी राजेश गडेकर, मुख्य प्रबंधक, भारतीय स्टेट बँक, परतवाडा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेने जप्त केलेल्या गहाण मालमत्तेचा ताबा पंचनाम्याद्वारे घेऊन ती मालमत्ता सिलबंद करून बँकेच्या ताब्यात देण्यात आली होती.

मात्र, यातील आरोपी संदीप ठाकरे (रा. देवमाळी, परतवाडा) यांनी इतरांच्या संगमतीने न्यायालयाची कोणतीही परवानगी न घेता त्या घराचे सिल तोडून घरात ☞(पान २ वर)

# तिवसा तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

## कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश



**कुऱ्हा :/प्रतिनिधीः** तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटा चे वतीने आयोजित युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी यांचे बैठकी मध्ये युवक पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देवून तिवसा तालुका युवक राष्ट्रवादी काँग्रेसची नवनिर्वाचित कार्यकारणी घोषित करण्यात आली. सर्किट हाऊस तिवसा येथे तिवसा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष दिलीपराव भुयार व युवक तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुरज पडोळे यांचे प्रमुख उपस्थितीत युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित पदाधिकारी याना नियुक्ती पत्र ☞(पान २ वर)

# अखेर पोलिसांना तो मिनी ट्रक गणेशपूर हद्दीत सापडला



**खल्लार/प्रतिनिधीः-** काही दिवसांपूर्वी अवैध रित्या रेती वाहतूक करताना मंडळ अधिकारी यांनी जप्त केलेले एक वाहन चोरट्यांनी चक्क दर्यापूर तहसिल कार्यालयातून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली होती. दरम्यान दर्यापूर पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे सदर वाहन गणेशपूर हद्दीत बंद ☞(पान २ वर)

# बोलीभाषा म्हणजे समतेचा पाया!

## ६९ व्या विदर्भ साहित्य संमेलनात 'सामाजिक समता व बोलीभाषांचे योगदान' विषयावर परिसंवाद

**यवतमाळ :/प्रतिनिधीः** विदर्भ साहित्य संघ शाखा, जाम (यवतमाळ) आणि ईश्वर फाउंडेशन, दिग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ वे विदर्भ साहित्य संमेलन यवतमाळ येथे उत्साहात पार पडले. उबंटू इंग्लिश स्कूल येथे १ आणि २ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या संमेलनात 'सामाजिक समता व बोली भाषांचे साहित्यिक योगदान' या विषयावर महत्त्वपूर्ण परिसंवाद घेण्यात आला.



या परिसंवादाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद अपराजित (नागपूर) यांनी भूषवले.

रावसाहेब काळे (अकोला), काशीनाथ बऱ्हाटे (अमरावती), श्रीकृष्ण काकडे (अकोला) आणि अरुण झगडकर (गोंडपिंप्री) यांनी परिसंवादात आपले विचार मांडले. सूत्रसंचालन गजानन कोर्तलवार (नवरगाव) यांनी केले, तर आभार पुरुषोत्तम टिचूकले यांनी मानले. काळे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, 'भारतीय सौंदर्य हे विविधतेत दडले आहे, आणि या विविधतेला जोडून ठेवणारे☞(पान २ वर)